# अर्थसंवाद

खंड ३ * अंक ४ * जानेवारी–मार्च १९८०

मराठी अर्थशास्त्र परिषद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः

भारताचा भावी विकास : एक समग्र दृष्टिकोण

महाराष्ट्र राज्यातील शासकीय उद्योग आणि उपक्रम यांचे प्रश्न व व्यवस्थापन

टिपणे आणि चर्चा

भ रक (खंड) सिद्धान्त

पत्रव्यवहार

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिद्धये । शोधचर्चाविवादार्थं संवादोऽयं प्रवर्तितः ॥

# अर्थसंवाद

जानेवारी – मार्च १९८०
खंड ३ : अंक ४

प्रमुख संपादक : आनंद नाडकर्णी

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता
आनंद नाडकर्णी
अ-३, प्रबोधन को-ऑप. हौसिंग सोसायटी
६१ अ/९–१०, एरंडवणा
पुणे ४११ ००४.

व्यवस्थापकीय पत्ता
रवींन्द्र सबनीस
कार्यवाह
मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा सेंटर फॉर द स्टडी ऑफ सोशल चेंज, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर, मुंबई ४०० ०१४.

'मराठी अर्थशास्त्र परिषदे'च्या सभासदांना 'अर्थसंवाद' हक्काने मिळेल.

इतरांसाठी :
वार्षिक वर्गणी : रु. २५
दर प्रतीची किंमत : रु. ७–५०

सल्लागार मंडळ
**नी. वि. सोवनी**
**वि. वि. बोरकर**
**स. ह. देशपांडे**
साहाय्यक संपादक
**रमेश पानसे**

## या अंकात

१. महाराष्ट्र राज्यातील शासकीय उद्योग आणि उपक्रम यांचे प्रश्न व व्यवस्थापन १८९
**शंकर केशव गोडक**

२. भाटक (खंड) सिद्धान्त १९८
**नी. वि. सोवनी**

३. भारताचा भावी विकास : एक समग्र दृष्टिकोण २१९
**सी. टी. कुरिअन**
अनुवादक : **अविनाश जोशी**

४. "महत्तीकरण आणि गणनसामर्थ्य" चर्चेला उत्तर २३१
**स. ह. देशपांडे**

५. पत्रव्यवहार २४२

**आभार**

(१) अर्थसंवाद प्रकाशनासाठी महाराष्ट्र सरकारच्या साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अनुदान मिळाले आहे. आम्ही मंडळाचे आभारी आहोत.

(२) अर्थसंवादचा ऑक्टोबर–डिसेंबर १९७९ चा अंक आणि हा अंक, या दोन अंकाच्या मुखपृष्ठावरील चित्रे तयार करून दिल्याबद्दल तसेच एकूण सजावटीबद्दल सल्ला दिल्याबद्दल **डॉ. अनिल अवचट** यांचे आम्ही अत्यंत ऋणी आहोत.

# महाराष्ट्र राज्यातील शासकीय उद्योग आणि उपक्रम यांचे प्रश्न व व्यवस्थापन

शंकर केशव मोडक

## १. प्रारंभिक

आर्थिक विकास व सामाजिक परिवर्तन योग्य दिशेने व वेगाने घडवून आणण्यासाठी केंद्र व राज्य सरकारांनी १९४८ व १९५६ सालच्या राष्ट्रीय औद्योगिक धोरणानुसार आपापल्या अखत्यारात शासकीय उपक्रम व उद्योग स्थापन करावयास सुरुवात केली हे सर्वविदित आहे.

या संदर्भात महाराष्ट्रातील शासकीय उपक्रमांचे विशेष स्थान काय, त्यांना आपली उद्दिष्टे गाठण्यात कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते, त्यांच्या परिचालनातील प्रमुख उणिवा काय, इत्यादी विषयांवर संक्षेपात चर्चा करणे व काही निवडक मुद्दे विचारार्थ मांडणे हा या निबंधामागील मर्यादित हेतू आहे. पुरेशा सांख्यिकीय माहितीच्या अभावामुळे हे विवेचन त्रोटक झाले आहे, हे स्पष्ट केले पाहिजे. निबंधाच्या प्रारंभी केंद्र व राज्य यांच्या सार्वजनिक क्षेत्रांच्या स्थितीतील फरकाकडे लक्ष वेधले आहे आणि त्यानंतर महाराष्ट्रातील उपक्रमांच्या प्रश्नांचा ऊहापोह करून त्यांच्या कारभाराचा संक्षेपात आढावा घेतला आहे.

## २. केंद्र व राज्य उपक्रमांच्या स्थितीतील फरक

२·१. केंद्र व राज्य यांच्या अखत्यारातील उपक्रमांच्या बाबतीत जो एक महत्त्वाचा फरक लक्षात येतो तो म्हणजे भरपूर भांडवल-गुंतवणूक आवश्यक असलेले, पण त्याचबरोबर सापेक्षतः अधिक उत्पन्न देणारे उद्योग बहुतांशी केंद्र शासनाच्या हाती आहेत, उदाहरणार्थ, इंडियन एअरलाईन्स, एअर इंडिया, रेल्वे, राज्य व्यापार महामंडळ, अन्न महामंडळ, जीवन विमा महामंडळ, स्टील ऑथॉरिटी ऑफ इंडिया, हिंदुस्थान मशीन टूल्स, इंडियन ऑईल कॉर्पोरेशन इ. यामुळे एकतर अंतर्गत अर्थसाहाय्यीकरण शक्य होते आणि दुसरे एका उपक्रमाला तोटा झाला तरी दुसऱ्याच्या नफ्यातून तो भरून काढण्याला वाव असतो. या तुलनेने राज्य सरकारांच्या वाट्याला आलेले उद्योग लहान आकाराचे व सापेक्षतः कमी नफा देणारे आहेत, उदा. वस्त्रोद्योग महामंडळ, राज्य वित्त महामंडळ, विद्युत मंडळ, मार्ग परिवहन महामंडळ, महिला आर्थिक विकास महामंडळ, जंगल विकास महामंडळ इ. भारतीय करारोपणाच्या क्षेत्रात जे घडले आहे, त्याचीच पुनरावृत्ती सार्वजनिक उपक्रमांच्या क्षेत्रात झाली आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

२·२. दुसरा महत्त्वाचा फरक असा की, केंद्रीय उपक्रमांच्या तुलनेत राज्य उपक्रमांकडे संवर्धनात्मक/प्रचालनात्मक कार्ये अधिक प्रमाणात सोपविण्यात आल्याचे दिसते. महाराष्ट्रातील एकूण उपक्रमांत विकास,

संवर्धन व समाजकल्याण ही कार्ये करणाऱ्या उपक्रमांची संख्या निम्म्याहून अधिक भरते. वस्तुनिर्माण व कृषि-क्षेत्रातले उपक्रम एक-चतुर्थांश आहेत व बाकीचे विभिन्न क्षेत्रांत विखुरले आहेत. या सर्व उपक्रमांच्या नफा-तोटा पत्रकांचा आढावा घेणे शक्य नसले तरी विकास व संवर्धन उद्दिष्टे दृष्टीसमोर ठेवून कार्य करणारे उपक्रम नफ्यात चालत नसणार हे उघड आहे. त्यामुळे राज्याच्या तिजोरीवर निश्चित भार पडत असणार. हा भार कमी करण्यासाठी काय करता येईल, याचा विचार व्हावा; तसेच लाभदायक व तोटादायक उद्योगांचे परस्परप्रमाण काय असावे, किमानपक्षी नफा-तोट्याची गोळाबेरीज शून्य कशी करता येईल याविषयी चर्चा व्हावी.

२.३. केंद्र व राज्य सरकारांच्या उद्योगांच्या उत्पादनमानात (scale of production) लक्षणीय फरक दिसतो. ही कल्पना परिच्छेद २.१ मध्ये अभिप्रेत आहेच. केंद्राचे बहुतांश उद्योग विशाल प्रमाणावर चालत असल्याने त्यांना विक्री, व्यवस्थापन, जाहिरात, खरेदी इ. बाबतींत पुरेपूर बचत मिळविता येते. त्या तुलनेत राज्याचे उद्योग लहान आकाराचे आहेत व त्यामुळे ते किफायतशीरपणे चालत नसल्यास आश्चर्य वाटू नये. बहुतांश महत्त्वाच्या वस्तूंचे उत्पादन केंद्राच्या हाती एकवटल्यामुळे अनेक राज्य सरकारांनी आता व्यापक बाजारपेठ असलेल्या उपभोक्ता वस्तूंच्या उत्पादनाकडे आपली दृष्टी वळविली आहे. एखादा उद्योग आजारी आहे म्हणून अथवा एखाद्या व्यापारात दुर्बल उत्पादकांची लुबाडणूक होऊ नये म्हणून तो आपल्या हाती घेणे इथपर्यंत त्यांनी आपले कार्यक्षेत्र मर्यादित न ठेवता ते सापेक्षत: लाभदायक क्षेत्रांकडे वाढविण्यास सुरुवात केली आहे. उदा. गणक यंत्रे, रेफ्रिजरेटर, दूरदर्शनसंच इ. महाराष्ट्र शासनाचे धोरण या दृष्टीने विशेष उपक्रमशील असल्याचे सध्यातरी दिसत नाही. तसे करण्याची गरज आहे काय ? त्याचा खाजगी क्षेत्रावर काय परिणाम होईल ? सध्याचा सार्वजनिक-खाजगी क्षेत्र समतोल समाधानकारक आहे काय ? धोरणात्मक निर्णय घेण्यापूर्वी अशा प्रश्नांची उत्तरे शोधावी लागतील.

२.४. देशाच्या एकंदर अर्थव्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्राने कमाल प्रभुत्वाचे स्थान काबीज केल्याचे दिसत असले तरी राज्य अर्थव्यवस्थेत राज्य सरकारचे प्रभुत्व तोकडे पडत असल्यासारखे दिसते. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, बेंगळूर याने प्रकाशित केलेल्या अहवालानुसार संघटित क्षेत्रातील ५० टक्क्यांहून अधिक आर्थिक क्रियांवर सार्वजनिक क्षेत्राचे वर्चस्व प्रस्थापित झाले आहे. आर्थिक विकासाच्या दृष्टीने अत्याधिक महत्त्वाच्या अशा ५० वस्तू व सेवा यांचे उत्पादन आता पूर्णपणे किंवा बहुतांशी सार्वजनिक क्षेत्रातच होते. उदा. कोळसा, लिग्नाईट, वृत्तपत्रीय कागद, टेलिफोन व टेलिप्रिंटर यंत्रे, रेल्वे इंजिन व प्रवासी डबे, टरबाईन्स व बॉयलर्स, जहाजनिर्मिती, विविध प्रकारच्या फिल्मस्, विशिष्ट औषधी द्रव्ये, वीजनिर्मिती, पेट्रोल व इतर तेल उत्पादने, गॅस व पाणीपुरवठा, विद्युतयंत्रे व जनित्रे, रेल्वे, विमानसेवा इ. परंतु यामुळेच राज्य सरकारांचे राज्य अर्थव्यवस्थेवरील वर्चस्व मर्यादित झाले आहे, हे विसरता येत नाही. उदाहरणार्थ, ५० वस्तू व सेवा यांपैकी केवळ वीजपुरवठा व सडक उतारूसेवा या दोनवरच महाराष्ट्र शासनाचे वर्चस्व आहे. केंद्र सरकार राष्ट्रीय दृष्टिकोनातून अधिक सयुक्तिकपणे विचार करू शकते व म्हणून ही नियंत्रणाची विभागणी योग्य आहे, याबद्दल शंका नाही; परंतु त्यामुळे राज्य सरकारचे आपली अर्थव्यवस्था विनियमित करण्याचे स्वातंत्र्य मर्यादित झाले आहे, त्याचे काय ? वर्चस्वाची गरज विकासाला योग्य दिशा व चालना देण्याच्या गरजेतून निर्माण होते. राज्य सरकारचे सामर्थ्य त्या दृष्टीने—व विशेषत: मागास भागांचा विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने—तोकडे पडते हे स्पष्ट आहे. अन्यथा, अडचणीच्या प्रत्येक वेळी राज्यातील मंत्र्यांनी कोळसा, केरोसीन, सिमेंट, रेल्वे वाघिणी यांसाठी दिल्लीकडे धाव घेण्याचे दृश्य दिसलेच नसते. कोकण, मराठवाडा यांसारख्या मागास

भागांना रेल्वे-रुंदीकरण, नवीन रेल्वेमार्ग किंवा एखादा मोठा प्रकल्प यांसाठी राजधानीकडे डोळे लावून बसण्याची पाळी आली नसती.

२·५. तात्पर्य, राज्य सरकारांच्या आपल्या अखत्यारातील प्रदेशाच्या अर्थव्यवस्थेवर प्रभाव टाकण्याच्या शक्तीला निश्चित मर्यादा पडल्या आहेत. राज्ये आत्मनिर्भर होऊ शकत नाहीत व त्यांचे सार्वजनिक क्षेत्र आदेशात्मक उंची गाठू शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे. म्हणूनच राज्यातील सार्वजनिक क्षेत्राकडून आहे त्या स्थितीत अर्थव्यवस्थेला अधिक चांगले वळण देण्याची अपेक्षा करणे काही प्रमाणात अवास्तव ठरू शकते. सरकारी कारभारातील कार्यक्षमता निरनिराळ्या परिस्थितिजन्य कारणांमुळे केंद्र–राज्य–जिल्हा आणि स्थानिक पातळीवर क्रमशः घसरत जाते, असा अनुभव आहे. याचाही परिणाम राज्य उपक्रमांच्या प्रशासनावर काही प्रमाणात होणे अटळ आहे.

## ३. महाराष्ट्रातील उपक्रमांचे प्रश्न

३·१. महाराष्ट्राच्या सार्वजनिक उपक्रम समितीने तयार केलेल्या यादीनुसार जुलै १९७८ मध्ये मंत्रालयातील विभिन्न विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली एकूण ३६ उपक्रम होते. दुय्यम उपक्रम घेतल्यास ही यादी ४६ पर्यंत वाढते. कॉमर्स इयर बुक ऑफ पब्लिक सेक्टर १९७६–७७ मध्ये दिल्यानुसार १९७४–७५ साली अशा उपक्रमांची संख्या ६५ होती. प्रत्यक्ष यादीत मात्र ४६ उपक्रम दाखविले आहेत आणि त्यांपैकी २० प्रमुख उपक्रमांची माहिती दिली आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बॅंगलूरने प्रसिद्ध केलेल्या अहवालातील एका यादीनुसार मार्च १९७६ मध्ये महाराष्ट्रात एकूण ३६ सार्वजनिक उपक्रम होते. दुसऱ्या एका 'उद्दिष्टे आणि उपक्रमशीलतेचा प्रकार' दर्शविणाऱ्या यादीनुसार ही संख्या ४९ होती. याचा अर्थ १३ विभागीय उपक्रमांचा अथवा दुय्यम उपक्रमांचा समावेश त्यात केला असावा. उपक्रमांच्या संख्येतील हा फरक, दुय्यम उपक्रम आणि एकाच उपक्रमाचे विभिन्न ठिकाणी विखुरलेले एकक वेगवेगळ्या यादींत, संयुक्तरीत्या किंवा विभक्तपणे मोजल्याने होते, हे यावरून स्पष्ट आहे. यंदाच्या वर्षी मेषपालन आणि मध्यपूर्वेकडे रोजगार पुरवठ्याचे विनियमन या उद्दिष्टांनी स्थापन केलेल्या दोन महामंडळांची या यादीत भर पडली आहे. त्यामुळे विवेचनाच्या सोईसाठी उपक्रमांची संख्या मर्यादित अर्थाने ३८ आणि व्यापक अर्थाने ५१ मानायला हरकत नाही.

३·२. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या दुसऱ्या यादीनुसार महाराष्ट्रातील राज्यस्थापनेच्या उद्दिष्टांनुसार होणारी वर्गवारी खालीलप्रमाणे दाखविता येईल:

**तक्ता क्र. १**

| क्र. | उद्दिष्टे | उपक्रमांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | लोककल्याणाच्या वस्तू व सेवा यांची तरतूद | १६ | ३१·३५ |
| २. | नैसर्गिक एकाधिकाराची स्थापना | १ | २·०० |
| ३. | बाजारातील अ–स्पर्धात्मक व्यवहारांची थोपवणूक | १ | २·०० |
| ४. | आर्थिक विकास, रोजगारी व आत्मनिर्भरता यांत वाढ | ९ | १७·६३ |
| ५. | महत्त्वाच्या आर्थिक क्षेत्रात कृत्रिम एकाधिकार निर्मिती | २ | ३·९० |
| ६. | प्रचालनात्मक कार्य | २२ | ४३·१२ |
| | एकूण | ५१ | १००·०० |

शासनाच्या औद्योगिक क्षेत्रातील प्रवेश हा तीन कारणांनी झालेला आढळून येतो. एक म्हणजे शासनाने स्वतः वस्तू वा सेवानिर्मितीसाठी एखादा उपक्रम सुरू करणे, उदा. खादी व ग्रामोद्योग मंडळ, मार्ग परिवहन महामंडळ, दुग्धविकास योजना इ. दुसरे म्हणजे खाजगी क्षेत्रातील इतर उद्योगांना आधार व साहाय्य पुरविण्यासाठी संस्था निर्माण करणे, उदा. वित्त महामंडळ, महिला आर्थिक विकास महामंडळ, मराठवाडा विकास महामंडळ इ. आणि तिसरे म्हणजे काही विशिष्ट कारणांनी खाजगी उपक्रम शासकीय व्यवस्थापनेखाली आणणे, उदा. शाहू छत्रपती मिल्स, बेस्ट अंडरटेकिंग इ. या दृष्टीने वर्गवारी केल्यास महाराष्ट्रात, पहिल्या प्रकारात २५, दुसऱ्यात २४ आणि तिसऱ्यात २ उपक्रम मोडतात. वरील दोन्ही प्रकारच्या वर्गीकरणांवरून एक गोष्ट स्पष्ट होते, ती म्हणजे महाराष्ट्रातील बहुसंख्य उपक्रमांच्या स्थापनेमागील मुख्य भूमिका संवर्धनात्मक, विकासात्मक व लोककल्याणात्मक कार्य करण्याची आहे.

३·३. महाराष्ट्रातील व सबंध देशातील उपक्रमांची आर्थिक क्षेत्रांनुसार ( sectors ) विभागणी कशी आहे याची कल्पना खालील तक्त्यावरून येऊ शकते.

**तक्ता क्र. २**

| क्र. क्षेत्र | महाराष्ट्रातील उपक्रमांची संख्या | टक्केवारी | देशातील उपक्रमांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. अधिकोषण व विमा | १३ | ३४·२ | १५६ | २०·२ |
| इतर सेवा | २ | ५·३ | २८ | ३·६ |
| २. कृषी | १० | २६·३ | १०० | १२·९ |
| उत्खनन | १ | २·६ | ३१ | ४·० |
| ३. वस्तुनिर्मिती | ४ | १०·५ | २७१ | ३५·१ |
| बांधकाम | ३ | ७·९ | ३० | ३·१ |
| वीज | १ | २·६ | २२ | २·८ |
| परिवहन गोदाम व दळणवळण | २ | ५·३ | ६७ | ८·७ |
| व्यापार व हॉटेले | २ | ५·३ | ६८ | ८·८ |
| एकूण | ३८ | १००·० | ७७३ | १००·० |

महाराष्ट्रात अधिकोषण व विमा क्षेत्रातल्या प्रामुख्याने संवर्धनात्मक कार्य करणाऱ्या आणि कृषी क्षेत्रातल्या मुख्यतः विकासकार्य करणाऱ्या उपक्रमांचा भरणा अधिक असून वस्तुनिर्मिती करणारे उद्योग सापेक्षतः कमी आहेत हे यावरून स्पष्ट होते. राज्यात खाजगी क्षेत्रातील वस्तुनिर्मिती करणारे उद्योग अगोदरच पुरेसे विकसित आहेत, हे यामागचे एक प्रमुख कारण असू शकेल. परंतु हे औद्योगीकरण केवळ मुंबई–ठाणे–पुणे–या औद्योगिक पट्ट्यांपर्यंत मर्यादित आहे हे विसरता येत नाही. मागासलेल्या भागांत उपभोग्य वस्तूंची निर्मिती करणारे सापेक्षतः अधिक लाभदायक उपक्रम शासनाने हाती घ्यावेत काय, या प्रश्नावर विचार झाला पाहिजे. इतर राज्यांना आलेला अनुभव जमेस घ्यायला हवा. कापड, दूध, चामडी यांसारख्या वस्तूंच्या उत्पादनात सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार विदर्भ, मराठवाडा किंवा कोकण विभागात काही प्रमाणात सध्या होत असला तरी रसायने, इलेक्ट्रॉनिक्स, कागद, सिमेंट, रबर यांसारख्या क्षेत्रांत देखील प्रवेश करावा काय यावर गंभीरपणे विचार झाला पाहिजे.

३.४. संघटनात्मकदृष्ट्या पाहिल्यास महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक उपक्रमांत 'कंपनी' स्वरूपाच्या संघटनांचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे दिसते. उदाहरणार्थ, सांविधिक महामंडळांची संख्या केवळ ५ आहे, त्यात महाराष्ट्र राज्य वित्त महामंडळ, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र खादी आणि ग्रामोद्योग मंडळ, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्य जनजाती महामंडळाची नोंदणी सहकारी संस्था कायद्यानुसार झाली असून बाकीचे ३२ उपक्रम कंपनी कायद्यांतर्गत नोंदणी झालेले आहेत. वास्तविक प्रशासकीय सुधारणा आयोग व इतर अनेक समित्यांनी सांविधिक महामंडळे स्थापन करण्यासंबंधीची स्पष्ट शिफारस वारंवार केली आहे. परंतु उच्चाधिकार असलेल्या या समित्यांचा सल्ला सतत झुगारला गेला आहे. ही बाब स्पृहणीय नाही हे खरे असले तरी त्यामागच्या कारणांचा शोध घेतला पाहिजे. एक प्रमुख कारण असे असावे की, एखाद्या उपक्रमाची स्थापना करण्याचा विचार पक्का ठरला म्हणजे मग त्याची तडकाफडकी अंमलबजावणी करणे सरकारला अत्यावश्यक वाटत असले पाहिजे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्यासंबंधीचा प्रस्ताव मांडून तो संमत करून घेतला म्हणजे कंपनी कायद्याखाली नोंदणी करण्याचा मार्ग सुकर होतो. याउलट, सांविधिक महामंडळ स्थापन करणे त्यामानाने जिकिरीचे असते. कारण त्यासंबंधीचे विधेयक अगोदर विधान मंडळासमोर मांडावे लागते व मग ते संमत करून घ्यावयाच्या सोपस्काराला वेळ लागतो. मुख्य म्हणजे एखादी सोपी परंतु अवांछनीय कृती एकदा करण्यात आली व ती बिनतक्रार पचनी पडली म्हणजे कठीण कृती न करण्याकडे कल वाढू लागतो आणि मग तेच स्वाभाविक वाटू लागते. राज्य सरकार काय वा केंद्र सरकार काय दोन्हीही ह्या नियमाला अपवाद नाहीत.

३.५. काही निवडक महामंडळे वगळल्यास बहुतांश महामंडळांच्या व्यवस्थापकीय संचालकपदी अथवा अध्यक्षपदी मुलकी अधिकारी नियुक्त केलेले आढळतात. न्या. गजेंद्रगडकर यांनी राष्ट्रीय श्रम आयोगाच्या अहवालात, सचिवालय चालविणे आणि कारखाना चालविणे या दोन गोष्टी वेगळ्या असल्याचे सूचित केले होते. नोकरशाही संस्कृती आणि वाणिज्यिक संस्कृती यात महदंतर असते. मुलकी अधिकाऱ्यांना आपल्या निष्ठा दोन्ही ठिकाणी दर्शविणे जड जाते. अशा तारेवरच्या कसरतीत त्यांनी शेवटी अंगभूत नोकरशाही संस्कृतीकडे कल दाखविला, तर त्यात नवल ते काय ? या बाबतीत जे स्वाभाविक आहे, तेच घडत आले आहे. परंतु असे असूनही राज्यकर्त्यांनी आपली पसंती बऱ्हंशी त्यांच्या बाजूने का दाखविली हा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्या त्या वेळी जे सोपे व सहजसाध्य वाटले ते केले जाते, हे त्यामागचे एक कारण असावे. उपक्रमाच्या संचालकपदी मुलकी अधिकाऱ्याची निवड सापेक्षतः सोपी भासते हे खरे कारण. नियुक्ती वादग्रस्त ठरण्याची भीती सर्वांत कमी असते. शिवाय अधिकारी नको असला तर त्याची अन्यत्र बदली करता येते. बाहेरून निवड करून माणूस आणण्याचे सोपस्कार या पद्धतीत टाळले जातात. एकदा ही चौकट सोईची ठरली व सामान्यपणे मान्य झाली म्हणजे तीत बदल करण्याची जोखीम सहसा कोणी घेत नाही. राज्यकर्त्यांना तर या बाबतीत गंभीरपणे विचार करायला सवडच नसते. महाराष्ट्रात नजीकच्या भविष्यकाळात या बाबतीत विशेष परिवर्तन होईल असे वाटत नाही. परंतु केंद्र सरकारने मुलकी अधिकाऱ्यांवरील आपले परावलंबित्व वेगाने घटविण्यास सुरुवात करून बऱ्याच प्रमाणात यश मिळविले आहे ही गोष्ट महाराष्ट्र सरकारने गंभीरपणे विचारात घ्यावयास हवी.

३.६. केंद्र सरकारने वित्त मंत्रालयाच्या अंतर्गत ब्युरो ऑफ् पब्लिक एंटरप्राईझेस नावाची संस्था स्थापन करून तिच्याकडे प्रस्तावित सार्वजनिक प्रकल्पांची तपासणी करणे व सल्ला देणे, आकडेवारी गोळा करून संसदेला वार्षिक अहवाल सादर करणे, प्रगतीचे मूल्यमापन करणे, समस्यांसाठी उपाययोजना

सुचविणे, वरच्या श्रेणीच्या अधिकाऱ्यांची भरती करण्यात साहाय्य देणे व एकंदरीने सरकार व सार्वजनिक उपक्रम यांच्यामधील दुव्याचे महत्त्वपूर्ण कार्य करणे या विविध जबाबदाऱ्या सोपविल्या आहेत. अशी संस्था राज्य पातळीवर अस्तित्वात नाही, त्यामुळे उपक्रमांवरील राज्य शासनाच्या नियंत्रणामध्ये एक प्रकारचा विस्कळीतपणा आल्यासारखे वाटते. आंतर-विभागीय समित्यांद्वारे व अधिकाऱ्यांच्या सामाईक बैठकींद्वारे समन्वयाचे कार्य काही प्रमाणात साधले जात असेलही, परंतु त्याच्या पुरेशा प्रभावीपणाबद्दल शंका वाटते. राज्याला ब्यूरोसारख्या एखाद्या संघटनेची गरज निश्चित आहे. एखादे वेळी तशी संघटना स्थापन झाली तर मात्र ती व्यवस्थित व प्रभावी व्हावयास हवी अशी काळजी घेतली पाहिजे. तिची गत प्रभावहीन झालेल्या राज्य नियोजन मंडळाप्रमाणे व्हावयास नको.

३·७. राज्याच्या सार्वजनिक उपक्रमांना स्वायत्तता कितपत मिळते हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे. भारतीय उपक्रमांना, मग ते केंद्र पातळीवरचे असोत अथवा राज्य पातळीवरचे, स्वायत्तता एका मर्यादेपर्यंतच मिळते असा अनुभव आहे. स्वायत्त महामंडळ आणि विधान सभा यामध्ये मंत्री हा एक महत्त्वाचा दुवा असतो आणि म्हणूनच पाश्चात्त्य देशांतून मंत्र्याची भूमिका काय असावी यावर बरीच उपयुक्त चर्चा झालेली आढळते. मंत्र्याने उद्योगाच्या अंतर्गत व्यवहारात हस्तक्षेप करू नये, तर संपूर्ण कारभारावर चौकस नजर ठेवावी अशी अपेक्षा असते, कारण लोकप्रतिनिधींच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देण्याची जबाबदारी त्याचीच असते. अशी समतोल भूमिका बजावणे कोणालाही अवघड असले तरी ते आवश्यक असते. भारतात मात्र असा समतोल साधण्याची वेळ विशेष आलेली नाही. कारण मंत्र्यांनी आरंभापासूनच बहुतांश विषयांत हस्तक्षेप करण्याचे धोरणच इथे रूढ झालेले आहे. नियुक्त्या, बदल्या, पदोन्नती, कंत्राट देणे, मालाची खरेदी करणे इत्यादी सर्व लहान-मोठ्या बाबतींत मंत्री आदेश देऊ शकतो. कदाचित याच कारणामुळे भारतात मंत्र्याच्या भूमिकेविषयी फार कमी प्रमाणात तात्त्विक चर्चा झाल्याचे आढळते. महाराष्ट्राला या बाबतीत काही वेगळा मार्ग अवलंबिता येईल काय, याविषयी विचार व्हावा.

३·८. सार्वजनिक उपक्रमांचे किंमत-धोरण सामान्यपणे काय असावे याविषयी सरकारने तीन मार्गदर्शक तत्त्वे घालून दिली आहेत: ( १ ) उपक्रम आर्थिकदृष्ट्या पोषणक्षम ( viable ) झाला पाहिजे; ( २ ) मालाची विक्री करताना उपक्रमाला देशांतर्गत उत्पादकांशी स्पर्धा करावी लागत असल्यास बाजार-स्थितीचा विक्री किंमतीवर पूर्ण परिणाम होऊ दिला पाहिजे, व बाजारमाध्यमानेच किंमतींना विनियमित होऊ दिले पाहिजे; ( ३ ) एकाधिकार वा अर्ध-एकाधिकार स्थितीत उत्पादन होत असल्यास आयात वस्तूच्या बंदरस्थानी उतरल्यावर असणाऱ्या किंमतीच्या आधारे वस्तूची किंमत ठरविली गेली पाहिजे.

वरील मार्गदर्शक तत्त्वे सन्मान्य असली तरी आपल्याकडे ' तदर्थ पद्धती 'ने किंमत ठरविण्याची पद्धत सर्वत्र रूढ झाली आहे. साधारणपणे उत्पादन परिव्यय, उपभोक्त्यांची खरेदीक्षमता आणि अर्थ-व्यवस्थेच्या सामान्य गरजा या तीन गोष्टींना अनुलक्षून किंमत निर्धारित केली जाते. अंतिम निर्धारित किंमत ही एक प्रकारची तडजोड असते, कारण तिन्ही अटी एकाच वेळी पूर्ण करणे कठीण असते. उदाहरणार्थ, विजेचे दर ठरविताना अर्थव्यवस्थेच्या गरजांना प्राधान्य द्यावे लागते, दूध व इतर पदार्थांच्या किंमती निश्चित करताना उपभोक्त्यांची खरेदीक्षमता लक्षात घ्यावी लागते; तर उतारू वाहतुकीचे दर ठरविताना उत्पादन परिव्यय भरून निघेल अशी काळजी घ्यावी लागते. अर्थात बाजारपेठ स्पर्धात्मक असल्यास इतर पर्यायी वस्तूंच्या प्रचलित किंमतीही लक्षात घ्याव्या लागतात. तात्पर्य, महाराष्ट्रात सार्व-जनिक उपक्रमांच्या उत्पादनांच्या किंमती, मार्गदर्शक तत्त्वे व वस्तुस्थिती यांच्या क्रिये-प्रतिक्रियेतून विकसित होतात याचाच व्यतितार्थ असा की, एखादा उपक्रम कार्यक्षमतेने चालतो आहे किंवा नाही

यासंबंधीचा निर्णय मिळालेल्या नफ्याच्या आधारे घेता येत नाही. या जाणिवेतूनच कार्यक्षमतेचे लेखा-परीक्षण ( efficiency audit ) ही कल्पना पुढे आली. अशा प्रकारच्या लेखापरीक्षणात एखाद्या उपक्रमाच्या यशस्वितेचे मोजमाप केवळ नफ्याच्याच निकषावर नव्हे तर उत्पादकता, रोजगारी, औद्योगिक शांतता इत्यादींत झालेली वाढ या निकषांच्या आधारे केली जाते. वास्तविक हा दृष्टिकोण विकसनशील देशांच्या गरजा पाहता केव्हाही समर्थनीय व अनुकरणीय म्हणावा लागेल. प्रत्यक्षात मात्र प्रकाशित सरकारी दस्तऐवजांवरून यशस्वितेचे मोजमाप या पद्धतीने होत असल्याचे आढळत नाही. राज्य पातळीवर ब्यूरो स्थापन करण्याची गरज त्यामुळे अधिक निकडीची वाटते. राज्य सरकारने 'कार्यक्षमतेने लेखापरीक्षण' या बाबतीत पुढाकार घ्यावयास हवा व हे काम ब्यूरो किंवा तत्सम संस्थेकडे सोपवावयास हवे.

**४. राज्य उपक्रमांच्या कारभाराचा संक्षिप्त आढावा**

**४·१.** राज्य पातळीवरील सार्वजनिक उपक्रम समिती ( सा. उ. स. ) आणि भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक ( भा. नि. म. ले. ) यांनी वेळोवेळी प्रसृत केलेल्या अहवालांवरून राज्य उपक्रमांच्या कारभाराची सर्वसाधारण कल्पना येते. जुने व नवे अहवाल चाळल्यानंतर जी एक गोष्ट चटकन लक्षात येते ती म्हणजे अनेक सरकारी कंपन्या आपले वर्षाचे हिशेब वेळेवर तयार करत नाहीत व त्यामुळे लेखापरीक्षण कार्याचा खोळंबा होतो. भा. नि. म. ले. यांच्या १९७६–७७ च्या वाणिज्यिक अहवालात म्हटले आहे की, ३१ मार्च १९७७ रोजी राज्यात ज्या ३५ सरकारी कंपन्या होत्या त्यांपैकी १० कंपन्यांनी आपले खालील वर्षांचे हिशेब फेब्रुवारी १९७८ पर्यंत सादर केले नव्हते. उदा. यंत्रमाग महामंडळ–१९७४–७५, ७५–७६ व ७६–७७, हातमाग महामंडळ १९७४–७५, ७५–७६ व ७६–७७, मॅफको १९७५–७६ व ७६–७७, शेतकी महामंडळ १९७५–७६ व ७६–७७, मत्स्यव्यवसाय विकास महामंडळ १९७६–७७ इ. या विलंबाची कारणे बहुधा प्रशासकीय असावीत हे उघड आहे. प्रत्येक कंपनीला आलटूनपालटून विलंब होऊ लागल्यास भा. नि. म. ले. यांना आपले सांविधिक कार्य सुरळीतपणे करणे अशक्य होऊ शकते, हे लक्षात घेतले पाहिजे.

**४·२.** अनेक कंपन्या तोट्यात चालतात. भा. नि. म. ले. यांच्या १९७६–७७ च्या अहवालानुसार ज्या १७ कंपन्यांना आपले हिशेब निश्चित करता आले होते, त्यांना रु. ५७·४६ लाख इतका एकूण निव्वळ तोटा आला. त्या १७ पैकी ७ कंपन्यांना एकूण लाभ रु. १२०·३१ लाख म्हणजे भरणा केलेल्या भांडवलाच्या ६·५२ टक्के झाला. ९ कंपन्यांना रु. १८७·७७ लाख तोटा झाला व तो भरणा केलेल्या भांडवलाच्या ११·०१ टक्के होता. एका कंपनीच्या बाबतीत झालेल्या रु. ५·०४ लाख तोट्याचे रूपांतर भांडवली खर्चात करण्यात आले. मुख्य कंपन्यांच्या चार दुय्यम कंपन्यांना १९७६–७७ या वर्षी रु. ८०·८४ लाख इतका तोटा झाला, तर एका दुय्यम कंपनीला रु. ६·७२ लाख इतका नफा झाला. अगोदर निर्देशिलेल्या १७ मुख्य कंपन्यांमध्ये राज्य शासनाचे रु. ४०५८·३७ लाख गुंतले असून एका कंपनीला देखील लाभांश जाहीर करता आला नाही. कंपन्यांनी घेतलेल्या कर्जात मात्र रु. ९०३३ लाखांवरून रु. ११२६१·३२ लाखांपर्यंत वाढ झाली. वरील आकडेवारी पुरेशी बोलकी आहे. हिशेब सादर न केलेल्या कंपन्यांचा नफा-तोटा विचारात घेतला तर हे चित्र अधिक निराशाजनक दिसण्याची शक्यता आहे.

**४·३.** कायद्याने स्थापित झालेल्या महामंडळांची स्थिती कंपन्यांच्या तुलनेत पुष्कळच बरी असल्याचे दिसते. मुख्य म्हणजे राज्यातील पाचही महामंडळांचे हिशेब वेळेवर तयार झाले व त्यांचा १९७६–७७ सालचा एकूण करपूर्व नफा रु. २६०७·७२ लाख इतका भरला. राज्याच्या वीज मंडळाला रु. १६२८·२२ लाख, वखार महामंडळाला रु. ४०.४६ लाख, मार्ग परिवहन महामंडळाला रु. ७२२.८३

लाख, वित्तीय महामंडळाला रु. १९८.८१ लाख आणि औद्योगिक विकास महामंडळाला रु. १७·४० लाख इतका नफा झाला. गुंतविलेल्या एकूण भांडवलावरील सरासरी प्राप्ती अनुक्रमे ७·०४ टक्के, १७·४६ टक्के, २२·५० टक्के, ८·८३ टक्के (वापरलेल्या भांडवलावरील) आणि ६·६२ टक्के भरली. मार्ग परिवहन महामंडळ आणि वखार महामंडळ वित्तीयदृष्ट्या अधिक किफायतशीर ठरले. सांविधिक महामंडळे किफायतशीर ठरत असताना अनेक कंपन्या तोट्यात का चालतात याची कारणे शोधली पाहिजेत व यासाठी त्यांच्या कामकाज पद्धतीची कसून छाननी केली पाहिजे.

४·४. कंपन्यांच्या कामकाज पद्धतीतील दोषांची काहीशी कल्पना भा. नि. म. ले. आणि सा. उ. स. यांच्या अहवालातील उताऱ्यावरून येऊ शकते. उदाहरणादाखल काही निवडक उपक्रमांसंबंधी केलेल्या टिपण्या पाहू. महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाला १९७३–७४, १९७४–७५ व १९७५–७६ साली अनुक्रमे रु. ०·२८ लाख, ८०·२३ लाख व रु. १८०·६१ लाख इतका तोटा झाला. कंपनीने सुरू केलेला एकात्मीकृत उत्पादन कार्यक्रम अपयशी ठरला, त्याची विविध कारणे अशी : कापडाचे धागे तुटलेले होते, विणकाम सदोष होते, कापड चांगल्या प्रतीचे नव्हते, विणकरांनी पुरेसा प्रतिसाद दिला नाही, निधी कमी पडला इ. विणकरांना सुताची विक्री उधारीने करू नये अशी विहित कार्यपद्धती असूनही कंपनीने वेळेवर वसुली केली नाही. परिणामतः ३१ मार्च १९७७ रोजी खाजगी व्यक्तींकडून थकबाकीचे रु. २२·८७ लाख व सहकारी संस्थांकडून रु. ६·७४ लाख असे एकूण रु. २९·६१ लाख येणे होते. जुलै १९७४ ते जुलै १९७५ या मुदतीत पुण्याच्या दोन उद्योगसंस्थांकडून कंपनीला पुरविण्यात आलेल्या १४·५१ लाख मीटर कापडापैकी, तपासणी न करता स्वीकारण्यात आलेले, ८·९० लाख मीटर कापड नित्कृष्ट असल्याचे नंतर आढळून आले. या व्यवहारात कंपनीला रु. १२·४८ लाख इतका तोटा झाला. कंपनीने वेगवेगळया दरांनी तेच कापड खरेदी केल्याची ९२ प्रकरणे १९७४ ते १९७६ या काळात उघडकीस आली. त्यात रु. ०·९५ लाख जादा दिल्याचे दिसून आले. कंपनीने निर्यातीसाठी स्वीकारलेले कापड तपासणीअंती निकृष्ट असल्याचे आढळल्यामुळे कमी किमतीवर निकालात काढण्यात आले व या व्यवहारात रु. १·९५ लाखाचा तोटा झाला. तसेच निर्यात कराराचे दायित्व पूर्ण करण्यासाठी खुल्या बाजारात योग्य कापडाची खरेदी करावी लागल्यामुळे रु. ८·६० लाख इतका तोटा झाला.

हातमाग महामंडळाच्या कारभारात देखील बरीच अकार्यक्षमता दिसून आली. विक्री झालेल्या मालापेक्षा वर्षअखेरचा साठाच अधिक असल्याचे १९७४ ते १९७७ या प्रत्येक वर्षी दिसून आले. त्यात बहुतांशी शिलक राहिलेले असे सदोष कापड होते व ते निकालात काढले नव्हते. याच काळात झालेल्या चोऱ्या, लबाड्या, अफरातफरी, नुकसान इत्यादींच्या १५ प्रकरणांत रु. २·९४ लाख इतका तोटा झाला. महाराष्ट्र कृषि विकास व खत प्रचालन महामंडळाने (मॅफको) नांदेडच्या कापसाच्या काळ्या जमिनीत बटाट्याची लागवड करण्याची योजना अकल्पनीय असताना देखील तेथे शीतगृह प्रकल्प उभारण्याची जबाबदारी स्वतःकडे घ्यावी हे पाहून आश्चर्याचा धक्का बसल्याचे राज्याच्या सार्वजनिक उपक्रम समितीने आपल्या तिसऱ्या अहवालात (डिसेंबर १९७८) म्हटले आहे व अशा निर्णयपद्धतीवर प्रखर टीका करून जबाबदार व्यक्तींना शासन करण्याचाही आदेश दिला आहे.

सार्वजनिक उपक्रम समितीच्या सहाव्या अहवालात (१९७९) महाराष्ट्र राज्य वीज मंडळाच्या कारभारावर टीका आहे. वीज वितरणासाठी लागणारे १३०५ रूपांतरक (Transformers) खरेदी करताना, प्रदायकाने त्यांची अगोदर चाचणी घेणे व मंडळाच्या अधिकाऱ्यांनी तपासणी करणे यासंबंधीची तरतूद टेंडरच्या अटीत समाविष्ट केली असूनही, ही अट खालच्या निर्णय पातळीवर मंडळाद्वारे शिथिल करण्यात

आली व त्यानंतर क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी तक्रार केल्याचा परिणाम म्हणून ६५९ रूपांतरकांच्या झालेल्या तपासणीत ते सर्व सदोष असल्याचे आढळून आले. यात मंडळाला रु. १० लाख इतका तोटा झाला, व अट शिथिल करण्याचे हे प्रकरण शेवटी भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाकडे सोपवावे लागले. समितीने मतप्रदर्शन करताना स्पष्ट म्हटले आहे की, या प्रकरणात खालच्या पातळीवर कोणीतरी विचारपूर्वक चलाखी केली आहे व श्रेष्ठींनी हेतुपूर्वक कानाडोळा केला आहे. या भ्रष्टाचाराच्या व कर्तव्यच्युतीच्या प्रकाराची कसून चौकशी करावी व दोषी ठरणाऱ्यास शिक्षा द्यावी अशी शिफारस समितीने केली आहे. याशिवाय मंडळाच्या परिव्यय लेखापरीक्षण अहवालानुसार १९७५–७६ साली विजेच्या विक्रीत होणारी ४१ टक्के हानी, जळगाव, सांगली व यवतमाळ जिल्ह्यांत विजेची सुमारे २५ टक्के हानी, विजेची चोरी, सदोष मीटर्स इत्यादी प्रकारांकडे देखील लक्ष वेधण्यात आले आहे व अशा सर्व बाबतींत मंडळाने सुधारणा घडवून आणणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे.

४·५. वरील मोजक्या टिपण्यांवरून राज्याच्या शासकीय उपक्रमांच्या हिशेब-पद्धतीत, प्रकल्प-मूल्यमापनात, खरेदी-विक्री व्यवहारात आणि एकंदर व्यवस्थापनात किती अकार्यक्षमता आली असावी याचा स्थूल अंदाज करता येतो. हिमपर्वताचा दृष्टीआड असलेला भाग दिसणाऱ्या भागापेक्षा कितीतरी मोठा असतो हे विसरता येत नाही. म्हणूनच राज्यातील सार्वजनिक उपक्रमांच्या एकूण कारभारात सुधारणा करण्याला भरपूर वाव आहे, हे लक्षात घेतले पाहिजे व त्या दिशेने कृती केली पाहिजे.

---

**संदर्भ**


१. Indian Institute of Management, Banglore, Performance of Indian Public Enterprise Sector (Macro Report), December 1977.

२. Laxmi Narayan, "Public Enterprises : Death Bell For Civil Servants", Economic Times, October 2, 1979.

३. Maharashtra Legislature Secretariat : Proceedings of the Parliamentary Seminar on Rationale behind the Formation of Statutory Corporations and Extent of Legislative Control over them, held on 16–17 October, 1975.

४. Maharashtra Legislature Secretariat : Committee on Public Undertakings 1978–79, Fifth Legislative Assembly, Sixth Report, March 1979.

५. महाराष्ट्र शासन : भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा अहवाल (वाणिज्यिक) १९७६–७७, १९७८.

६. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय : सार्वजनिक उपक्रम समिती (१९७८-७९), पाचवी विधानसभा, तिसरा अहवाल, डिसेंबर १९७८.

७. महाराष्ट्र शासन : १९७७–७८, १९७८–७९ व १९७९–८० मधील कार्यक्रमांची रूपरेषा – सर्व शासकीय विभागाचे अहवाल.


■ ■

# भाटक ( खंड ) सिद्धान्त

नी. वि. सोवनी

## विषयव्याप्ती आणि परिभाषा

शेतजमिनीच्या ठराविक काळातील वापरासाठी द्यावयाची ठराविक रक्कम किंवा ठराविक देय ( पैशात अगर वस्तुरूपाने ) या अर्थाने ' खंड ' हा शब्द मराठीत वापरतात. घर, गोदाम वगैरेंच्या वापराबद्दल अशाच प्रकारचे देय हे ' भाडे ' या निराळ्या शब्दाने दर्शविले जाते. आगगाडी, टांगा वगैरे वाहनांना त्यांच्या उपयोगाबद्दल द्यावयाच्या देयालाही मराठीत भाडेच म्हणतात. इंग्रजीत पहिल्या दोन्ही अर्थी rent हा एकच शब्द वापरतात. अर्थशास्त्रीय चर्चेच्या संदर्भात या इंग्रजी शब्दाचा अर्थ थोडा अधिक व्यापक होऊन जमिनीप्रमाणेच इतर उत्पादन घटकांच्या वापरासाठी द्यावयाचा मोबदला असाही अर्थ त्याला प्राप्त झाला आहे. शिवाय हा खंड, भाडे वगैरे ज्यांना मिळते त्यांचे हे उत्पन्न एका अर्थी अनार्जित असते – म्हणजे त्यासाठी त्यांना कोणतेच श्रम करावे लागत नाहीत व केवळ ते त्या घटकाचे त्या वेळेचे मालक असल्यामुळे त्यांना ते मिळते – म्हणून मूळ इंग्रजी संज्ञेला ' अनार्जित उत्पन्न ' असाही अर्थ चिकटलेला आहे. हा शेवटचा अर्थ सोडल्यास उरलेल्या अर्थांना सामावणारा असा भाटकम् किंवा भाटम् हा संस्कृत शब्द आहे व त्याचे अर्थ आपटे कोशाप्रमाणे 'hire, rent, wages' असे आहेत. अर्थशास्त्रातील याविषयींचे सिद्धान्तन हे फक्त जमिनीच्या संदर्भाशी सीमित नसून वर उल्लेखिलेल्या सर्व अर्थांना व्यापणारे असल्यामुळे मराठी अर्थशास्त्र परिषदेने अधिवेशनातील चर्चेसाठी ' खंडविषयक सिद्धान्त ' असा विषय ठेवला असला तरी तो या व्यापक अर्थाचाच द्योतक आहे असे मी समजतो आणि या व्यापक अर्थाच्या संदर्भातच मी चर्चा करणार आहे. म्हणून मी माझ्या निबंधाचा मथळा ' भाटक ( खंड ) सिद्धान्त ' असा बुद्ध्या दिला आहे.

येथे फक्त जमिनीच्या खंडाविषयीच चर्चा न करण्याचे दुसरे कारण असे की, अर्थशास्त्रीय सिद्धान्तनात प्रत्यक्षात जमिनीवर आकारला जाणारा खंड अगर घरे व गोदाम यांच्यावर आकारले जाणारे भाडे ही कशी ठरतात, कशी असतात, यांचा उलगडा करणे हे अभिप्रेत नसते. प्रत्यक्षात आकारले जाणारे खंड किंवा भाडी किंवा भाटके ही ती देणारे व घेणारे यांच्यामधील परस्पर करारांनी ठरतात. ह्या भाटकांना संविदा भाटक किंवा करार भाटक ( contract rent ) म्हणतात. विशेषतः शेतीच्या खंडासंबंधात हे भाटक जमिनीच्या मालक-कुळातील संबंधातील रूढीवरून ठरते. बटाई किंवा पीक भागीदारी पद्धतीत अर्धोली, तिर्धोली वगैरे पद्धती रूढ आहेत व त्यात जमिनीच्या उत्पादनाचा ठराविक भाग ( निम्मा, एक-तृतीयांश वगैरे ) जमीनदाराला खंड म्हणून देण्याची पद्धत आहे. युरोपातील देशातही मताये ( Matayer ) पद्धती

यांचे प्रकारची होती व आहे. अर्थशास्त्रातील भाटकविषयक चर्चा ही अशा संविदा भाटकाबद्दल नसून आर्थिक भाटक किंवा शुद्ध भाटक ( economic or pure rent ) याबद्दल असते. संविदा भाटक हे फक्त आर्थिक घटकानुसार ठरत नाही. त्यात सामाजिक, राजकीय वगैरे इतर पुष्कळ घटक असतात. आर्थिक भाटक हे फक्त आर्थिक घटकांमुळे ठरते. ते व त्याचाच विचार अर्थशास्त्रीय सिद्धान्तनात अभिप्रेत असतो. म्हणून आर्थिक भाटकासंबंधीच्या अर्थशास्त्रातील सिद्धान्तनाचा पडताळा प्रत्यक्षातील जमिनीचे खंड व घरांची वगैरे भाडी यांच्या आकड्यांच्या आधारे पाहणे चूक आहे असा इषारा अर्थशास्त्राच्या बहुतेक चांगल्या पाठ्यपुस्तकांतून दिलेला असतो.[1]

## शुद्ध भाटकाची संकल्पना

अर्थशास्त्रातील शुद्ध किंवा आर्थिक भाटकाची संकल्पना मुख्यत: समष्टीय ( macro ) स्तरावरची आहे. शुद्ध भाटक हे वाढाव्याच्या किंवा आधिक्याच्या ( surplus ) स्वरूपाचे कल्पिलेले आहे. ते अनार्जित प्रकारचे उत्पन्न म्हणून गणले गेलेले आहे. कोणत्याही उत्पादन घटकाच्या अल्पकालीन अगर दीर्घकालीन ( कायमच्या ) दुर्मिळतेमुळे त्याला एकंदर उत्पादन प्रक्रियेतील त्याच्या योगदानापेक्षा ( contribution ) वाढाव्याच्या स्वरूपाचे जे जादा उत्पन्न ( मेहनताना ) मिळते ते म्हणजे आर्थिक अगर शुद्ध भाटक अशी त्यासंबंधात अर्थशास्त्राची धारणा आहे. सनातन अर्थशास्त्रात ही संकल्पना मुख्यत: जमीन या उत्पादन घटकाच्या संदर्भात चर्चिली गेली. इतर उत्पादन घटकांच्या संदर्भात तिची प्रस्तुतता व विस्तार नंतर झाला. शुद्ध भाटकासंबंधीचे सिद्धान्तन जरी सनातन अर्थशास्त्रात पुष्कळांनी मांडले असले तरी त्याची उत्तम अभिव्यक्ती ही रिकार्डो यांनी केली व त्यासंबंधीचे सिद्धान्त त्यांच्या नावानेच ओळखले जातात. त्यांच्यापासूनच या चर्चेस सुरुवात करणे बरे.

## रिकार्डो यांचे प्रतिमान व भाटक सिद्धान्तन

रिकार्डो यांचे (व पर्यायाने सनातन अर्थशास्त्राचे) भाटकविषयक सिद्धान्तन हे पूर्णपणे समष्टीय स्तरावरील आहे. रिकार्डोपूर्वी ॲडम स्मिथ यांनी भाटकाची जरी व्यवस्थित चर्चा केली नव्हती तरी त्या प्रश्नासंबंधीची मध्यवर्ती समस्या नि:संदिग्धपणे मांडली होती.[2] समष्टीय स्तरावर भाटक हे

---

१. उदाहरणार्थ पहा : Knut Wicksell, *Lectures on Political Economy*, Vol. I, *General Theory*, London, 1934, p. 120. (Original Swedish edition published in 1911).

प्रा. ध. रा. गाडगीळ यांच्या " A Note on Agricultural Rent " in *Economic Policy and Development*, Gokhale Institute, Publication No. 30, 1955, pp. 35–43, या लेखात नेमकी हीच चूक केलेली आहे. वाई तालुक्यातील शेतीच्या व्यवसायाच्या पाहणीत जमवलेल्या माहितीच्या आधारे त्यातील कोरडवाहू, ओलिताखालची व दोन्ही प्रकार एकत्र असलेली अशा तीन प्रकारच्या शेतकी जमिनीवर आकारला जाणारा खंड हा त्या जमिनींच्या उत्पादकतेप्रमाणे कमीजास्त होतो की नाही हे त्यांनी तपासले आहे व तो तसा कमीजास्त होत नाही असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. रिकार्डोंच्या भाटक सिद्धान्तात अनुस्यूत असलेले हे तत्त्व प्रत्यक्ष प्रमाणाने शाबित ठरत नसल्यामुळे त्यांचा भाटक सिद्धान्त असिद्ध ठरतो असे प्रा. गाडगीळांनी म्हटले आहे. हा निष्कर्ष बरोबर नाही. ज्याचा उलगडा करण्याचा ते सिद्धान्तन दावा करीत नाही त्याचा उलगडा त्याने होत नाही असे सिद्ध करून ते सिद्धान्तन बाद कसे ठरणार? ते सिद्धान्तन बाद असेल परंतु वरील प्रकारच्या परीक्षेने ते बाद ठरविता येत नाही.

२. पहा : George Stigler, "Ricardian Theory of Value and Distribution", *Journal of Political Economy*, June 1952, p. 205.

वाढाव्याच्या स्वरूपाचे दिसते. परंतु व्यष्टीय स्तरावर ( म्हणजे वैयक्तिक शेतकऱ्याच्या स्तरावर ) भाटक हा जमिनीच्या अनेकविध उपयोगांमुळे उत्पादन परिव्ययाचा ( cost of production ) भाग असतो. यांचा मेळ कसा घालावयाचा हा तो मध्यवर्ती प्रश्न होय. रिकार्डो यांनी त्याच्याकडे संपूर्ण दुर्लक्ष केले व समष्टीय स्तरावरील भाटकाचाच मुख्यतः विचार केला.

रिकार्डो यांच्या प्रतिमानातील अर्थव्यवस्थेत शेतजमिनीचा उपलब्ध पुरवठा हा निसर्गाने कायमचा एकदाच ठरविलेला व त्यात बदल न होणारा आहे. या जमिनीवर एकच पीक–धान्याचे–घेतले जाते. एकाहून अधिक पिके निघत असल्यास त्या परिस्थितीत भाटक कसे ठरेल याचा त्यात विचार केलेला नाही. या निसर्गदत्त कायम ठरलेल्या जमिनीचे गुणधर्म दोन प्रकारचे कल्पून त्या त्या परिस्थितीत भाटक कसे ठरते याचा रिकार्डो वेगवेगळा विचार करतात. ( १ ) ही जमीन निरनिराळ्या कसांची–उत्पादकतेची–असली तर व ( २ ) ती सर्वत्र एकाच कसाची–म्हणजे सारख्याच उत्पादकतेची असली तर, भाटक कसे ठरेल ?

( १ ) या परिस्थितीत ' धान्य ' या एका पिकाच्या संदर्भात लागवडयोग्य जमीन ही वेगवेगळ्या कसांची असते व जमिनीचे हे कस निसर्गदत्त व अनाशिवन्त असतात. या सर्व कसांच्या जमिनींवर एकाच प्रकारच्या उत्पादनतंत्राने धान्याची लागवड केली जाते किंवा प्रत्येक कसाच्या जमिनीवर दर एकरी तेवढ्याच श्रमाच्या व भांडवलाच्या मात्रा लागवडीसाठी दिल्या जातात. अर्थव्यवस्थेत धान्याला असणाऱ्या एकुणात मागणीइतके त्याचे उत्पादन होण्यास जरूर तेवढ्या क्षेत्रफळाची जमीन धान्याच्या लागवडीखाली येते. लागवडीखाली येणाऱ्या जमिनींचा क्रम सर्वांत अधिक कसांच्या जमिनींपासून अधिकाधिक निकृष्ट कसांच्या जमिनींकडे असतो. धान्याला असणाऱ्या एकुणात मागणीच्या संदर्भात या विविध कसांच्या जमिनींपैकी कोणत्या निकृष्ट प्रतीच्या कसापर्यंतची जमीन धान्यलागवडीखाली येते ते ठरते. त्याहून कमी कसांच्या जमिनींवर धान्योत्पादनाचा खर्च ( परिव्यय ) धान्याच्या बाजारातील किमतीपेक्षा जास्त असल्यामुळे धान्याच्या लागवडीसाठी त्या उपयोगात आणणे आर्थिकदृष्ट्या आतबट्ट्याचे होते. लागवडीच्या सीमेवरील जमीन ही त्यावेळी लागवडीखाली असलेल्या निरनिराळ्या कसांच्या जमिनींमध्ये सर्वांत कमी कसाची, दर्जाची किंवा उत्पादकतेची जमीन असते. त्या जमिनीवरील धान्योत्पादनाचा खर्च ( परिव्यय ) धान्याच्या बाजारातील किमतीइतका असतो. त्यामुळे त्या सीमान्त जमिनीवर भाटक सुटत नाही. निराळ्या शब्दांत, सीमान्त जमिनीवरील भाटक शून्य असते. या जमिनीच्याहून जास्त चांगल्या कसांच्या जमिनींवर त्यांच्या अधिक उत्पादकतेमुळे धान्योत्पादनाचा खर्च बाजारातील धान्याच्या किमतीहून कमी असतो. म्हणून त्यांच्यावर भाटक अगर वाढावा सुटतो. ज्या मानाने जमिनीची उत्पादकता जास्त किंवा कस अधिक त्या मानाने त्यावर सुटणारे भाटक जास्त. जमिनीच्या उत्पादकतांप्रमाणे व त्यांच्यावर सुटणाऱ्या भाटकांच्या आकारांप्रमाणे क्रम लावल्यास ते दोन्ही क्रम एकसारखे असतात. गणिती भाषेत त्या दोन क्रमांत एक-एक संगतता ( one-to-one correspondence ) असते. धान्याच्या किमतीनुसार सीमान्त जमीन ठरते. त्या किमतीइतका त्या जमिनीवरील धान्याचा उत्पादनखर्च असतो. सीमान्त जमिनीवर भाटक शून्य असते. म्हणून भाटक हे धान्याच्या उत्पादनखर्चात समाविष्ट होत नाही. किमतीवरून भाटक ठरते. भाटकावरून किंमत ठरत नाही. जमीन निरनिराळ्या कसांची असताना निर्माण होणाऱ्या भाटकाला रिकार्डो विस्तारजन्य ( extensive ) भाटक म्हणतात.

( २ ) सर्वच जमिनींचा कस एकसारखा असला व त्यावर धान्य हे एकच पीक काढले जात असेल तर भाटक कसे ठरते ? येथे जमिनीचा कस सर्वत्र सारखा असला तरी धान्योत्पादनाचे तंत्र ( १ ) प्रमाणे सर्वत्र तेच नसते. ते निरनिराळे असते. म्हणजे दर एकरी दिल्या जाणाऱ्या श्रमाच्या व

भांडवलाच्या मात्रा यांची परस्परांशी असलेली प्रमाणे निरनिराळी असतात. एकाच्च तंत्राने सर्व उपलब्ध जमिनीचा धान्योत्पादनासाठी वापर करून अर्थव्यवस्थेत असणाऱ्या धान्याची एकुणात मागणी भागवण्या-इतके धान्य पैदा होत नसल्यामुळे जास्ती उत्पादनक्षम अशा दुसऱ्या उत्पादनतंत्रांचा वापर करून तीच्च जमीन अधिक सघन प्रकारे उपयोगात आणली जाते, म्हणजेच्च तिला दर एकरी श्रमाच्या व भांडवलाच्या अधिकाधिक मात्रा दिल्या जातात व उत्पादन वाढविले जाते. येथेही धान्याला असणाऱ्या एकुणात मागणी-नुसार त्याची किंमत ठरते व त्या किमतीइतका दर शेरी उत्पादनखर्च लागणाऱ्या तंत्राने मशागत केली जाणारी जमीन ही सीमान्त जमीन असते. त्या जमिनीवर भाटक सुटत नाही. या तंत्रापेक्षा ज्या तंत्रांत दर शेरी उत्पादनखर्च धान्याच्या किमतीपेक्षा कमी असतो त्या तंत्रांनी मशागत केल्या जाणाऱ्या जमिनींवर भाटक सुटते. या प्रकारच्या भाटकाला रिकार्डो सघनताजन्य ( intensive ) भाटक म्हणतात. त्याला तंत्रजन्य भाटकही म्हणता येईल.

रिकार्डो यांच्या भाटक सिद्धान्तनातील या सघन शेतीबद्दल थोडी अधिक चर्चा व खुलासा पुढील चर्चेच्या दृष्टीने येथेच्च करणे आवश्यक आहे. सघन शेती म्हणजे त्याच्च जमिनीला मानवी श्रम व भांडवलाच्या अधिकाधिक मात्रा देऊन अधिकाधिक एकूण उत्पादन काढणे. अशा सघन शेतीत जमिनीचे एकुणात उत्पादन वाढत असते, म्हणजे दर एकरी त्यावरच्या उत्पादनाचा दर वाढता असतो. याचे वर्णन सामान्यतः जमिनीच्या दर एकरी उत्पादकतेची किंवा तिच्या उत्पादनक्षमतेची वाढ होते असे केले जाते. हे वर्णन चूक नसले तरी अपुरे आहे. ते पुरे करण्यासाठी दर एकरी उत्पादनाचा दर वाढत असता उत्पादन परिव्यय वाढत आहे की कमी होत आहे हे सांगावे लागते. कारण अर्थशास्त्रीय विश्लेषण त्याशिवाय करता येत नाही. सुधारित उत्पादनतंत्रांच्या स्वीकारामुळे होणारी दर एकरी उत्पादकता वाढ ही दर शेरी उत्पादनखर्च वाढवणारी अगर कमी करणारी अशी दोन्ही प्रकारची असू शकते. पहिलीला परिव्ययवर्धी ( increasing cost ) व दुसरीला परिव्ययऱ्हासी ( decreasing cost ) असे म्हणतात. या दोन प्रकारच्या उत्पादकतावाढीचे आर्थिक परिणाम अगदी विरुद्ध अगर वेगवेगळ्या प्रकारचे असतात. सर्वसाधारण बोलण्यात व लिहिण्यात अर्थशास्त्रज्ञसुद्धा सुधारित उत्पादनतंत्र म्हणजे परि-व्ययऱ्हासी उत्पादकतेची वाढ करणारे ( दर एकरी उत्पादन दर अधिक व दर शेरी उत्पादनखर्च कमी ) असेच्च धरून चालतात. पण ते बरोबर नाही. दर एकरी उत्पादन दर हा दर शेरी उत्पादनखर्च वाढूनही वाढू शकतो. या दोन प्रकारांपैकी परिव्ययऱ्हासी प्रकाराच्या उत्पादकतावाढीच्या परिस्थितीत अर्थ-शास्त्रातील वाढत्या प्रत्ययाचा ( increasing returns ) सिद्धान्त लागू असतो, तर परिव्ययवर्धी उत्पादकता-वाढीच्या परिस्थितीत उतरत्या प्रत्यायाचा ( diminishing returns ) नियम लागू पडतो. एकाच्च प्रतीच्या जमिनीवर सुटणाऱ्या भाटकाचा विचार करताना ही दुसऱ्या प्रकारची उत्पादकतावाढ करणारी सघन शेती रिकार्डो यांना अभिप्रेत आहे. पहिल्या प्रकारची नाही, आणि याचे कारण उघड आहे. शेतीस उतरत्या प्रत्यायाचा नियमच्च लागू होतो हे रिकार्डो यांनी अनेक ठिकाणी सांगितले आहे व त्यांच्या प्रतिमानातील ( व सर्वच्च सनातन अर्थशास्त्रातील ) ते एक महत्त्वाचे गृहीतकृत्य आहे. तेव्हा त्या परिस्थितीला उद्देशूनच्च त्यांचे सिद्धान्तन असल्यास त्यात नवल ते काय ?[3]

रिकार्डो यांनी आपल्या प्रतिमानाच्या चौकटीत वर वर्णिलेल्या दोन प्रकारच्या भाटकांचे

३. " शेतकीतील वाढत्या प्रत्यायाच्या परिस्थितीत भाटक उद्भवणारच्च नाही " हा मुद्दा येथे नोंदवून ठेवतो. त्याची अधिक चर्चा पुढे केलेली आहे. परंतु रिकार्डो यांनी यासंबंधात कोणताच्च विचार केलेला नाही, कारण अशा प्रकारची परिस्थिती शेतकीत उद्भवेल असा संभवसुद्धा त्यांच्या ध्यानीमनी नव्हता.

विश्लेषण केले असले तरी तत्त्वत: भाटकांचे हे दोन्ही प्रकार त्याच गुणधर्मांचे म्हणजे विभेदजन्यच (differential) आहेत. रिकार्डो ज्याला विस्तारजन्य भाटक म्हणतात ते भाटक जमिनीच्या कसांच्या निसर्गदत्त विभेदातून निर्माण होते, तर सघनताजन्य भाटक हे लागवडीच्या तंत्रांच्या विभेदातून निर्माण होते आणि या दोन्ही विभेदजन्य भाटकांच्या उत्पत्तीत शेतकीतील आऱ्हासी प्रत्यायाचा सिद्धान्त अवश्य (necessary) व पर्याप्त (sufficient) कारण म्हणून अनुस्यूत आहे. विस्तारात्मक आऱ्हासी प्रत्यायाचा प्रकार पहिल्यात व सघनात्मक आऱ्हासी प्रत्यायाचा प्रकार दुसऱ्यात अनुस्यूत आहे. आऱ्हासी घटक प्रत्यायाच्या सिद्धान्ताचेच हे दोन भाग आहेत व ते अंतिमत: जमिनीच्या न बदलणाऱ्या व निसर्गदत्त ठराविक पुरवठ्यावर अवलंबून आहेत. म्हणून रिकार्डो यांची भाटक मीमांसा जरी मुख्यत: विभेदजन्य स्वरूपाचीच आहे असे वाटले तरी ती अंतिमत: दुर्मिळताजन्यच आहे हे ध्यानात घ्यावयास हवे.[४]

रिकार्डो यांचे भाटकासंबंधीचे हे विवेचन त्यांच्या प्रथम वर्णिलेल्या प्रतिमानाच्या चौकटीपुरतेच मर्यादित आहे. त्या प्रतिमानाच्या मर्यादा या रिकार्डो यांच्या सिद्धान्तनाच्याही मर्यादा आहेत.

**नवसनातन अर्थशास्त्रातील भाटक सिद्धान्त**

सनातन अर्थशास्त्रात रिकार्डो यांचा भाटक सिद्धान्त स्वीकृत झाला व त्यानंतर त्यात फारसा फरक झाला नाही. त्या सिद्धान्तनाच्या वास्तवतेबद्दल व तर्कशुद्धतेबद्दल सीमान्त विचारसरणीच्या आधाराने नवसनातन अर्थशास्त्राने आक्षेप घेतले व आपला नवा भाटक सिद्धान्त मांडला. नवसनातन अर्थशास्त्रातील सर्वच विवेचनाच्या बाजाप्रमाणे भाटकाबद्दलचे विवेचनही पूर्णपणे व्यष्टीय स्तरावर आहे. व्यष्टीय स्तरावरून रिकार्डो यांच्या पूर्णपणे समष्टीय स्तरावरच्या भाटक सिद्धान्ताला सहज आक्षेप घेता येतात. भाटक हे अंतिमत: उतरत्या अगर घटत्या प्रत्यायाच्या (फळाच्या) प्रवृत्तीमुळे उत्पन्न होते (व ही प्रवृत्ती जमिनीचा पुरवठा सर्वकाळ एकच व मर्यादित असल्यामुळे निर्माण होते) हे रिकार्डो यांच्या भाटक मीमांसेतील पायाभूत गृहीतक नवसनातन अर्थशास्त्राने त्याज्य ठरविले. व्यष्टीय पातळीवर सर्वच उत्पादन घटकांप्रमाणे जमिनीचा पुरवठाही अल्पकाळात तात्पुरता मर्यादित पण दीर्घकाळात लवचिक असतो. त्याला वेगळे वैशिष्ट्य नसते. इतर उत्पादक घटकांना जसा त्यांच्या उत्पादन प्रक्रियेतील वापराप्रमाणे व त्यांच्या उत्पादनातील योगदानाप्रमाणे मेहनताना मिळतो तसाच जमिनीलाही मिळतो. भांडवलावरचे व्याज, श्रमाबद्दलची मजुरी व जमिनीचा खंड (भाटक) हे गुणवत्तेत अगदी सारखे आहेत. खंड हा अनार्जित उत्पन्नासारखाच वाढाव्याच्या स्वरूपाचा असतो हे रिकार्डोप्रभृती सनातन अर्थशास्त्रज्ञांचे म्हणणे चूक आहे. इतर उत्पादन घटकांप्रमाणेच उत्पादन प्रक्रियेतील जमिनीच्या सीमान्त उत्पादकतेप्रमाणे तिचा मेहनताना अथवा खंड (भाटक) ठरतो. जमिनीच्या सीमान्त उत्पादकतेवरून तिची अनुज्ञात सीमान्त उपयोगिता ठरते व त्यावरून जमिनीच्या विविध उपयोगांसाठी तिला अर्थव्यवस्थेत असणारी मागणी ठरते. जमिनीचे अनेकविध उपयोग असतात व केले जातात. शेतीच्या जमिनीवरसुद्धा रिकार्डो यांच्या प्रतिमानात गृहीत धरल्याप्रमाणे धान्याचे एकमेव पीक घेतले जात नाही तर अनेक निरनिराळी पिके घेतली जातात. कोणत्याही जमिनीचे जे अनेक निरनिराळे उपयोग असतील त्यात तिची असणारी अनुज्ञात उपयोगिता—तिच्या त्या त्या उपयोगातील सीमान्त उत्पादकतेवर आधारलेली—सर्वत्र सारखी झाली म्हणजे तिची त्या निरनिराळ्या उपयोगांत सर्वात कार्यदक्ष व उत्पादक अशी विल्हे होते आणि त्या सीमान्त उपयोगितेवरून जमिनीचा खंड ठरतो. खंड हा वाढाव्याच्या स्वरूपाचा असतो व तो उत्पादनखर्चात समाविष्ट नसतो हे रिकार्डोप्रभृतींचे म्हणणे बरोबर नाही. व्यष्टीय दृष्टीने

४. A. Marshall, *Principles of Economics*, 8th Edition, p. 422.

विचार करता व जमिनीचे विविध उपयोग लक्षात घेता जमिनीचा एकुणात पुरवठा जरी कायमचा मर्यादित असला तरी जमिनीचा कोणताही उपयोग करणाऱ्या अर्थव्यवहारकाला तो इतर उत्पादन घटकांच्या-प्रमाणेच लवचिक वाटतो व त्यासाठी चढाओढ असते असेच म्हणणे जास्त वास्तव आहे. त्यामुळे जमिनीच्या वापरासाठी द्यावयाचे भाटक ( खंड ) हा त्याच्या उत्पादन परिव्ययाचा ( खर्चाचा ) भाग असणे हेही जास्त वास्तव आणि स्वाभाविक आहे. म्हणून जमिनीचे भाटकही तिच्या सीमान्त उपयोगितेवरूनच ठरते.

सीमान्तवाद्यांचा भाटक सिद्धान्त मांडताना शुंपीटर यांनी म्हटले आहे : " सनातन अर्थशास्त्रातील भाटक सिद्धान्त धान्याची किंमत भाटकाच्या स्वतंत्रपणे ठरते असे गृहीत धरतो हा त्याच्यावर सर्वात बलवत्तर असा आमचा आक्षेप आहे. एकदा धान्याची विशिष्ट किंमत गृहीत धरली की धान्याची लागवड ( उत्पादन ) कोणत्या प्रतीच्या जमिनीपर्यंत पसरेल, लागवडीच्या सीमेवरील जमीन कोणती असेल व धान्योत्पादनाचा सीमान्त उत्पादनखर्च—हा किमतीइतका असतो—किती हेही आपोआपच ठरते. धान्याची किंमत गृहीत धरली नाही तर हे ठरविता येणार नाही. शिवाय धान्याची विशिष्ट किंमत गृहीत धरावयाची म्हणजे जमिनीची तिच्या त्या वेळच्या अर्थव्यवस्थेत असलेल्या अनेकविध उपयोगांत एक प्रकारची विल्हे झालेली आहे—धान्य व इतर उपयोग यांच्यात—हे गृहीत धरण्यासारखेच आहे; तशी ती धरली नाही तर त्याहून कमी अगर जास्त जमीन धान्याच्या लागवडीखाली असण्याचा संभव निर्माण होईल, त्यामुळे धान्याचे उत्पादन कमीजास्त होण्याचा व धान्याची किंमतही जास्तकमी होण्याची शक्यता निर्माण होईल. धान्याची किंमत बदलली तर सीमान्त जमीन व धान्योत्पादनाचा सीमान्त उत्पादनखर्चही बदलेल. खरोखर जमिनीची विल्हे तिच्या निरनिराळ्या उपयोगांत कशी झाली आहे हे गृहीत धरल्यावर भाटकाचा आणखी उलगडा तो काय करावयाचा ? ज्याचा उलगडा करावयाचा तेच सनातन अर्थशास्त्राच्या भाटक सिद्धान्तनाच्या गृहीतकात समाविष्ट केलेले आहे, त्यामुळे ते मुळी खरे सिद्धान्तनच नव्हे. "[५]

## आधुनिक सिद्धान्तनातील गोंधळ

याप्रमाणे कट्टर सीमान्तवाद्यांनी व त्यांच्या नवसनातन अवतारांनी रिकार्डोची भाटक मीमांसा त्याज्य ठरविली, परंतु त्यांना ती सर्वस्वी सोडताही येईना व तिच्या जागी नवीन मीमांसा सर्वस्वी बसवताही येईना. त्यामुळे आधुनिक अर्थशास्त्रातील भाटक सिद्धान्तनात गोंधळाची परिस्थितीच दृष्टीस पडते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे मार्शल. सनातन आणि सीमान्तवादी भाटक सिद्धान्तांचा समन्वय करण्याच्या खटपटीत मार्शल यांनी या विषयात फार मोठे गोंधळ निर्माण करून ठेवलेले आढळतात.

प्रथमत: या विषयाच्या चर्चेच्या अनुषंगाने मार्शल यांनी अजाणता एक मोठा गोंधळ निर्माण करून ठेवला किंवा असलेला गोंधळ अधिक माजवला. रिकार्डो यांनी लागवडीच्या सीमेवरील जमिनीचे वर्णन करण्यासाठी ' सीमान्त ' ( margin ) असे जे विशेषण तिला लावले होते ती संज्ञा मार्शल यांनी सीमान्तवादी विचारसरणीतील अगदी निराळ्या अर्थाच्या ' सीमान्त ' या संकल्पनेसाठी सुचविली व वापरली. ज्याला सीमान्तवादी जेव्हन्स यांनी ' अंतिम ' ( final ) अशी संज्ञा सुचविली व वापरली होती त्यालाच मार्शल यांनी ' सीमान्त ' ही संज्ञा सुचविली व ती सर्वत्र वापरात आली. त्यामुळे रिकार्डो यांची

---

५. पहा : J. Schumpeter, " Das Wesen und der Hauptinhalt der theoretischen Nationaloekonomie." quoted by Brij Narain, *Tendencies in Recent Economic Thought*, Delhi University, 1934, pp. 70–73.

'सीमान्त जमिनी'ची संकल्पना व सीमान्तवाद्यांची सीमान्ताची संकल्पना या संज्ञा सादृष्यामुळे एकाच अर्थाच्या समजल्या गेल्या व त्यातून अनेक गोंधळ निर्माण झाले.

तसे पाहिले तर या अर्थाच्या घोटाळ्याचे स्वरूप अगदी साधे आहे. रिकार्डो यांच्या प्रतिमानात निरनिराळ्या कसांच्या लागवडीखालील जमिनींपैकी सर्वात निकृष्ट कसाची जमीन ही सीमान्त जमीन असे मानले आहे. या जमिनीवर भाटक शून्य असते, कारण तिच्यावर धान्योत्पादनाचा खर्च बाजारातील धान्याच्या किंमतीइतका असतो. येथे जमिनी वेगवेगळ्या कसांच्या आहेत, एकजिनसी नाहीत. सीमान्त विचारसरणीतील 'सीमान्ताची' संकल्पना विकलन गणितातील. ती फक्त एकजिनसी घटितांनाच लावता येते. उदाहरणार्थ, सीमान्त उपयोगितेच्या विवेचनात कोणत्याही विशिष्ट वेळी क्रमाने सेवन केल्या जाणाऱ्या कोणत्याही भोग्य वस्तूच्या मात्रा या अगदी एकजिनसी आहेत असे मानावे लागते. उदाहरणार्थ, चाकोलेट, सफरचंद वगैरे. एका वेळी अनुक्रमाने सेवन केलेल्या मात्रांपैकी कोणतीही मात्रा कोणत्याही क्रमांकाची असण्याची शक्यता गृहीत धरावी लागते. त्या सर्व मात्रा एकजिनसी असल्यामुळे तसे गृहीत धरता येते; म्हणूनच त्यांपैकी कोणतीही मात्रा सीमान्त मात्रा होऊ शकते व सीमान्त उपयोगितेवरून ठरलेली किंमतच सर्व मात्रांना—त्यांच्या उपयोगिता जास्त असूनसुद्धा—लागू पडते. म्हणूनच सीमान्त उपयोगितेची व्याख्या करताना सीमान्त उपयोगिता ही सेवन केल्यापैकी शेवटच्या मात्रेची उपयोगिता नसून त्या मात्रेमुळे तोपर्यंत सेवन केलेल्या मात्रांच्या एकुणात उपयोगितेत जी भर पडते ती होय अशी करावी लागते. ही सीमान्ताची संकल्पना व रिकार्डो यांच्या 'सीमान्त जमिनीतील' सीमान्ताची संकल्पना या अगदी निराळ्या आहेत. त्यामुळे जमिनीच्या संबंधात सीमान्त विचारसरणीस पायाभूत असलेली 'सीमान्ताची' संकल्पना वापरणे अशास्त्रीय आहे, चूक आहे. कट्टर सीमान्तवाद्यांनी अशी चूक केली नाही व विकस्टीड यांनी तर त्याकडे मुद्दाम लक्ष वेधले होते.[६] पण मार्शल यांच्या विवेचनात ही चूक खोलवर रुजलेली आहे. वर निर्देशिलेला बारकावा त्यांच्या विवेचनात कोठेही नोंदलेला नाही व त्यांच्या विवेचनातील गोंधळावरून हा फरक त्यांच्या ध्यानात तरी आला होता की नाही याची शंका वाटते.

मार्शल यांच्या विवेचनातला दुसरा गोंधळ "भाटक हे उत्पादन परिव्ययात समाविष्ट होत नाही," हा रिकार्डो यांचा समष्टीय स्तरावरील सिद्धान्त आणि भाटक हे इतर सर्व उत्पादक घटकांच्या-प्रमाणे त्यांच्या उत्पादन प्रक्रियेतील योगदानाबद्दल मिळालेला मेहनताना असल्यामुळे उत्पादन परिव्ययात समाविष्ट होते, हा सीमान्तवाद्यांच्या व्यष्टीय स्तरावरचा सिद्धान्त यांचा एकमेकांशी मेळ घालण्याच्या

६. जमिनीला सीमान्त संकल्पना लावणे हे अशास्त्रीय व म्हणून चूक आहे हे विक्स्टीड यांनी "The Scope and Method of Political Economy in the Light of Marginal Theory of Value and Distribution", *Economic Journal*, March 1914 या लेखात विस्तृतपणे मांडले आहे. हा लेख त्यांच्या *The Commonsense of Political Economy*, Vol. II, London, 1933, या पुस्तकात पुनर्मुद्रित केलेला आहे.

परंतु हा धोक्याचा इषारा दुर्लक्षून अशी चूक पुष्कळांनी केली आहे. अगदी अलीकडचे उदाहरण द्यावयाचे तर कॅल्डॉर यांचे देता येईल. त्यांच्या "Alternative Theories of Distribution" या निबंधात हे स्पष्टपणे दिसते. त्या लेखातील एका पदटीपेत कॅल्डॉर यांनी म्हटले आहे : "मूल्यांचा उपयोगिता सिद्धान्त म्हणजे खरोखरी भोग्य वस्तूंच्या मागणीला लावलेला रिकार्डो यांचा भाटक सिद्धान्तच होय." हे सर्वस्वी चूक आहे हे सांगणे नकोच. पहा : N. Kaldor, *Essays in Value and Distribution*, London, 1960, pp. 210–236. येथे हा लेख पुनर्मुद्रित केलेला आहे. वर उद्धृत केलेले वाक्य असलेली पदटीप पान २११ वर आहे.

खटपटीत निर्माण झालेला आहे. निरनिराळ्या परिस्थितीत व वेगवेगळ्या दृष्टिकोणांतून हे दोन्ही सिद्धान्त बरोबर आहेत हे त्यांना जाणवत असावे; परंतु त्यांच्या मुळाशी असणाऱ्या समस्या त्यांना स्पष्टपणे न जाणवल्यामुळे म्हणा अगर अन्य कारणाने म्हणा दोन्हीही सिद्धान्त खरे आहेत आणि खरे नाहीत अशी काहीशी गोंधळाची भूमिका मार्शल यांनी घेतलेली दिसते. १९०२ साली या विषयावर एजवर्थ यांना लिहिलेल्या पत्रात हे अगदी स्पष्टपणे नजरेस येते. मार्शल लिहितात : " 'भाटक उत्पादनखर्चात समाविष्ट नसते' असे न म्हणणे सर्वात शहाणपणाचे होय, कारण तसे केले नाही तर त्यामुळे पुष्कळांचा घोटाळा होईल. परंतु 'उत्पादनखर्चात भाटक समाविष्ट होते' असे म्हणणे तर्कदुष्टपणाचे आहे, कारण, कितीही सूक्ष्म असली तरी जी सूक्ष्म सत्ये शास्त्रीयदृष्ट्या व जगाच्या कल्याणाच्या दृष्टीने फार महत्त्वाची आहेत त्यांचा इन्कार करण्यासाठी अशा विधानाचा उपयोग खात्रीपूर्वक केला जाईल."[७] याबद्दल अधिक काय म्हणावे ?

## स्राफा सिद्धान्तनातील भाटक मीमांसा

मार्शल यांच्या वरील प्रकारच्या गोंधळाच्या विवेचनातून निर्माण झालेली परिस्थिती बरीच वर्षे तशीच चालली. रिकार्डो यांच्या मर्यादित प्रतिमानाची गृहीतके शिथिल करून व समष्टीय व व्यष्टीय दृष्टिकोनांचा नीट समन्वय करून एकात्म व वास्तव असे भाटक सिद्धान्तन अद्यापही निर्माण झालेले नाही. अलीकडेच स्राफा यांनी सनातन अर्थशास्त्राच्या चौकटीत पण त्यातील काही गृहीतकृत्यांना रजा देऊन नवीन प्रकारे भाटक सिद्धान्तन मांडण्याचा प्रयत्न केला आहे. प्रगतिमार्गावरचे हे पुढचे पाऊल असले तरी स्राफा यांची मांडणीही समष्टिय स्तरावरच आहे हे लक्षात ठेवले पाहिजे.

सनातन अर्थशास्त्राप्रमाणेच स्राफा हे प्रथम जमीन या उत्पादन घटकाचे इतर उत्पादन घटकांच्या तुलनेतील निराळेपण व वैशिष्ट्य नव्या दृष्टीने पुनर्घोषित करतात : अर्थव्यवस्थेतील सर्व उत्पादक प्रक्रियेचा विचार केला तर जमीन ही अशी एकच वस्तू आहे की जी स्वतःखेरीज इतर पदार्थांच्या उत्पादनात निविष्टी (आदान, input) म्हणून येते; परंतु जी स्वतः अपुनरुत्पादनीय (irreproduceable) असल्यामुळे उद्विष्टी (प्रदान, output) म्हणून येऊ शकत नाही. अर्थव्यवस्थेच्या एकुणात निविष्टी-उद्विष्टी (आदान-प्रदान) कोष्टकात जमीन निविष्टीच्या बाजूस दाखविली जाते, पण उद्विष्टींच्या बाजूस ती तिच्या अपुनरुत्पादनीयतेमुळे दाखविता येत नाही. अर्थव्यवस्थेच्या आपल्या प्रतिमानात अर्थव्यवस्थेत निर्माण होणाऱ्या वस्तूंचे स्राफा दोन गटांत वर्गीकरण करतात. मूलाधार (basic) वस्तू आणि अतिरिक्त (non--basic) वस्तू. मूलाधार वस्तू सर्व वस्तूंच्या उत्पादनात प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष निविष्टी (आदान) म्हणून लागणाऱ्या असतात. अतिरिक्त वस्तू किमान एक मूलाधार वस्तू व इतर अतिरिक्त वस्तू यांच्या

---

७. Letter to Edgeworth, dated August 28, 1902, in A. C. Pigou, *Memorials of Alfred Marshall*, 1925, p. 436.

मार्शल यांचे भाटकासंबंधीचे विवेचन गोंधळाचे आहे हे रॉबर्टसन् यांनीही अधोरेखित केले आहे. मार्शल यांच्या प्रसिद्ध पाठ्यपुस्तकातील ४३६ पानावरील पदटीपेत अर्थाप्रमाणे जेथे ओटस् पाहिजे तेथे मार्शल हॉप्स लिहितात याकडे रॉबर्टसन् यांनी लक्ष वेधले आहे. D. H. Robertson, *Lectures on Economic Principles*, Vol. II, pp. 40–45.

८. P. Sraffa, *Production of Commodities by Means of Commodities, Prelude to a Critique of Economic Theory*, Indian Edition, Vora & Co., Bombay, 1963. Chapter XI, Land, pp. 88–96.

संयोगाने निर्माण होतात. परंतु मूलाधार वस्तूंच्या उत्पादनात कोणतीही अतिरिक्त वस्तू निविष्टी (आदान) म्हणून लागत नाही. त्यामुळे मूलाधार वस्तूंच्या विनिमय मूल्यांत फरक पडला तर तो सर्व उत्पादित वस्तूंच्या विनिमय मूल्यांवर परिणाम केल्याशिवाय राहात नाही. अतिरिक्त वस्तूंच्या विनिमयमूल्यांतील फरकाचा इतर वस्तूंच्या विनिमय मूल्यांवर कोणताच परिणाम होत नाही. म्हणून मूल्यांचे अविचल माप सिद्ध करताना फक्त मूलाधार वस्तूंचेच ते बनवावे लागते. अर्थव्यवस्थेत उत्पादन होणाऱ्या वस्तूंच्या या दोन गटांपैकी जमीन ही कोणत्या वर्गात पडते ? सकृतदर्शनी चमत्कारिक वाटले तरी जमीन ही अतिरिक्त वस्तूंच्या गटात पडते. अतिरिक्त वस्तू पुनरुत्पादनीय असल्या तरी त्या सर्व वस्तूंच्या उत्पादनात लागत नाहीत. जमीन ही सर्व वस्तूंच्या उत्पादनात लागते, परंतु ती अपुनरुत्पादनीय आहे. म्हणजे अतिरिक्त वस्तूंच्या संकल्पनेची विलोम किंवा व्यत्यास ( converse ) संकल्पना जमिनीला लागू पडते.[10] म्हणून जमीन ही मूलाधार वर्गात न पडता अतिरिक्त वस्तूंच्या वर्गात समाविष्ट होते. याचा परिणाम जमिनीच्या विनिमय मूल्यांचा व म्हणून तिच्यावरील भाटकाचा अर्थव्यवस्थेतील इतर वस्तूंच्या विनिमय मूल्यांवर काहीही परिणाम होत नाही. इतर विनिमय मूल्ये स्वतंत्रपणे ठरतात. त्यांच्यामुळे जमिनीचे भाटक ठरते. भाटकावरून इतर विनिमय मूल्ये ठरत नाहीत. सनातन अर्थशास्त्रातील जमिनीच्या भाटकासंबंधीचा हा सिद्धान्त स्राफा नव्या रीतीने अशा प्रकारे पुनर्वोधितात.

यानंतर रिकार्डोप्रमाणेच दोन निरनिराळ्या गृहीतकृत्यांच्या संदर्भात स्राफा जमिनीवरील भाटकाच्या विवेचनाचा उपन्यास करतात.

( १ ) जमीन विविध प्रतींची वा कसांची असली, धान्य हे एकच पीक तिच्यावर घेतले जात असले व उत्पादनाचे तंत्र सर्वत्र एकच असले तर जमिनीच्या निसर्गदत्त व अनाशिवन्त उपजाऊपणाच्या श्रेणीप्रमाणे त्या जमिनींवर सुटणाऱ्या भाटकांची श्रेणी असेल व त्या दोन्ही श्रेणींमध्ये एक-एक संगतता असेल हे या संदर्भातले रिकार्डो यांचे विवेचन आपण पूर्वी पाहिले आहे. स्राफा आपल्या प्रतिमानात रिकार्डो यांची पहिली दोन गृहीतकृत्ये तशीच ठेवतात, परंतु तिसरे शिथिल करून जेवढ्या प्रकारच्या ( कसांच्या ) जमिनी तेवढ्या उत्पादनपद्धती ( methods of production ) किंवा तंत्रे अस्तित्वात आहेत असे समजतात. उत्पादनपद्धती याचा येथे अर्थ त्यात अनुस्यूत असलेल्या मानवी श्रमाच्या व भांडवलाच्या मात्रांचे परस्परांशी प्रमाण असा स्थूलमानाने करता येईल. अनेक उत्पादनपद्धती अस्तित्वात आहेत असे गृहीत धरून स्राफा आपले प्रतिमान रिकार्डोपेक्षा जास्ती वास्तव व विस्तृत करतात. निरनिराळ्या प्रकारच्या जमिनींपैकी लागवडीखाली सर्वात निकृष्ट प्रकारच्या जमिनीवर धान्योत्पादनाचा दर शेरी खर्च धान्याच्या बाजारातील किंमतीइतका असतो व त्या जमिनीवर भाटक शून्य असते. स्राफा शून्य भाटक असलेली जमीन असाच उल्लेख सर्वत्र करतात. ' सीमान्त जमीन ' ही चुकीची संज्ञा कोठेही वापरीत नाहीत.

रिकार्डो यांच्या प्रतिमानातील एकच गृहीतकृत्य स्राफा शिथिल करतात असे वर म्हटले आहे; परंतु स्राफा व रिकार्डो यांच्या प्रतिमानांत एवढाच फरक नाही. आणखी एक फार महत्त्वाचा फरक आहे. रिकार्डो यांचे भाटक चर्चेतले प्रतिमान हे अर्थव्यवस्थेतील सर्व उत्पादन व इतर आर्थिक व्यवहार यांच्या संदर्भात

९. यासंबंधीचा अधिक खुलासा माझ्या "अर्थशास्त्र सिद्धान्तनातील नवीन परिवर्तन" या *अर्थसिद्धान्त, आणखी चिकित्सक निबंध*, मराठी अर्थशास्त्र परिषद, प्रकाशन पहिले, १९७७, पा. २९–७७ येथे पहा.

१० विलोम किंवा व्यत्यास ( converse ) म्हणजे व्यस्त किंवा प्रतिलोम ( inverse ) नव्हे. उदाहरणार्थ " सर्व मानव प्राणी असतात " या विधानाचा विलोम किंवा व्यत्यास " काही प्राणी मानव असतात " हा आहे. त्या विधानाचा प्रतिलोम " सर्व प्राणी मानव असतात " हा आहे.

नसून त्यातील शेतकीच्या उत्पादनाच्या सीमित संदर्भातच आहे. त्याचा बिगरशेतकी व्यवहारांशी संबंध धान्याच्या किमतीवर एकंदर अर्थव्यवस्थेतील मजुरीचा दर अवलंबून असतो एवढाच व अप्रत्यक्ष असा आहे. धान्याला असणारी मागणी ही लोकसंख्येच्या वाढीमुळे सारखी वाढत असते हे शेतकीबाहेरील गृहीतकृत्य सोडले तर धान्याची किंमत अत्यंत निकृष्ट प्रकारच्या लागवडीखालील जमिनीवरील धान्याच्या उत्पादनखर्चावरून ठरते असेच रिकार्डो यांच्या प्रतिमानात मानले आहे. अर्थव्यवस्थेतील इतर उत्पादने, त्यांच्या किमती, त्यांना असणारी मागणी वगैरे गोष्टींचा त्याच्याशी कोणताही संबंध आहे असे मानलेले नाही. या सीमित संदर्भामुळे रिकार्डो यांचे भाटक विवेचनही फार संकुचित होते हे ओळखून स्राफा आपले प्रतिमान व विवेचन अर्थव्यवस्थेतील सर्व व्यवहारांच्या विस्तृत संदर्भात करतात. धान्याची किंमत व त्याच्या उत्पादनाच्या पद्धती या पद्धत या सर्व अर्थव्यवस्थेतील सर्व उत्पादन-विभाजन प्रक्रियांच्या संदर्भात एकसमयावच्छेदे ठरतात व परस्परांशी सुसंबद्धरीतीने ठरतात असे ते मानतात. त्यामुळे त्यांचे भाटकासंबंधीचे सिद्धान्तन रिकार्डो यांच्यापेक्षा वेगळे होते हे निराळे सांगावयास नको.

अशा विस्तृत संदर्भात स्राफा यांच्या प्रतिमानात अर्थव्यवस्थेतील नफ्याचा दर व वेतनदर ठरतो, त्या अनुषंगाने अर्थव्यवस्थेतील उत्पादनाची भांडवलदार, कामगार इत्यादी वर्गावर्गातली विभागणी ठरते व त्याचबरोबरच अर्थव्यवस्थेतील सर्व विनिमय मूल्ये ठरतात. प्रत्येक नफ्याचा दर आणि त्याच्या जोडीने असणारा वेतनदर यांच्या संदर्भात निरनिराळे विनिमय मूल्यांचे सट ( set ) अर्थव्यवस्थेत अस्तित्वात येतात. या प्रत्येक सटात धान्याची किंमत वेगवेगळी असू शकेल. त्या विनिमय मूल्याइतका दर शेरी धान्य उत्पादनखर्च ज्या जमिनीवर होत असेल त्या जमिनीवर भाटक शून्य असते. त्याहून दर शेरी कमी उत्पादनखर्च येणाऱ्या जमिनीवर निरनिराळ्या दराने भाटक सुटते.

आणि या उत्पादनखर्चात शेतकी व्यवसायात सुटणाऱ्या नफ्याचा समावेश असतो. अर्थव्यवस्थेतील सर्व उत्पादनात नफ्याचा दर सारखाच असतो आणि त्याप्रमाणे तो शेतकी व्यवसायातही असलाच पाहिजे. याचा परिणाम असा होतो की, स्राफा प्रतिमानात लागवडीखालील निरनिराळ्या प्रकारच्या जमिनींवरील धान्याचा उत्पादनखर्च हा नफ्याच्या दरातील बदलामुळे बदलणारा असतो. याचे कारण उघड आहे. प्रत्येक उत्पादनपद्धती म्हणजे स्थूलमानाने तिच्यातील भांडवलाच्या[११] व मानवी श्रमाच्या मात्रांचे परस्परांशी प्रमाण. हे प्रमाण जसे कमीजास्त असेल त्या मानाने नफ्याच्या दरातील व त्याच्या अनुषंगाने वेतनदरातील फरकाप्रमाणे उत्पादनखर्च वाढेल अगर कमी होईल. नफ्याचा दर वाढला तर ज्या उत्पादनपद्धतीत भांडवलांच्या मात्रांचे प्रमाण श्रमांच्या मात्रांच्या मानाने जास्त आहे त्यांचा उत्पादनखर्च वाढेल तर ज्यांच्यात ते प्रमाण कमी आहे त्यांचा त्या मानाने वाढणार नाही. याउलट तो कमी झाल्यास ज्या उत्पादनपद्धतीत भांडवलांच्या मात्रांचे प्रमाण जास्त आहे त्यात उत्पादनखर्च कमी होईल. उत्पादनखर्चातील या चढ-उतारांचा निरनिराळ्या जमिनींत वापरण्यात येणाऱ्या उत्पादनपद्धतींशी निकटचा संबंध आहे. त्यांच्या नैसर्गिक उपजाऊपणाशी व कसाशीच फक्त नाही हे येथे समजावून घेणे आवश्यक आहे. रिकार्डो यांच्या प्रतिमानात उत्पादनखर्चाचा संबंध फक्त जमिनीच्या नैसर्गिक व अनाशिवन्त उपजाऊपणाशीच आहे. त्यामुळे त्यांच्या भाटक सिद्धान्तात जमिनीची भाटकाप्रमाणे लावलेली श्रेणी व त्यांच्या कसाप्रमाणे लावलेली श्रेणी यांच्यात एक-एक संगतता असते हे आपण पूर्वी नोंदलेले आहे. स्राफा प्रतिमानात तसे होत नाही. कारण येथे भाटक हे जमिनीच्या नैसर्गिक उत्पादकतेवर अवलंबून नसून तिच्या व्यापक संदर्भातील

११. स्राफा " भांडवल " अशी संज्ञा वापरीत नाहीत. ' मानवी श्रमाव्यतिरिक्त निविष्टी ( आदाने ) ' असा शब्दप्रयोग करतात. येथे नेहमीच्या माहितीतली म्हणून भांडवल ही संज्ञा मी वापरली आहे.

'आर्थिक' उत्पादकतेवर अवलंबून असते. अर्थव्यवस्थेतील सर्व आर्थिक व्यवहार, उत्पादन वगैरे क्रियांच्या संदर्भात ही आर्थिक उत्पादकता ठरते आणि ही 'आर्थिक उत्पादकता' निसर्गदत्त उत्पादकतेप्रमाणे एकदाच कायमची ठरलेली नसून आर्थिक व्यवहारांच्या बदलत्या ओघात बदलणारी असते. ती बदलती असल्यामुळे रिकार्डो यांच्या प्रतिमानातल्याप्रमाणे ज्या जमिनीवर भाटक शून्य असते ती जमीन जिला निसर्गाने कायमच निकृष्ट कस दिलेला आहे अशी एकच एक नसून निरनिराळया कसांच्या उपलब्ध जमिनींपैकी कोणत्याही उत्पादनपद्धतीने लागवडीस आणलेली तिच्या बदलत्या 'आर्थिक' उत्पादकतेनुसार कोणतीही असू शकते. कोणत्याही एका वेळी ज्या विशिष्ट जमिनीवर भाटक शून्य असेल ती त्या वेळच्या परिस्थितील सर्वांत कमी 'आर्थिक' उत्पादकता असलेली जमीन असे म्हणता येईल. किंबहुना भाटक शून्य असणे हेच तिची 'आर्थिक' उत्पादकता सर्वांत निकृष्ट आहे याचे लक्षण म्हणता येईल.[१२]

( २ ) सर्व जमीन जर एकसारख्या कसाची असली व अर्थव्यवस्थेतील एकुणात धान्य-मागणीच्या संदर्भात तिचा उपलब्ध पुरवठा अपुरा असला—म्हणजे निराळया शब्दांत प्रचलित उत्पादनपद्धतीमुळे उपलब्ध जमिनीत उत्पन्न होणारे धान्य त्याला अर्थव्यवस्थेत असणाऱ्या एकुणात मागणीपेक्षा कमी असले— तर धान्याचे उत्पादन जरूर त्या पातळीपर्यंत वाढवावयासाठीं प्रचलित उत्पादनपद्धतीहून अगर तंत्राहून अधिक उत्पादक तंत्र अगर पद्धती स्वीकारणे भाग पडेल. अशी नवी पद्धती एकदम सर्वत्र सुरू न होता हळूहळू सर्वत्र पसरत जाईल. त्यामुळे एकाच वेळी उपलब्ध जमिनीवर दोन पद्धतींनी धान्याचे उत्पादन केले जाईल. ही दुसरी अधिक उत्पादक पद्धती सर्व जामिनीवर हळूहळू स्वीकृत झाली व त्यामुळे वाढलेल्या धान्याच्या एकुणात उत्पादनापेक्षाही धान्याची एकुणात मागणी जास्त झाली तर या दुसऱ्या उत्पादन पद्धतीहून अधिक उत्पादक अशी तिसरी उत्पादक पद्धती प्रचारात येईल व दुसऱ्या पद्धतीप्रमाणे तीही हळूहळू सर्व जमिनीवर पसरेल. या वेळीही पुन्हा दोन पद्धतींनीच धान्याचे उत्पादन होईल. याप्रमाणे धान्याचे उत्पादन जरी सारखे वाढते राहिले तरी उत्पादनतंत्रे मात्र मधून मधूनच बदलतील. मात्र हा तंत्रबदलाचा क्रम अधिकाधिक उत्पादक पण परिव्ययवर्धी तंत्रांकडे राहील. थोडक्यात ही उत्पादकता-वाढ परिव्ययवर्धी प्रकारची असेल.

रिकार्डो यांच्या विश्लेषणातही हाच क्रम मानण्यात आलेला आहे याची आपण पूर्वी दखल घेतलेली आहे. तंत्रबदलाचा हा क्रम असा असणे हे भाटकाच्या अस्तित्वासच आवश्यक आहे हे पुष्कळांच्या ध्यानात येत नाही. भाटक हे शेतकी उत्पादनातील घटत्या प्रत्यायाच्या प्रवृत्तीमुळे उत्पन्न होते व ती प्रवृत्ती प्रचलित असेल तर वरील प्रकारचा तंत्रस्वीकाराचा क्रम अपरिहार्य आहे. तसा तो नसला तर काय होईल याचा विचार केल्यास हा मुद्दा अधिक स्पष्ट होईल. जर क्रमाने स्वीकारली जाणारी तंत्रे परिव्ययऱ्हासी, उत्पादकता-वाढ करणारी, असली तर त्या परिस्थितीत शेती उत्पादनाला घटत्या प्रत्यायाचा नियम न लागता वाढत्या प्रत्यायाचा (increasing returns) नियम लागू होईल. धान्योत्पादन हे क्रमाने दर एकरी अधिकाधिक कमी खर्चात होईल व धान्याची किंमत क्रमाने कमी कमी – म्हणजे नव्या तंत्रातील दर एकरी खर्चाइतकी व्हावी लागेल. त्या किमतीहून अधिक उत्पादनखर्च लागणाऱ्या तंत्राने लागवड केल्या जाणाऱ्या जामिनीवर भाटक सुटणार नाही, एवढेच नव्हे तर ते ऋण होईल. एक तर अशी जमीन नवीन तंत्राखाली लगेच आणावी लागेल आणि या नवीन तंत्रातील उत्पादनाचा खर्चही धान्याच्या किमतीइतकाच असणार. त्यामुळे त्या जामिनीवरही भाटक शून्यच असेल. म्हणजे अर्थव्यवस्थेत भाटक निर्माणच होणार नाही. अशी परिस्थिती

१२. पहा. Heinz D. Kurz, "Rent Theory in a Multisector Model", *Oxford Economic Papers* (New Series), Vol. 30, No. 1, March 1978, pp. 16–34.

अवास्तव म्हणावी लागेल. यावरून परिव्ययवर्धी उत्पादकता असणारी तंत्रेच क्रमाने स्वीकारली जात नसतील तर भाटक निर्माण होणारच नाही हे ध्यानात येईल.

आणि असा क्रम असला तर कोणत्याही एका वेळी दोनच उत्पादनतंत्रे अगर पद्धती जमिनीच्या लागवडीत वापरात असतील हेही स्पष्ट आहे. कारण पूर्वी वर्णन केल्याप्रमाणे एक उत्पादनतंत्र सर्व जमिनीवर पसरून त्यातून निघणारे धान्याचे एकुणात उत्पादन अर्थव्यवस्थेतील धान्याला असणाऱ्या एकुणात मागणीपेक्षा कमी पडल्याखेरीज व त्यामुळे धान्याची किंमत वाढल्याखेरीज दर एकरी अधिक उत्पादक पण दर शेरी अधिक उत्पादनखर्च लागणारे नवीन उत्पादनतंत्र स्वीकारलेच जाणार नाही. ते स्वीकारले म्हणजे नवीन तंत्राने मशागत केल्या जाणाऱ्या जमिनीवर भाटक शून्य राहील, पण जुन्या तंत्राने मशागत केल्या जाणाऱ्या जमिनींवर भाटक नव्याने पण एकाच दराने सुरू लागेल. दोनाहून अधिक तंत्रे एकाच वेळी वापरात असतील तर भाटकाचा दर एकच राहणार नाही. परंतु अशी परिस्थिती स्राफा प्रतिमानात होण्याची शक्यता नसते.

शेतीतील विस्तृत व सघन शेती या दोन टोकांच्या अवस्थांतील ही भाटकांची मीमांसा मर्यादित स्वरूपाची आहे. त्याहून अधिक वास्तव परिस्थितीकडे यावयाचे तर या दोन टोकांच्या प्रकारांची अनेक मिश्रणे प्रत्यक्षात आढळण्याचा संभव लक्षात घेतला पाहिजे. उदाहरणार्थ, समजा की एकच विशिष्ट प्रकारची जमीन एका विशिष्ट पिकाच्या लागवडीस योग्य व इतर सर्व पिकांच्या लागवडीस अयोग्य असली तर अशा प्रकारच्या सर्व उपलब्ध जमिनीवर तेच पीक लावण्यात येईल व ते पीक इतरत्र कोठेही लावण्यात येणार नाही. अशा परिस्थितीत त्या जमिनीचे भाटक वर दुसऱ्या परिस्थितीत वर्णिल्याप्रमाणे--एकाच कसाची जमीन व धान्य हे एकच पीक--ठरेल. त्या जमिनीच्या भाटकावर इतर भाटकांचा परिणाम होणार नाही. ते स्वतंत्रपणे ठरेल.

परंतु अशी उदाहरणे बाजूस ठेवून अधिक व्यापक अशा सर्वसाधारण व वास्तव परिस्थितीत विविध प्रकारच्या जमिनी, विविध प्रकारची पर्यायी पिके, त्यांच्या लागवडीच्या विविध पद्धती ( तंत्रे ), जमिनीचे अनेक बिगरशेती उपयोग व त्या अनुषंगाने तिला असणारी मागणी, या सर्वांचाच विचार करावा लागेल. अशा परिस्थितीत जमिनीचे भाटक कसे ठरते याचा स्राफा विचार करतात. अशा सर्वस्वी मुक्त परिस्थितीत जमिनीवर भाटक सुटावयाचे असेल तर ज्या विविध उत्पादनपद्धती प्रचलित असतील त्यांची संख्या ही जमिनींच्या विविध प्रकारांची संख्या व त्यांच्यावर उत्पन्न होणाऱ्या विविध उत्पादितांची ( पदार्थ, वस्तू वगैरे ) संख्या यांच्या बेरजेइतकी असावी लागेल. शिवाय या विविध उत्पादितांमधील व विविध प्रकारच्या जमिनींवरील परस्पर दुवे अगर परस्पर व्याप्ती ही त्यांची विनिमय मूल्ये व भाटके ठरविण्यास पुरेशी असावी लागतील.[१३]

---

१३. स्राफा, उपरोक्त, पा. ९१. या दोन अटी गणिती आहेत हे सहज लक्षात येईल. परंतु त्यांच्या मागच्या गणिताचा येथे खुलासा करणे शक्य नाही. अशी परिस्थिती आहे की नाही ह्याचे लक्षण -- म्हणजे वरील अटी पूर्ण होतात की नाही याचे लक्षण -- स्राफा आणखी एका प्रकारे सांगतात : जर अशा अर्थव्यवस्थेतील मूलाधार वस्तूंच्या निविष्टी-उद्विष्टी ( आदान-प्रदान ) समीकरणातून अविचल असे मूल्यमापनाचे माप तयार करण्यासाठी 'संप्रमाण वस्तू' ( standard commodity ) तयार करता येत असेल तर वरील अटी पुऱ्या होऊन भाटक-निर्मितीची परिस्थिती आहे असे म्हणता येईल असे स्राफा सांगतात. याचा खुलासा करण्यासाठी संप्रमाण वस्तू म्हणजे काय हे सांगितले पाहिजे. अर्थव्यवस्थेतील उद्योगधंदे एकमेकांशी संलग्न असतात व त्यांच्यातील

( पुढील पानावर पाहा. )

सर्व जमीन एकाच प्रकारची असल्यास त्यावर अनेक पिके काढल्यामुळे भाटक मीमांसेत आणखी नवे प्रश्न निर्माण होत नाहीत. परंतु त्या परिस्थितीत प्रचलित उत्पादनपद्धतींबाबत एक वैशिष्ट्य उद्भवेल. ते म्हणजे कोणत्याही एकाच पिकाच्या लागवडीतच एकाहून अधिक म्हणजे दोन उत्पादन-पद्धती एकाच वेळी अस्तित्वात असू शकतील. इतर सर्व पिकांच्या उत्पादनात प्रत्येकी एकच उत्पादन-पद्धती अंमलात असेल. थोडक्यात पण गणिती भाषेत वरील परिस्थितीत प्रचलित असलेल्या उत्पादन-पद्धतींची संख्या उत्पादित पिकांच्या संख्येपेक्षा एकाने जास्त असेल.

स्राफा यांच्या विस्तृत प्रतिमानात भाटकासंबंधीचे सिद्धान्तन अधिक वास्तव पण अधिक संदिग्धही होते. जमिनीचा निसर्गदत्त कस आणि भाटक यांच्यातला रिकार्डो व मार्क्स यांना अभिप्रेत असलेला अन्योन्य एकस्वनी संबंध बाद ठरतो. अर्थव्यवस्थेतील सर्व व्यवहारांच्या संदर्भात जमिनीचे भाटक ठरत असल्यामुळे कोणत्या जमिनीवर भाटक शून्य असेल हे कायम ठरलेले न राहता बदलते राहते. भाटक हे सर्वच परिस्थितीत नैसर्गिक असे नसून काही विशिष्ट अटी पुऱ्या झाल्यावरच ते उद्भवते व त्या अटी कशा प्रकारच्या असतात याचीही अधिक रेखीव कल्पना स्राफा यांच्या विवेचनामुळे येते.

स्राफा यांचे भाटक सिद्धान्तन हे मुख्यत: समष्टीय स्तरावरीलच आहे असे आरंभीच म्हटले आहे. परंतु भाटकाच्या व्यष्टीय आणि समष्टीय स्तरावरील विवेचनाचा समन्वय स्राफा यांच्या विवेचनात सूचित आहे असे मला वाटते. समष्टीय दृष्टीने जमिनीच्या भाटकाचे स्वरूप पूर्णपणे "बाढाव्याचे" ( अनार्जित उत्पन्नाचे ) आहे असे रिकार्डो - मार्क्सप्रमाणे स्राफा मानीत नाहीत असे वाटते. जमिनीचे भाटक हे मार्शल यांच्या प्रतिरूप भाटक ( quasirent ) या संकल्पनेशी पण मार्शलहून अधिक मर्यादित अर्थाने जुळते आहे असे स्राफा यांनी म्हटले आहे.[14] अल्पकाळात कोणत्याही उत्पादन घटकाचा पुरवठा त्याला असलेल्या उत्पादनातील मागणीच्या मानाने कमी असेल तर त्याच्या वापरातून निर्माण होणाऱ्या वस्तूंची

( मागील पानावरून पुढे चालू )

मानवी श्रम व इतर निविष्टी ( आदाने ) यांची एकमेकांशी असणारी प्रमाणे भिन्न असतात. म्हणून उत्पादित वस्तूंच्या विनिमय मूल्यांत मजुरीचा अगर लाभाचा दर बदलल्यामुळे फरक पडतात. विनिमय मूल्यांतील फरक मोजण्याचे अविचल माप या दोन्ही गोष्टींमुळे विचलित न होणारे पाहिजे. असे माप सिद्ध करण्यासाठी प्रथम ज्या वस्तूच्या उत्पादनातील मानवी श्रम आणि इतर निविष्टी यांचे प्रमाण असे असेल की त्या वस्तूच्या विनिमय मूल्यात मजुरीचा वा नफ्याचा दर बदलला तरी फरक पडणार नाही, अशा प्रमाणाला स्राफा 'क्रान्तिक प्रमाण' ( critical proportion ) असे नाव देतात. परंतु एवढ्यानेच भागत नाही. कारण असे क्रांतिक प्रमाण सापडले तरी त्यामुळे फार तर मानवी श्रम व इतर निविष्टी यांच्या निरनिराळ्या प्रमाणांमुळे विनिमय-मूल्यांत होणाऱ्या फरकांपासून अलिप्त असे माप उपलब्ध होईल. परंतु अर्थव्यवस्थेतील उद्योगधंदे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे विनिमय मूल्यांत पडणारे फरक या मापात तसेच राहतील. त्या फरकांपासूनही अलिप्त अशी मापाची वस्तू हवी असेल तर हे क्रांतिक प्रमाण त्याच उद्योगधंद्यात असून उपयोगी नाही तर त्या उद्योग-धंद्यात मजुरीव्यतिरिक्त लागणारी निविष्टी ज्या दुसऱ्या उद्योगधंद्यात उत्पादित होतात तेथेही मजुरी व इतर निविष्टी यांचे प्रमाण तेच पाहिजे. एवढेच नव्हे तर त्याही उद्योगधंद्याची मजुरीव्यतिरिक्तची निविष्टी ज्या उद्योगधंद्यात निर्माण होते त्यातही असले पाहिजे व त्याच्या मागच्या उत्पादनपिढीतही याचप्रमाणे असले पाहिजे. अशा वस्तूला 'संप्रमाण वस्तू' असे नाव स्राफा देतात. ही वस्तू मूलाधार वस्तूंची असते. ती प्रत्यक्षात नसली तरी कल्पनेने कागदावर तयार करता येते व वापरता येते. पहा : नी. वि. सोवनी, पूर्वोक्त, पृ. ७९–८१.

१४. स्राफा, तथोक्त, पा. ९३.

किंमत त्या वेळेपुरती (अल्पकाळात) वाढते व त्यामुळे त्या घटकाला जे जादा वेतन किंवा मोबदला मिळतो ते "प्रतिरूप भाटक" असे मार्शल यांनी म्हटले आहे.[१५] आणि त्यातच पुढे म्हटले आहे की, प्रतिरूप भाटक हे वाढाव्याच्या स्वरूपाचे नसते. ते मूल परिव्ययाचा (prime costs) भाग नसते, पण ते पूरक परिव्ययात (supplementary cost) समाविष्ट असते. प्रतिरूप भाटक सुटल्यामुळे किंमत वाढत नाही तर किंमत स्वतंत्रपणे वाढल्यावर अगर वाढल्यामुळे ते निर्माण होते. त्याला अल्पकाळाच्या संदर्भात अनावश्यक नफा असे म्हणता येईल. परंतु दीर्घकालीन संदर्भात त्याला उत्पादन परिव्ययाचाच भाग मानावे लागते.[१६]

स्राफा सिद्धान्तनात जमिनीचे भाटक हे निसर्गदत्त व ठरलेले असे नसते तर सर्व अर्थव्यवहारांच्या संदर्भात सतत बदलणारे असते हे आपण वर पाहिले आहे. त्यामुळे भाटकाचा विचार अल्पकालीन संदर्भातच करणे भाग पडते असा स्राफा विवेचनाचा रोख दिसतो. परंतु अल्पकाळात भाटकाचे वाढाव्यासारखे स्वरूप चकवे आहे, कारण दीर्घकालीन संदर्भात भाटक हे पूरक परिव्ययाचा भाग असणे अपरिहार्य आहे. तेव्हा सनातन अर्थशास्त्राच्या सर्वस्वी समष्टीय दृष्टिकोनातून भाटक म्हणजे अर्थव्यवस्थेतील कायमचे अनार्जित उत्पन्न (वाढावा) हा दावा बरोबर नाही. तसेच नवसनातन अर्थशास्त्राच्या पूर्णपणे व्यष्टीय दृष्टिकोणातून भाटक म्हणजे कायमचा उत्पादन परिव्ययाचा भाग हाही दावा बरोबर नाही. व्यष्टीय आणि समष्टीय अशा समन्वित दृष्टिकोणातून जमिनीचे भाटक हे अल्पकालीन संदर्भात वाढाव्याच्या स्वरूपाचे व दीर्घकालीन संदर्भात पूरक परिव्ययाच्या स्वरूपाचे असते असे म्हणता येईल. त्यामुळे भाटक म्हटले की "वाढावा", "अनार्जित उत्पन्न" ही प्रचलित समजूत बरोबर नाही असा स्राफा यांच्या विवेचनाचा रोख आहे असे वाटते.

---

१५. A. Marshall, *Principles of Economics*, 8th Edition, pp. 412–426.

१६. मार्शल, कित्ता, पृ. ४२.

## परिशिष्ट : रिकार्डो सिद्धान्त आणि सीमान्त सिद्धान्तन

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या तिसऱ्या वार्षिक अधिवेशनात हा निबंध इतर निबंधांबरोबर चर्चिला गेला. त्या चर्चेत जमीन या उत्पादन घटकाला सीमान्त संकल्पना लावणे शास्त्रीयदृष्ट्या चुकीचे आहे या त्या निबंधातील विधानाला प्रा. नाडकर्णी यांनी आक्षेप घेतला व ती संकल्पना कशी अर्थपूर्ण रीतीने लावता येते याच्या अलीकडच्या अर्थशास्त्रीय पाठ्यपुस्तकातील विवेचनाकडे त्यांनी लक्ष वेधले. हे विवेचन चर्चेच्या वेळी हाताशी नसल्यामुळे त्याची प्रत्युत्तरात्मक चर्चा मी त्या वेळी करू शकलो नाही. परंतु प्रा. नाडकर्णी म्हणतात त्या प्रकारचे विवेचन व युक्तिवाद बऱ्याच इंग्रजी पाठ्यपुस्तकांतून आढळत असल्यामुळे व विद्यार्थी आणि प्राध्यापकही ही पुस्तके वापरत असल्यामुळे त्यासंबंधी खुलासा करून ते विवेचन माझ्या मते का बरोबर नाही याचे विवरण करण्यासाठी हे निराळे परिशिष्ट मूळ निबंधास येथे जोडीत आहे.

बहुमान्य इंग्रजी पाठ्यपुस्तकांपैकी स्टिगलर यांचे *The Theory of Price* व ब्लॉग यांचे *Economic Theory in Retrospect* ही सुप्रसिद्ध पुस्तके आहेत. त्या दोहोंतही वरील प्रकारचे विवेचन आढळते. दोघाही ग्रंथकारांनी केलेले युक्तिवाद अगदी एकसारखे आहेत. तरीसुद्धा ब्लॉग यांच्या ग्रंथातील विवेचन प्रकटपणे रिकार्डो यांच्या भाटक सिद्धान्ताला अनुलक्षून आहे व स्टिगलर यांच्या विवेचनापेक्षा अधिक विस्तृत आहे. म्हणून तेच प्रमाण धरून येथे त्याच्या आधारानेच विवेचन करीत आहे. प्रथम ब्लॉग यांच्या यासंबंधीच्या युक्तिवादाचे सढळ मराठी भाषांतर देतो :—

'सीमान्त सिद्धान्तनात विचारात घ्यावयाचे फरक हे आतिशय सूक्ष्म असावे लागतात व भाटक सिद्धान्तात विचारात घेण्यात येणारी सीमान्त गुंतवणूक ही फारच मोठ्या आकाराची असते हे विचारात घेऊनही विभेदजन्य भाटकाचा सिद्धान्त हा आकारिक ( formally ) दृष्ट्या सीमान्त उत्पादकतात्मक विभजनाच्या सिद्धान्ताशी एकरूप आहे असे दाखविता येते. समजा की, पाच निरनिराळ्या प्रकारच्या सारख्या आकाराच्या जमिनींवर धान्योत्पादनाचे खालील आकडे आपल्याला उपलब्ध आहेत.

त्यांच्या साहाय्याने आपल्याला जमिनीला एकामागोमाग एक अशा भांडवल-श्रमाच्या अधिकाधिक मात्रा दिल्यास जे सीमान्त उत्पादन मिळते ते काढता येते. आपण असे समजू की, १ बुशेल धान्याची किंमत १ डॉलर आहे. म्हणजे उत्पादनाचे भौतिक स्वरूप ( धान्य ) व पैशातील मूल्य स्वरूप ( डॉलर ) हे एकरूपच राहील ( जेवढे डॉलर तेवढेच बुशेल ) व उत्पादनाच्या मागे डॉलर चिन्ह लावून काम भागेल. भांडवल व श्रम यांच्या एककाची किंमत ( मेहनताना ) डॉ. १४० अशी गृहीत धरूया. प्रत्येक प्रकारच्या

**कोष्टक १ : निरनिराळ्या प्रकारच्या जमिनींवरील धान्योत्पादन**

| भांडवल व | जमिनीचे एकूण उत्पादन | | | | | जमिनीचे सीमान्त उत्पादन | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मानवी श्रम | अ | ब | क | ड | इ | अ | ब | क | ड | इ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | १८० | १७० | १६० | १५० | १४० |
| I ( १ ) | १८० | १७० | १६० | १५० | १४० | | | | | |
| | | | | | | १७० | १६० | १५० | १४० | |
| II ( २ ) | ३५० | ३३० | ३१० | २९० | | | | | | |
| | | | | | | १६० | १५० | १४० | | |
| III ( ३ ) | ५१० | ४८० | ४५० | | | | | | | |
| | | | | | | १५० | १४० | | | |
| IV ( ४ ) | ६६० | ६२० | | | | | | | | |
| | | | | | | १४० | | | | |
| V ( ५ ) | ८०० | | | | | | | | | |

जमिनीत धान्याचे पीक काढण्यासाठी लावाव्या लागणाऱ्या भांडवल-श्रमाच्या मात्रांच्या खर्चापेक्षा (त्यांना द्याव्या लागणाऱ्या मेहनताऱ्यापेक्षा ) येणारे धान्याचे उत्पादन जास्त असेपर्यंतच ती जमीन कसणारा शेतकरी त्या जमीन या स्थिर उत्पादन घटकाला भांडवल-श्रम या बदलत्या उत्पादन घटकाच्या अधिकाधिक मात्रा

देईल. ( आपल्या उदाहरणातले ) भांडवल-श्रमाचे एकक हे अधिक विभजनीय नसल्यामुळे ( म्हणजे अर्धा एकक, पाव एकक असे विभजनीय नसल्यामुळे ) 'इ' प्रकारची जमीन कसणारा शेतकरी त्याच्या जमिनीला भांडवल-श्रम एककाची एकच मात्रा देईल. उत्पादकांतील ( शेतकऱ्यांतील ) परस्पर चढाओढी-मुळे एकंदर जमिनीच्या सर्वच स्थळी भांडवल-श्रम यांच्या एककांची सीमान्त उत्पादकता ( मूल्य ) सारखी होईल. म्हणून 'ड' जमिनीला भांडवल-श्रमाच्या दोन एककांची मात्रा दिली जाईल, 'क' जमिनीला तीन, वगैरे क्रमाने हे होईल. 'अ' प्रकारची जमीन भांडवल-श्रमाच्या ५ एककांची मात्रा घेऊन डॉ. ८०० ( किमतीचे ) उत्पादन देईल—हे एकूण उत्पादन तिच्या सीमान्त उत्पादनांची बेरीज आहे व त्यांचा उत्पादनखर्च ( म्हणजे तेथे लावलेल्या ५ भांडवल-श्रम एककांचा मेहनताना ) डॉ. ७०० असेल. म्हणजे 'अ' जमिनीवरचे भाटक ( खंड ) डॉ. १०० असेल; 'ब' जमिनीवरचे डॉ. ६०; 'क' जमिनीचे डॉ. ३०; 'ड' जमिनीचे डॉ. १० आणि 'इ' जमिनीचे शून्य. कोष्टकातील आकडे आडवे वाचले तर 'इ' ही शेतीची विस्तारसीमा आहे. कारण तिचे एकूण उत्पादन ( डॉ. १४० ) हे त्यासाठी तिच्यावर लावलेल्या ( एका ) भांडवल-श्रम एककाच्या किमतीइतके ( उत्पादनखर्चाइतके ) आहे. जर 'इ' जमिनी-वर भांडवल-श्रमाच्या एक एककाची मात्रा देणे आर्थिकदृष्ट्या फायद्याचे असेल तर 'अ', 'ब', 'क', 'ड' या जमिनींवर विस्तारसीमेवर येणाऱ्या उत्पादनाइतके उत्पादन येईपर्यंत अधिकाधिक भांडवल-श्रमाचे एकक लावणेही आर्थिकदृष्ट्या योग्य ठरेल; कोष्टकातील आकडे उभे ( स्तंभानुसार ) वाचले तर ज्या शेवटच्या भांडवल-श्रमाच्या एककाने ( बदलत्या उत्पादन घटकाच्या एककाने ) अधिक उपजाऊ जमिनीवर शेतकऱ्याला येणाऱ्या खर्चाइतके ( डॉ. १४० ) उत्पादन होईल तो सघनात्मक सीमान्त एकक होय.

"अशा रीतीने ठरविलेले ( सघनात्मक ) भाटक ( खंड ) हे जमिनीच्या सीमान्त उत्पादनाइतके असते हे सहज दाखविता येते. रिकार्डो यांच्या भाटक सिद्धान्तात बदलत्या उत्पादन घटकाला त्याच्या सीमान्त उत्पादनाइतका मेहनताना मिळतो तर स्थिर उत्पादन घटकाला शेष सीमान्तर्गत उत्पादन आधिक्य मिळते. त्यासाठी कराव्या लागणाऱ्या उत्पादनखर्चाइतके सीमान्त जमिनीचे उत्पादन होईपर्यंत स्थिर ( ठेवलेल्या ) भांडवल-श्रम ( राशीला ) अधिकाधिक जमिनीच्या मात्रा दिल्या तर त्यामुळे त्या जमिनीवर सुटणारे भाटक ( खंड ) हे वर सांगितल्याप्रमाणे शेष सीमान्तर्गत आधिक्याइतके असले पाहिजे. समजा की, आपण 'ब' प्रकारची जमीन वरील कोष्टकातून काढून टाकली तर एकूण धान्याचे उत्पादन डॉ. ६२० ने कमी होईल. भांडवल-श्रमाचे चार एकक मोकळे होतील व ते जर 'अ', 'क', 'ड', व 'इ' या जमिनींच्या सघनात्मक उत्पादनसीमेवर लावण्यात आले तर—आपल्या उदाहरणातील बदल सीमान्त सिद्धान्तनात अभिप्रेत असतात त्यापेक्षा फारच मोठे आहेत हे क्षणभर विसरले तर—त्याच्यामुळे डॉ. ५६० किमतीचे धान्य पैदा होईल. म्हणून 'ब' जमिनीचे सीमान्त उत्पादकता मूल्य डॉ. ६० (डॉ. ६२० – डॉ. ५६०) आहे आणि ते आपण वर काढलेल्या तिच्या सीमान्तर्गत आधिक्याएवढे आहे."[1]

सीमान्तवादी दृष्टिकोनातून रिकार्डो यांच्या भाटक सिद्धान्ताची ही मांडणी व विवेचन हे कट्टर सीमान्तवादी अर्थशास्त्रज्ञांनी केलेल्या व मूळ निबंधात दिलेल्या भाटक सिद्धान्ताच्यापेक्षा सर्वस्वी निराळे आहे. कट्टर सीमान्तवादी रिकार्डो यांचा सिद्धान्त हा घटत्या फळाच्या सिद्धान्तावर आधारलेला आहे व घटत्या उपयोगितेच्या सिद्धान्तावर आधारलेला नाही म्हणून चूक समजतात. तसेच रिकार्डो यांच्या सिद्धान्तात जमिनीचे विविध उपयोग लक्षात घेतले जात नाहीत म्हणूनही तो अवास्तव आहे असे मानतात. प्रस्तुतचे विवेचन हे रिकार्डो यांचा भाटक सिद्धान्त सीमान्त विचारसरणीच्या चौकटीतही कसा सिद्ध होतो व त्या

१. Mark Blaug, *Economic Theory in Retrospect*, Second Edition, 1968, pp. 83–84.

चौकटीत तो कसा चपखल बसतो हे दाखविण्यासाठी आहे हे प्रथम लक्षात घेतले पाहिजे. आता प्रस्तुत विवेचनाच्या परीक्षेकडे वळू.

रिकार्डो यांचा भाटक (खंड) सिद्धान्त हा सीमान्त उत्पादकतात्मक विभजन सिद्धान्ताशी आकारिक (formally) रीत्या समरूप आहे, या विधानाने ब्लॉग यांच्या विवेचनाची सुरुवात होते. या विधानातील "आकारिक" हा शब्द महत्त्वाचा आहे. "आकारिक" याचा अर्थ बाह्यस्वरूपी ते सिद्धान्त समरूप आहेत, परंतु खरोखरी पाहता ते तसे नाहीत असा आहे. परंतु या विधानाचे जे विवरण वर उद्धृत केले आहे त्यात ही समरूपता फक्त बाह्यस्वरूपाची का असते व खरोखरीची का नसते याबद्दल काहीच खुलासा केलेला नाही. उलट ते विवेचन इतके नितळ व पारदर्शक वाटते की त्यावरून वाचकाला त्या सिद्धान्ताचे समरूपत्व बाह्यस्वरूपाचे नसून खरोखरीचे आहे असे वाटते. ते तसे आहे अशीच कित्येकांची समजूत आहे. याचे उदाहरण मी मूळ निबंधातील ६ व्या पदटीपेत दिलेले आहे. ती समजूत का बरोबर नाही हे सांगण्यासाठीच हा प्रपंच आहे.

रिकार्डो यांनी आपला भाटक सिद्धान्त दुलग मांडला आहे. विस्तारात्मक भाटक व सघनात्मक भाटक यात भेद करून त्यांनी त्यांचे प्रत्येकी स्वतंत्रपणे विवेचन केले आहे, एकत्र केलेले नाही. ब्लॉग (व स्टिगलर) सीमान्त संकल्पनेच्या चौकटीत दोन्ही प्रकारच्या भाटकांचे एकत्र व एकसंध विवेचन करण्याची खटपट करतात. परंतु रिकार्डोप्रमाणेच जमीन ही निरनिराळ्या उपजाऊपणाची असते व तिच्यावर धान्य हे एकच पीक काढले जाते ही त्यांच्या प्रतिमानातली गृहीते स्वीकारतात. ब्लॉग (व स्टिगलर) असेही गृहीत धरतात की, जमीन जितकी जास्त उपजाऊ (सकस) तितकी तिची लागवड जास्त सघनपणे केली जाते.[२] त्यामुळे त्यांच्या प्रतिमानातील जमीन तिच्या विस्तार (extensive) व सघन (intensive) सीमांपर्यंत (म्हणजे त्यावरील उत्पादनखर्च व उत्पादन सारखे होऊन भाटक शून्य होईपर्यंत)

२. हे माझे गृहीतकृत्य आहे असे ब्लॉग स्पष्टपणे कोठेही म्हणत नाहीत. शेतकरी तर्कशुद्ध रीतीने वागल्यास तो असे करील असे त्यांच्या विवेचनात सूचित आहे. तो तर्कशुद्ध रीतीनेच वागतो हे त्यांनी नवसनातन अर्थशास्त्रातल्या-प्रमाणे आपल्या विवेचनासाठी गृहीत धरले आहे. या व अशा छुप्या गृहीततत्त्वावर भाष्य करताना सॅम्युअलसन् यांनी लिहिले आहे :

"Only a minority of writers have noticed that there is an ambigueity in the usual formulation that says : Good land's rent equals the difference between what labour (and 'capital') produce on it and what "they" would produce at the external margin. It is forgotten that if one man and one plow till one good acre, there is no particular reason to think that one man and one plow will also be tilling an acre of frontier no-rent land. One man might be tilling five acres of such land, or one-fifth of an acre; and he might find it most economical to use two plows and one drill in doing so. In short, there is a good deal of 'implicit theorising' in the classical account of how factors are to be allocated and compared on different lands, with Adam Smith's Invisible Hand being relied on to provide the determining equations that the conscientious economic scientist ought to explicitly provide." Paul A. Samuelson, "Appendix : Theory of Differential Rent" to "A Modern Treatment of Ricardian Economy : Pricing of Goods and of Labour and Land Services." in *Quarterly Journal of Economics*, February 1959, p. 22.

कसली जाते. जमिनीला ज्या भांडवल-श्रमाच्या मात्रा ( एकक ) लावयाच्या त्या एकजिनसी आहेत व अविभजनीय आहेत, असे आणखी एक गृहीतकृत्य ब्लॉग यांनी प्रकटपणे स्वीकारले आहे. ( त्यांचे पूर्वीचे लुप्त व हे प्रकट गृहीतकृत्य रिकार्डो यांच्या प्रतिमानात नाही हे ध्यानात घेणे आवश्यक आहे. ) सीमान्त संकल्पना भाटक सिद्धान्ताला लावताना त्या मूळ संकल्पनेला अभिप्रेत असलेले सूक्ष्म बदल विचारात न घेता आपण फार स्थूल बदल विचारात घेत आहोत याकडे ब्लॉग लक्ष वेधतात व पुढच्या विवेचनात त्याकडे दुर्लक्ष केल्यास प्रस्तुतचे विवेचन सरळपणे करता येते असे सुचवितात. याशिवाय ब्लॉग यांनी जे शेतकी उत्पादनाचे कोष्टक दिले आहे त्यातील डाव्या बाजूचे आकडे असे कल्पिले आहेत की, निरनिराळ्या प्रकारांच्या जमिनींवरील उत्पादनातील फरक व त्याच जमिनीवर भांडवल-श्रमाच्या अधिकाधिक मात्रा देऊन सघन शेतीमुळे येणारे निरनिराळ्या टप्प्यांवरील उत्पादनातील फरक हे एकसारखेच असावेत. हे सर्व आकडे कल्पित व सोईस्कर आहेत हे सांगणे नलगे.

रिकार्डो यांचा सघनात्मक भाटकाचा सिद्धान्त सीमान्त संकल्पनेच्या चौकटीत मांडता येतो हे सुप्रसिद्ध आहे. त्याचे मुख्य कारण हे की, रिकार्डो यांच्या त्या विवेचनात एकाच प्रकारच्या जमिनीवर एकजिनसी भांडवल-श्रमाच्या मात्रा दिल्या तर काय होते याचे विवेचन आहे. म्हणजे त्यात जमीन व भांडवल-श्रम हे दोन्हीही उत्पादन घटक एकजिनसी असतात. ब्लॉग यांनी दिलेल्या कोष्टकातील प्रत्येक स्तंभातील आकडे वरून खाली वाचले तर एकाच प्रकारच्या जमिनीला ( स्थिर घटक ) भांडवल-श्रमाच्या मात्रा ( बदलता घटक ) एकामागोमाग दिल्यास किती उत्पादन येईल ते समजते व त्यावरून भांडवल-श्रम या उत्पादन घटकाचे सीमान्त उत्पादन ( डॉ. १४० ) काढता येते. हे सघन सीमेवरील उत्पादन होय. भांडवल-श्रमाच्या या सीमान्त उत्पादनावरून त्या जमिनीस दिलेल्या भांडवल-श्रमाच्या मात्रांमुळे केवढे निव्वळ उत्पादन मिळते ते समजते. ते एकूण उत्पादनातून वजा केल्यास जमीन या उत्पादन घटकामुळे येणारे निव्वळ उत्पादन मिळते. हेच सीमान्तर्गत शेष उत्पादन होय व जमिनीचे भाटक त्याइतकेच असते. हेच गणित भांडवल-श्रम हा स्थिर घटक व जमीन हा बदलता घटक म्हणून उलटे केले तर जमिनीची सीमान्त उत्पादकता मिळेल व ती एकूण उत्पादनातून वजा केली तर उरलेले उत्पादन सीमान्तर्गत शेष उत्पादन भांडवल-श्रम या स्थिर घटकाचे असेल व ते त्याच्या सीमान्त उत्पादनाइतकेच असले. येथे प्रत्येक स्तंभात अध्याहृत असलेला उत्पादन अनुवर्त हा एकजिनसी एकघाती आहे हे गृहीत धरलेले आहे एवढे लक्षात ठेवावे. याचा अधिक खुलासा पुढे केला आहे.

याप्रमाणे सघनात्मक भाटकाचे विवरण सीमान्त संकल्पनेच्याद्वारा करता आले तरी विस्तारात्मक भाटकाचे विवरण तसे करता येत नाही. याचे कारण जमीन ही एकजिनसी नसून विविध उपजाऊपणाची असते ही परिस्थिती त्या सिद्धान्ताच्या केंद्रस्थानी आहे. ब्लॉग यांच्या कोष्टकातील I ( १ ) ही ओळ आडवी वाचली तर विस्तारात्मक भाटक कसे ठरते ह्याचा अभ्यास करता येईल. ( सघन शेतीमुळे होणारे घोटाळे विवेचनात टाळण्यासाठी फक्त या ओळीतील आकड्यांचाच विचार येथे केला आहे. ) या आकड्यांवरून भांडवल-श्रमाच्या एका एककाला एकाच प्रकारच्या जमिनीच्या अधिकाधिक मात्रा एकामागोमाग दिल्यास जमिनीचे जे सीमान्त उत्पादन येईल ते मिळत नाही, तर भांडवल-श्रमाचा एक एकक निरनिराळ्या प्रकारच्या जमिनींना लावला तर किती उत्पादन येईल एवढेच समजते. मग सर्वांत कमी कसाची 'इ' जमीन ही लागवडीच्या सीमेवरील जमीन असते आणि त्या जमिनीवरील धान्याचे उत्पादन व उत्पादन-खर्च हे सारखेच असल्यामुळे तिच्यावर शून्य भाटक सुटते; आणि म्हणून तिला सीमान्त जमीन ( वरच्यापेक्षा निराळ्या अर्थाने ) म्हटले जाते. ब्लॉग यांच्या कोष्टकात 'इ' जमिनीवरील उत्पादन

( डॉ. १४० ) हे सघनात्मक सीमान्त उत्पादनाइतके ( म्हणजे वर चर्चिल्याप्रमाणे भांडवल-श्रमाच्या सीमान्त उत्पादनाइतके ) आहे. विस्तारात्मक व सघनात्मक सीमान्त उत्पादकता सारख्या असणे ही या प्रतिमानातील शेतीव्यवसायाचा समतोल होण्यासाठी आवश्यक अट आहे हे सहज लक्षात येईल.

विस्तारसीमेवरील जमिनीची सीमान्त उत्पादकता सीमान्त सिद्धान्तनातील एका सुप्रसिद्ध नियमाच्या आधारे काढून दाखवून ती जमिनीतील भाटकाइतकी असते असा जो साहाय्यक युक्तिवाद ब्लॉग यांनी केला आहे तो अशास्त्रीय आहे व त्यांच्या स्वतःच्या प्रतिमानाशीही प्रतारणा करणारा आहे– म्हणजे त्याच्या गृहीतकात बसणारा नाही. सीमान्त सिद्धान्तनात एका वेळी एका उत्पादनात गुंतलेल्या उत्पादन घटकांपैकी कोणत्याही एका उत्पादन घटकाची सीमान्त उत्पादकता काढावयाची रीत अशी की, त्या घटकाचा एक एकक उत्पादनाच्या प्रक्रियेतून काढला अगर आणखी एक एकक जादा लावला तर त्यामुळे एकंदर उत्पादनात जी घट अगर वाढ अनुक्रमे होईल तितकी त्या घटकाची सीमान्त उत्पादकता असते. हा नियम फक्त एकजिनसी घटकांनाच लावता येतो; कारण अशा घटकांचे एकक हे एकमेकांशी पूर्णपणे पर्यायी असतात व म्हणून त्यांपैकी कोणताही एकक बाजूस काढला ( अधिक लावला ) तरी एकंदर उत्पादनात तेवढीच घट ( वाढ ) होते. ब्लॉग यांनी हा नियम एकजिनसी नसलेल्या जमीन या घटकाला लावला आहे आणि त्या नियमाची मूळ अटच पाळलेली नाही. हा नियम ब्लॉग यांच्या उदाहरणातील भांडवल-श्रम या उत्पादक घटकाची एकाच प्रकारच्या जमिनीवरील सीमान्त उत्पादकता ठरविण्यास त्याची मूळ अट न भंग करता वापरता येतो. कारण त्या कोष्टकातील कोणत्याही स्तंभातल्या कोणत्याही जागेवरचा या घटकाचा एक एकक बाजूस केला तरी त्या घटकाच्या उत्पादन प्रक्रियेत राहिलेल्यांपैकी कोणताही एकक त्याची जागा पूर्णपणे पर्यायी म्हणून घेऊ शकतो. त्यामुळे उत्पादनात गुंतलेल्या सर्व एककांपैकी सर्वांत कमी उत्पादन करणारा एककच दूर केल्यासारखे होते आणि अशा प्रकारे काढलेली भांडवल-श्रम या उत्पादन घटकाची सीमान्त उत्पादकता ही त्या वेळी उपयोगात असलेल्या सर्व भांडवल-श्रम एककांची सीमान्त उत्पादकता असते आणि ती तशीच असली पाहिजे हे सीमान्त सिद्धान्तनातील आद्य तत्त्व आहे. वरील युक्तिवादात ब्लॉग यांनी या नियमाचा ( अवैध ) उपयोग करून जमिनीची जी सीमान्त उत्पादकता काढली आहे तिच्यात हे तत्त्व पाळले जात नाही. कारण जमिनीचा एकक कोष्टकातील कोणच्या स्तंभातून काढला जाईल यावर त्याच्या अनुपस्थितीत एकंदर धान्योत्पादन किती घटेल हे अवलंबून राहील. जमिनींच्या एककांचा उपजाऊपणा निरनिराळा असल्यामुळे ते एकमेकांना पूर्ण पर्यायी एकक असू शकत नाहीत. म्हणून वरील पद्धतीने दूर केलेल्या विशिष्ट प्रकारच्या जमिनीच्या एककामुळे एकंदर उत्पादन किती कमी होते–म्हणजे त्या विशिष्ट एककाची त्याच्या विशिष्ट गुणधर्मा-प्रमाणे असणारी उत्पादकता–ते आपल्याला मिळते. ते त्या विशिष्ट जमिनीचेच निव्वळ उत्पादन असते. त्या वेळी लागवडीखाली असलेल्या सर्व जमिनींची ती सीमान्त उत्पादकता नसते. ब्लॉग यांनी हा नियम शास्त्रशुद्ध रीतीने लावल्याचा आभास येथे निर्माण केला आहे.

त्याही पुढे जाऊन ब्लॉग असे विधान करतात की, रिकार्डो यांच्या भाटक सिद्धान्तात बदलत्या घटकाला त्याच्या सीमान्त उत्पादकतेइतका मेहनताना मिळतो व स्थिर घटकाला सीमान्तर्गत शेष उत्पादनाइतका मेहनताना मिळतो. वर जमीन हा स्थिर घटक व भांडवल-श्रम हा बदलता घटक मानून व त्याच्या उलट स्थिर व बदलत्या घटकाची उलटापालट करून गणित केल्यास प्रत्येक बदलत्या घटकाची सीमान्त उत्पादकता तो स्थिर घटक असताना त्याला मिळणाऱ्या सीमान्तर्गत शेष उत्पादनाइतकीच असते असे विवेचन सघनात्मक भाटकाच्या विवेचनाच्या संदर्भात केले आहे त्याचा तोच अर्थ आहे. परंतु

ते विवेचन त्यात अध्याहृत असलेला उत्पादन अनुवर्त एकजिनसी एकघाती असला तरच खरे आहे याकडे तेथे लक्ष वेधले आहे. विकलन गणितातील हे प्रसिद्ध प्रमेय आहे व ते अशा प्रकारच्या अनुवर्तांनाच लागू पडते. नेमके तेवढेच ब्लॉग येथे स्पष्टपणे सांगत नाहीत पण अध्याहृत आहे असे गृहीत धरतात, हे नवलाचे आहे. ब्लॉग यांनी त्याच पुस्तकाच्या पुढच्या भागात सीमान्त सिद्धान्तनावरील प्रकरणात विक्स्टीडच्या सुप्रसिद्ध ग्रंथासंबंधी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनार्थ म्हणून टिपण लिहिले आहे. त्या ग्रंथातील ६ व्या प्रकरणात विक्स्टीडने वरच्यासारखेच भाटकाचे विवेचन केले आहे, पण ते जर उत्पादन अनुवर्त एकजिनसी एकघाती असेल तरच खरे आहे असे विक्स्टीडने म्हटले नाही याबद्दल त्यास ब्लॉग यांनी दोष दिला आहे. त्यांनी येथे नेमका तोच गुन्हा स्वतः केला आहे.[३] अशा प्रकारचा उत्पादन अनुवर्त असावयास त्यातील सर्व घटक हे एकजिनसी व अनंतपणे विभजनीय तर असावेच लागतात पण शिवाय ते संपूर्णपणे चलिष्णू असावे लागतात. यांपैकी बहुतेक अटी ब्लॉग यांच्या प्रतिमानात पुऱ्या होत नाहीत हे उघड आहे. त्यामुळे त्यातील उत्पादन अनुवर्त अशा प्रकारचा असणे अशक्य आहे. म्हणून ब्लॉग यांचा हा युक्तिवादही शास्त्रशुद्ध नाही.

आतापर्यंतच्या या माझ्या विवेचनाच्या संदर्भात असे सुचविण्यात आले आहे की, थोड्या निराळ्या दृष्टीने ब्लॉग यांच्या विवेचनाचे समर्थन करता येईल. ( ब्लॉग यांनी तसे सुचविलेले नाही. ) हा दृष्टिकोन असा की, ब्लॉग यांचे कोष्टक हे एकसंध कोष्टक नाही. निरनिराळ्या कोष्टकांचे एकत्रीकरण आहे. त्यांतला प्रत्येक स्तंभ हा स्वतंत्र उत्पादन प्रक्रिया वर्णन करतो. जितक्या प्रकारच्या जमिनी लागवडीखाली असतील तितके स्तंभ या कोष्टकात असतील व प्रत्येक स्तंभातील उत्पादन अनुवर्त हा एकजिनसी एकघाती असेल. येथे प्रत्येक स्तंभात जमिनीच्या चल घटकस्वरूपातली सीमान्त उत्पादकता ही तिच्या स्थिर घटकस्वरूपातील सीमान्तर्गत शेष उत्पादनाइतकी नियमाप्रमाणेच आहे. आता हे सर्व स्तंभ एकत्र आणले व सर्व प्रकारच्या जमिनींचा एकत्र विचार केला तर जे प्रत्येक स्तंभाला लागू तेच सर्व कोष्टकाला लागू होईल व त्याप्रमाणे सर्व जमिनींचे सीमान्त उत्पादन हे स्थिर घटकस्वरूपातील जमिनीला मिळणाऱ्या सीमान्तर्गत शेष उत्पादनाइतके असेल. म्हणजेच सीमान्त सिद्धान्तनात हे सर्व शास्त्रशुद्ध रीतीने बसते. हा युक्तिवादही बरोबर नाही. कारण त्यात कोष्टकातील निरनिराळ्या स्तंभांतील एकजिनसी एकघाती उत्पादन अनुवर्तांचा जो एकत्रित अनुवर्त होईल तोही तसाच एकघाती एकजिनसी असेल असे गृहीत धरलेले आहे. एकत्रीकरणासंबंधीचे नियम व सिद्धान्त यांच्या आधारे पाहता असे गृहीत धरणे हे सर्वस्वी अयोग्य आहे. कारण या निरनिराळ्या

---

३. "Chapter 6 : The Law of Rent"

"With characteristic thoroughness, Wicksteed demonstrates that rent determined as the mixtilinear area under the marginal product curve of labour and capital is identical to rent determined as the rectilinear area under the marginal product curve of land. Once again, Wicksteed fails to point out that this is true only if the production function is homogeneous and of the first degree." Readers' Guide to the *Commonsense of Political Economy,*" M. Blaug, O.p. Cit. p. 445.

उत्पादन अनुवर्तांचा एकत्रित उत्पादन अनुवर्त झाल्यास जमीन हा त्यातला उत्पादन घटक एकजिनसी राहात नाही व त्यामुळे हा एकत्रित झालेला उत्पादन अनुवर्त एकजिनसी एकघाती होत नाही. क्लॉग-प्रभृतींच्या युक्तिवादाचा हा बचाव टिकणारा नाही.

आरंभी म्हटल्याप्रमाणे "आकारिक" या शब्दामागे हे सर्व रामायण दडलेले आहे आणि त्यात पुन्हा 'रामाची सीता कोण?' अशासारखा प्रश्न म्हणजे या बौद्धिक कसरतीने वाचकांच्या व विद्यार्थ्यांच्या बुद्धिभेदापलीकडे काय साधते हे कळत नाही. सीमान्त उत्पादकात्मक विभजनाचा सिद्धान्त हा इतका शास्त्रशुद्ध व महत्त्वाचा की त्याच्याशी जवळीक साधणे हे अर्थपूर्ण असे असते तरीही याचा काहीसा उलगडा झाला असता. परंतु तसेही नाही. कारण याच अर्थशास्त्रज्ञांनी सीमान्त उत्पादकतात्मक विभजन सिद्धान्ताची रेवडी उडवली आहे व तो किती तकलादू आहे याचे साद्यन्त विवेचन केलेले आहे. त्यामुळे बुद्धिचापल्याचा एक विकृत विलास एवढेच त्याचे निमित्त असावे! परंतु हा विकृत बुद्धिविलास इतका निरागस नाही असे ग्यॅरेग्नानी यांनी म्हटले आहे. वरच्याप्रमाणे एकजिनसी नसलेल्या जमीन या उत्पादन घटकाला अशा रीतीने सीमान्त संकल्पना शास्त्रशुद्ध रीतीने लावता येते अशी समजूत करून घेऊनच नवसनातन अर्थशास्त्रज्ञांनी एकजिनसी नसलेल्या भांडवलासही ती तशी लावता येईल असे मानले व त्या चुकीच्या समजुतीवर पुष्कळसे तत्संबंधीचे सिद्धान्तन उभारण्यात आले आहे असे अर्थविचारांच्या इतिहासावरून दिसते.[४] हे बुद्धिचापल्य नीट समजावून घेणे आवश्यक आहे हेच याचे तात्पर्य. कारण तसे केले नाही तर आपल्या बुद्धिचापल्याच्या कोड्यात आपणच चकतो असे दिसते.

४. पहा : P. Garegnani, "Heterogeneous Capital, The Production Function and The Theory of Distribution," *Review of Economic Studies*, Vol. 37, 1970, pp. 407–436,

■ ■

## मराठी अर्थशास्त्र परिषदेचे पुढील–चौथे–वार्षिक अधिवेशन

औरंगाबाद येथे झालेल्या परिषदेच्या तिसऱ्या वार्षिक अधिवेशनात भरलेल्या परिषदेच्या सभासदांच्या सर्वसाधारण सभेत ठरल्याप्रमाणे परिषदेचे अध्यक्ष, कार्याध्यक्ष व कार्यवाह यांनी धुळे जिल्हा अर्थशास्त्र अध्यापक संघाच्यावतीने पुढील अधिवेशनासाठी दिलेले आमंत्रण एकमताने स्वीकारले असून त्याप्रमाणे परिषदेचे चौथे वार्षिक अधिवेशन धुळे येथे आक्टोबर / नोव्हेंबर १९८० मध्ये श्री शिवाजी विद्याप्रसारक संस्थेच्या महाविद्यालयाच्या परिसरात भरेल हे जाहीर करावयास आनंद वाटतो.

परिषदेच्या घटनेतील तरतुदीप्रमाणे परिषदेच्या अध्यक्षांनी वरील महाविद्यालयाचे प्राचार्य रा. शि. सोनवणे यांना धुळे येथील अधिवेशनाचे स्थानिक कार्यवाह म्हणून नियुक्त केले आहे.

**कार्याध्यक्ष**
मराठी अर्थशास्त्र परिषद

# भारताचा भावी विकास : एक समग्र दृष्टिकोण

सी. टी. कुरिअन
अनुवादक : अविनाश जोशी

[ प्रा. सी. टी. कुरिअन यांचा हा लेख ( ' इन् पर्स्पेक्टिव् ' ) नवी दिल्ली येथील ' सेमिनार ' मासिकाच्या डिसेंबर १९७९ च्या अंकात प्रसिद्ध झाला. त्याचा मराठी अनुवाद प्रसिद्ध करण्यास आम्हांस परवानगी दिल्याबद्दल आम्ही प्रकाशक, ' सेमिनार ' आणि प्रा. कुरिअन यांचे आभारी आहोत. प्रस्तुत लेख लोकसभा निवडणुकांच्या आधी लिहिलेला असल्याने त्यातील काही भाग थोडासा शिळा झाला झाला असला तरी त्याची प्रस्तुतता कमी झालेली नाही.]

**संपादक**

...सामाजिक-आर्थिक समस्यांबद्दल एक किमान एकवाक्यता निर्माण करण्याची आवश्यकता राहील व ते काम करावेच लागेल. सध्याच्या भारतातील राजकीय परिस्थितीशी सुसंगत अशा अर्थनीतीची रूपरेषा स्पष्ट होण्याच्या दृष्टीने, म. गांधींचे विचार अधिक उपकारक ठरतील की नेहरूंची विचारप्रणाली प्रस्तुत ठरेल हा सध्या चालू असलेला वाद फारसा लाभदायी नाही. खुद्द गांधी आणि नेहरू यांनाही ' आपल्या विचारांच्या दिशा अगदी भिन्न आहेत ' असे वाटले नसते. तसे पाहिले तर, गांधीवादी आणि नेहरूवादी यांच्यातही अगदी स्पष्ट भेद दाखविणे कठीण आहे. सध्याच्या आयाराम-गयारामांचे वर्गीकरण करणे ही एक अशक्यप्राय गोष्ट आहे. शिवाय, सध्याच्या राजकीय परिस्थितीत प्रादेशिक तसेच बिगर-प्रादेशिक स्वरूपाच्या ' आघाड्या 'ही आहेतच.

आर्थिक विकासाची प्रक्रिया चालू ठेवण्यासाठी आणि भंगुरलेल्या भारतीय राज्ययंत्रामुळे आपली समाजवादी-लोकशाही चौकट पूर्णपणे मोडकळीला येण्याचा धोका टाळण्यासाठी, एक किमान मतैक्य निर्माण करणे आवश्यक आहे—मग कुणाचा कोणताही पक्ष असो वा प्रणाली असो. हे मतैक्य पुढील बाबींसंबंधी असायला हवे : ( अ ) भिन्न गट आणि प्रदेश यांचे आर्थिक हितसंवर्धन करण्याच्या पद्धती कोणत्या असाव्यात; आणि ( ब ) त्यांच्यातील संघर्ष मिटवण्याची साधने कोणती असावीत.

सध्या, विचारप्रणालींनुसार होणारी सुस्पष्ट व निर्णायक स्वरूपाची राजकीय संघटने ( alignments ) आणि विचारप्रणालींनुसार होणारी प्रभावी राजकीय बांधिलकी यांचा अभाव असल्याने दिशानिष्ठ राज्यकारभारासाठी ज्या गोष्टीची नितांत आवश्यकता आहे ती म्हणजे अशी एक नियमावली ( rules of the game) की जीमुळे भिन्न हितसंबंधांचे संवर्धन होईल आणि जीमुळे पक्षनिरपेक्ष बैठकीवरून

हितसंबंधांमधील संघर्षाचे निराकरणही होईल. अशा प्रकारच्या एकमताने ठरलेल्या नियमावलीला मूलभूत महत्त्व असल्याने, विशिष्ट प्रश्नांना दुय्यम स्थानच द्यावे लागेल. असे प्रश्न म्हणजे : आर्थिक निर्णय घेण्याच्या संरचनांचे विकेंद्रीकरण, भिन्न स्तरांवरील नियोजन, सार्वजनिक क्षेत्राची भूमिका/महत्त्व, बाजार-यंत्रणेवरील नियंत्रणे, किंमत-वेतनदर-प्रोत्साहनविषयक धोरणे इ. या विवक्षित प्रश्नांना जर दुय्यम स्थान दिले नाही व प्रथम सर्वमान्य अशी नियमावली तयार केली नाही तर या प्रश्नांना ठोस स्वरूप देणे आणि कार्यवाहीत आणली जाण्याची पुरेशी शक्यता ज्यांच्या बाबतीत संभवते अशी धोरणे बांधणे, हे जवळ-जवळ अशक्य होईल.

भावमान, विशेषतः भावमानातील लक्षणीय बदल, हा घटक अर्थव्यवस्थेच्या कामगिरीविषयी माहिती देणारा सूचक घटक समजला जातो यात काहीच आश्चर्यकारक नाही. अशी परिस्थिती १९७९ मध्ये आपल्या देशात होती. १९७८ मध्ये भावमान बरेचसे स्थिर होते. १९७८ च्या शेवटी घाऊक किंमती थोड्या वाढल्या होत्या, परंतु त्यानंतर काही काळ स्थिरावल्या. १९७९ च्या दुसऱ्या चतुर्थांशात मात्र किंमती एकदम भडकल्या आणि त्यामुळे ही भाववाढ अर्थसंकल्पामुळे सुरू झाली की काय यासंबंधी चर्चा सुरू झाली. अर्थसंकल्पाची आणि त्याचे समर्थन करण्याची ज्यांची जबाबदारी असते ते असे सांगत आले आहेत की, करांमधील वाढ ही केवळ चैनीच्या वस्तूंपुरती मर्यादित ठेवण्यात आली होती आणि या वस्तूंच्या किंमतींतील वाढ समर्थनीयच असते. या समर्थनाचा आणखी एक भाग असा ( संख्याशास्त्रीय पुराव्यावर आधारित ) की, या वस्तूंना देण्यात आलेले किंमत-निर्देशांकातील भारांकन इतके नगण्य आहे की त्यांच्यामुळे भावमानात १% पेक्षा अधिक वाढ झालेली असणे शक्य नाही आणि ही वाढही पूर्णपणे अपेक्षित अशीच होती.

तथापि, हे खरेच की अर्थसंकल्पाचा भावमानावर होणारा परिणाम, केवळ ज्यांच्यावरील कर वाढवण्यात येतात तेवढ्याच वस्तूंच्या किंमतीपुरताच मर्यादित नसतो. अर्थसंकल्पाचा परिणाम संपूर्ण अर्थ-व्यवस्थेवर व्हावा आणि त्यामुळे अर्थव्यवस्थेला एक विशिष्ट दिशा प्राप्त व्हावी अशी जर अपेक्षा असेल ( आणि आपल्या अर्थसंकल्पाकडून ही अपेक्षा धरू नये असे कोणता अर्थमंत्री सध्याच्या काळात म्हणेल ? ) तर साहजिकच अर्थसंकल्पाचा भावमानावर इतर अनेक मार्गांनी परिणाम होत राहील व तोही लक्षात घ्यावा लागेल.

भावमानावरील परिणामांच्या दृष्टीने, अर्थसंकल्पातील तुटीचा आकार हा महत्त्वाचा घटक असतो आणि १९७९–८० च्या अर्थसंकल्पातील रु. १३५५ कोटींची तूट ही आतापर्यंतच्या तुटींमधील एक फार मोठी तूट आहे. अर्थात, अर्थसंकल्पाचा भावमानावर जो परिणाम होतो तो घडून यायला काही काळ जावा लागतो आणि या दृष्टीने एप्रिल १९७९ नंतरची भाववाढ ही फेब्रुवारीत सादर केलेल्या व मार्चमध्ये संमत झालेल्या **अर्थसंकल्पामुळे** होणे शक्य नाही असे जे अर्थसंकल्पाच्या समर्थकांचे म्हणणे आहे त्यात तथ्य आहे.

तथापि, दुसऱ्या बाजूने असे म्हणता येते की, अर्थसंकल्पातून मिळणाऱ्या प्रचंड तुटीच्या केवळ **सूचनेमुळेच** किंमती भडकण्याला पोषक अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते. अर्थसंकल्प हा काही केवळ सरकारी जमाखर्चाचा हिशेब नसतो तर शासनाच्या धोरणाची घोषणा करण्याचे ते एक महत्त्वाचे साधन असते. वस्तूंच्या किंमती या शेअर्सच्या किंमतींइतक्या प्रतिसादक्षम नसतात हे जरी खरे असले तरी, भविष्यकाळातील घडामोडींचे सूचन करणाऱ्या महत्त्वाच्या घटकांमधील बदलांचे वस्तूंच्या किंमतींमध्येही प्रतिसाद उमटत असतात. १९७९ च्या ऑक्टोबरच्या पूर्वार्धात भावमान थोडेसे उतरले; हा लेख

लिहिण्याच्या वेळी ( ऑक्टोबरचा उत्तरार्ध ) या उतरणीची कारणमीमांसा देणे किंवा आतापर्यंतच्या भाव-मानाच्या प्रवृत्तीत काही ' पीछेमूड ' होत आहे किंवा काय हे सांगणे शक्य नाही. परंतु निदान शासनाचे प्रवक्ते मात्र असे म्हणतील की, हा प्रतिबंधक स्थानबद्धतेच्या वटहुकमाचाच परिणाम आहे.

या सर्वांचा अर्थ असा होतो की, अर्थसंकल्पाचा किंवा इतर धोरणांचा भावमानावरील परिणाम तपासणे हे सोपे काम नाही. भाववाढीच्या कारणांविषयीचा वाद इतर प्रकारच्या राजकीय प्रश्नांशीही निगडित आहे आणि त्यामुळे तो कोणताही स्पष्ट निष्कर्ष न निघता चालूच राहील.

१९७९ मधील भाववाढीची स्वतःची अशी काही खास वैशिष्ट्ये आहेत. सप्टेंबर १९७८ पासून भावमान प्रथम वाढू लागले आणि तेव्हापासून सप्टेंबर १९७९ पर्यंतच्या काळात भावमान १८% ने वाढले. याचा अर्थ असा की, ही भाववाढ १९७४ मधील भाववाढीइतकी तीव्र नाही. शिवाय १९७४ मधील भाववाढ मुख्यतः शेतमालातील भाववाढ होती तर या खेपेला शेतमालाच्या, विशेषतः धान्याच्या किमती स्थिर आहेत. शासनाने निर्धारित केलेल्या किमतींवर आधारलेला तपशील केवळ जून १९७९ पर्यंतच्या कालखंडापुरताच उपलब्ध आहे आणि त्यानुसार सप्टेंबर १९७८ ते जून १९७९ या कालखंडात अन्नधान्याच्या किमतींमध्ये कोणतीही वाढ झालेली नव्हती. अर्थात यानंतरच्या काळात मात्र अन्नधान्य-किमती वाढल्या.

इकनॉमिक टाइम्सच्या किंमत-निर्देशांकानुसार अन्नधान्यांच्या किमती ऑक्टोबर १९७८ ते ऑक्टोबर १९७९ या काळात १८५·३ पासून १९७·८ पर्यंत वाढल्या; परंतु नेहमीप्रमाणेच तेलबिया आणि वनस्पती तेले यांच्या किमतीतील वाढ लक्षणीय होती. उदा. उपरिनिर्दिष्ट कालखंडात शेंगदाणा तेलाच्या किमतींचा निर्देशांक १५३·९ पासून २४७·७ वर गेला. जून १९७९ पर्यंतच्या कालखंडापुरतीच व्यष्टिगत सरकारी आकडेवारी उपलब्ध आहे आणि ती लक्षात घेता असे स्पष्ट होते की, पुढील कारखानदारी वस्तूंच्या संदर्भातील भाववाढ विशेष लक्षणीय होती : धातू, मिश्रधातू, धातुनिर्मित वस्तू व यंत्रसामग्री आणि वाहतूक-सामग्री. सध्याच्या भाववाढीचे वैशिष्ट्य या माहितीवरून लक्षात येईल.

भारतातील भाववाढीच्या स्वरूपाचे या आधी जे मी विश्लेषण केलेले आहे (**सेमिनार**, जॅन्युअरी १९७५ ) त्यामध्ये मी असे दाखवून दिले आहे की, भावमानातील बदलांची मीमांसा करण्यासाठी भाव-मानातील दीर्घकालीन वृद्धि-प्रवृत्तीबरोबरच, कृषिमालाच्या किमती व औद्योगिक मालाच्या किमती यांच्यातील तोलाची परिस्थितीही ( the terms of trade phenomenon ) लक्षात घेणे जरूर आहे. प्रतिकूल हवा-मानाच्या काळात शेतमाल-किमती वाढतात व त्यानंतर त्या कमी होऊन स्थिरावतात. औद्योगिक मालाच्या किमतींचे ' वर्तन ' मात्र भिन्न असते. अल्पकालात तीव्र वाढ आणि त्यानंतर दीर्घकाळ स्थिरावट अशा प्रकारच्या ' पायऱ्या ' ( step function ) त्यांच्या बाबतीत आढळून येतात. शेतमालाच्या बदलत्या किमती आणि स्थिर औद्योगिक किमती अशा टप्प्यानंतर येणाऱ्या अल्पकालातच भाववाढ करून औद्योगिक क्षेत्राला आपली तौलनिक पीछेहाट भरून काढावी लागते; जेव्हा शेतमालाच्या, विशेषतः धान्यांच्या किमती स्थिर असतात तेव्हाच औद्योगिक किमती वाढवून घेण्याच्या दृष्टीने अनुकूलतम परिस्थिती असते.

वस्तुस्थिती जर वर सांगितल्यानुसार असेल तर एकंदर भावमान आणखी काही काळ वाढत राहील अशी अपेक्षा करायला काही हरकत नाही. या पुढच्या टप्प्यात भावमानात जी वाढ होईल ती कृषिमालाच्या किमतींमुळे होण्याचे संभवते. मान्सूनचे पाऊस अतिक्षीण पडल्याने उत्तर प्रदेशाचा फार मोठा भाग, आणि बिहार, मध्यप्रदेश, हरयाणा, महाराष्ट्र, ओरिसा, आंध्रप्रदेश आणि कर्नाटक यांचे काही भाग यांमध्ये तीव्र दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. देशाच्या अनेक भागांत धान्यकिमती

मंडकतील हा इशारा यावरून मिळतो. १९७८–१९७९ मधील १३० दशलक्ष टनांच्या विक्रमी धान्योत्पादनापेक्षा १९७९–८० मधील धान्योत्पादन कमी भरले हे स्पष्ट दिसत आहे.

यावर असा युक्तिवाद करता येईल की, २० दशलक्ष टनांचा जो भावस्थिरक ( buffer ) धान्यसाठा सरकारजवळ आहे त्यामुळे नजीकच्या भविष्यकाळात धान्यटंचाई व त्यातून निर्माण होणारी धान्यभाववाढ या गोष्टी टाळता येतील. परंतु धान्यवसुली आणि भावस्थिरक साठ्यांचे आतापर्यंतचे व्यवहार लक्षात घेता ही आशा अस्थानी असल्याचे लक्षात येईल. धान्यवैपुल्याच्या काळात जी धान्यवसुली सरकार करते ती कमतरतेच्या काळात वापरण्यासाठी असते ( जसे जोसफने फेअरोच्या भूमीत केले होते ) असे समजण्याचा मोह होणे शक्य आहे. परंतु ज्या आपल्या देशात २९० दशलक्ष लोक सरकारी आकडेवारीनुसार दारिद्र्यरेषेखाली आहेत त्या देशात १३० दशलक्ष टनांचे धान्योत्पादन कोणत्या अर्थाने वैपुल्यनिदर्शक आहे असे आपण म्हणू शकतो ? तेव्हा, हे 'वैपुल्य' म्हणजे, लोकांजवळील क्रयशक्तीच्या संदर्भातील धान्याच्या पुरवठ्याच्या आतिरिक्ततेचे केवळ एक लक्षण आहे; सरकारची धान्यखरेदी म्हणजे ही केवळ धान्याकिमती ठरवण्यामध्ये हात असणाऱ्या शेतकऱ्यांच्या हितसंबंधांचे रक्षण करणारी, एक बाजार मोकळा करण्याची ( market-clearing ) कृती आहे. हे सर्व असे असल्याने, दुष्काळी वर्षामध्ये धान्यसाठ्यांचा उपयोग किती केला जाईल हेही या हितसंबंधांवरच अवलंबून राहील.

यातून असे सुचवायचे नाही की, या २० दशलक्ष टनांच्या धान्यसाठ्यातून काहीच अन्नधान्य पुढील वर्षात बाहेर काढले जाणार नाही. परंतु एवढे मात्र निश्चित की, धान्यसाठ्यांच्या व्यवहारांचे जे तर्कशास्त्र आहे ते लक्षात घेता या साठ्यांतून फक्त इतकीच धान्यसंख्या बाहेर काढली जाईल की ज्यामुळे पुढील वर्षात धान्योत्पादकांच्या हितसंबंधांना धोका पोहोचणार नाही. या व्यवहारांमुळे संभाव्य भाववाढीच्या परिस्थितीतून काही सुटका होईल अशी खात्री निश्चितच देता येत नाही.

जाता जाता आणखी एका गोष्टीची नोंद घेऊ आणि ती म्हणजे, केवळ धान्यवसुलीच नव्हे तर धान्याच्या उत्पादनासंबंधीच्या ( सरकारी ) धोरणाचे जे मुख्य उद्दिष्ट असते ते म्हणजे 'बाजारा'चे ( म्हणजे बड्या उत्पादकांचे ) हितसंबंध जपणे. १९७८–८३ च्या पंचवर्षीय योजनेच्या प्रारूपामध्ये ( Draft Plan ) धान्योत्पादनाचे लक्ष्य ठरविण्याचा जो हिशोब आहे त्यावरून वरील मुद्दा सहज सिद्ध होतो. उत्पादनाची लक्ष्ये ठरविताना ती मागणीच्या अंदाजानुसार ठरविली गेली आहेत. पुनर्वितरणाच्या, विशेषत: न-निर्धनांकडून निर्धनांकडे क्रयशक्ती वळवण्याच्या उपायांच्या परिणामांचा अंदाज घेऊन, त्यांच्यामुळे धान्यमागणीमध्ये किती वाढ होईल ते अजमावण्याचा हिशेब केला गेला आहे. या हिशेबानुसार पुनर्वितरणामुळे निर्माण होणारी जादा मागणी एरवीपेक्षा ४ दशलक्ष टन अधिक एवढी अजमावण्यात आली आहे.

या हिशेबांनुसार १९८२–८३ मध्ये एकूण धान्यमागणी १४०·७८ व १४४·४८ दशलक्ष टन या दरम्यान भरेल असा अंदाज आहे. ही संख्या उत्पादनातील प्रक्षेपित ( projected ) वाढीशी मिळतीजुळती असून त्यातून १९८२–८३ चे उत्पादन-लक्ष्य अंदाजे १४५ दशलक्ष टन असे ठरले. याचा अर्थ असा होतो की, (या लक्ष्यपूर्तीमुळे) पुढील पाच वर्षांच्या काळात, दरदिवशीची दरमाणशी धान्याची उपलब्धता केवळ ०·०५ किलोने वाढेल. परंतु या सुधारणेचे नगण्यत्व लक्षात घेऊन त्यानुसार धान्योत्पादनाचे लक्ष्य पुरेसे वाढवण्याचा संकल्प योजना आयोगापुढे असणे शक्यच नाही; कारण मागणीपेक्षा जास्त, म्हणजेच 'अतिरिक्त पुरवठा' मुद्दाम निर्माण करण्याचे ( अन्नधान्यांचा सुद्धा ) धाडस कोणता योजना आयोग करेल ? योजनेत अंतर्भूत असलेले सुसंगतीचे हिशेब ( consistency models ) आणि देशाच्या समस्या यांच्यात काही संगती लावण्याचा प्रयत्न केला जातो की नाही हा प्रश्न अलाहिदा !

परंतु नेमक्या याच प्रकारच्या प्रश्नांमुळेच सध्याच्या आर्थिक परिस्थितीचा विचार दीर्घकालीन परिप्रेक्ष्यामध्ये ( perspective ) करणे आवश्यक ठरते. १९७९ मधील आर्थिक परिस्थितीचे भूतकालाशी कशा प्रकारचे नाते आहे आणि ही परिस्थिती भविष्यकालाबद्दल काय सूचन करते, हे मूलभूत प्रश्न आहेत.

आजकाल, ब्राझीलिअन, कोरिअन, जॅपनीज...अशा आर्थिक विकासाच्या प्रतिमानांबद्दल बरेच बोलले जाते. गेल्या तीन दशकांतील आपल्या अनुभवावरून, भारताच्या विकासाची रूपरेषा मांडणेही शक्य आहे. आतापर्यंतच्या विकासाची प्रमुख वैशिष्ट्ये नियोजन आयोगानेच स्पष्ट केली आहेत. १९७८–८३ च्या योजनेच्या प्रारूपग्रंथाच्या पहिल्या प्रकरणात स्वातंत्र्यानंतरच्या तीस वर्षांतील यशापयशाचे प्रांजळ मूल्यमापन जे आहे त्यातून पुढील चित्र उभे राहते :

( १ ) गेल्या पाव शतकाच्या कालखंडात, परावलंबी आणि स्थितिशील अशा अर्थव्यवस्थेच्या जागी आता एक आधुनिक आणि स्वयंनिर्भर अर्थव्यवस्था निर्माण झाली आहे, परंतु बेकार आणि अर्ध-बेकारांची संख्या अजूनही फार मोठी असून ४०% पेक्षा जास्त लोक अजूनही दारिद्र्यरेषेखाली आहेत.

( २ ) शेतमालाचे उत्पादन सतत वाढत आले आहे, परंतु दरडोई शेतमाल-उत्पादनात वाढ झालेली नाही.

( ३ ) औद्योगिक उत्पादनक्षमता वाढून तिच्यात वैविध्यही निर्माण झाले आहे. विशेषतः भांडवली वस्तूंचे उत्पादन लक्षणीयतः वाढून उपभोग्य वस्तूंच्या बाबतीत देश स्वयंपूर्ण झाला आहे.

मात्र, याबरोबरच आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण अधिक वेगाने वाढले असून जो औद्योगिक विकास झाला आहे तो प्रभावी मागणीनुसार झाला आहे व ही प्रभावी मागणी अर्थातच उत्पन्नाच्या वितरणानुसार ठरते. याचा अर्थ असा होतो की, उत्पादन साधनांचा फार मोठा भाग अशा वस्तूंच्या निर्मितीसाठी खर्ची पडत आहे की ज्यामुळे श्रीमंतांचे राहणीमान टिकून धरण्यात किंवा सुधारण्यातच या गोष्टींची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मदत होत आहे.

( ४ ) शेती आणि आधुनिक उद्योग यांच्या विकासामुळे बँकिंग, विमा व व्यापार यांना चालना मिळाली, परंतु यामुळे ज्यांचा लाभ झाला त्यांच्यातील बहुसंख्य हे ग्रामीण किंवा शहरी भागातले संपन्न लोकच आहेत आणि सर्वसामान्य माणूस या लाभापासून वंचितच राहिला आहे.

( ५ ) उत्पादनासाठी आणि शिक्षण व आरोग्य यांसारख्या सेवांसाठी आवश्यक असणारी आधारभूत संरचना ( infrastructure ) जरी वृद्धिंगत झाली असली तरी त्यांच्यापासूनचा बराचसा लाभ सापेक्षतः सुस्थितीतील लोकांनाच झाला आहे.

( ६ ) जरी उत्पादन वाढले असले तरी सुन्न करणारी गरिबी आणि विषमता अजूनही आहेतच.

ही सर्व वस्तुस्थिती आपल्याला आता पुरेशी परिचित ( व मान्य ) झालेली आहे. मतभेद तेव्हा निर्माण होतात जेव्हा या वस्तुस्थितीचे विश्लेषण केले जाते आणि त्यातून पुढील प्रश्नाला उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला जातो. हा प्रश्न म्हणजे ‘ ही वस्तुस्थिती म्हणजे केवळ एक योगायोग आहे की ती अर्थ-व्यवस्थेच्या संरचनेतून व व्यवहारपद्धतींमधूनच अनिवार्यपणे निर्माण होणारी गोष्ट आहे ? ’ हा होय. इतरत्र मी असे दाखवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे की, भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाचे गतितत्त्व उकलण्याच्या दृष्टीने तिची संरचना लक्षात घेणे आवश्यक ठरते. ( संदर्भः प्रस्तुत लेखकाचे *Poverty, Planning and Social Transformation, Allied,* १९७८ ). आतापर्यंतच्या भारतीय विकासाच्या धाटणीचे ( pattern ) वर्णन करावयाचे झाल्यास ‘ संरचनात्मक बदल न करता साधलेल्या विकासाचा

एक मासला ' असे करता येईल. ' तावडतोबीच्या समस्यांना प्रतिसाद देणे आणि अर्थव्यवस्थेची मूलभूत चौकट न बदलता त्या सोडवण्याचा प्रयत्न करणे ' असे आतापर्यंतच्या विकासाच्या प्रक्रियेचे स्वरूप राहिलेले आहे.

या संदर्भात असे म्हणता येईल की, खुद्द राजकारणाप्रमाणेच नियोजन ही देखील एक ' शक्य ते साधण्याची कला ' ठरते. "स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी भारताला अगदी क्षीण असा औद्योगिक पाया लाभलेला होता. कोट्यवधी लोक मागासलेल्या शेतकीच्या ओझ्याखाली निकृष्ट जीवन कंठीत होते. लोकसंख्येच्या वाढत्या भाराच्या पार्श्वभूमीवर दीर्घकालीन कुंठितता (stagnation) आणि नंतर आलेले दुसरे महायुद्ध यांमुळे भारतीय अर्थव्यवस्था कमकुवत झाली होती. दारिद्र्य आणि बेकारी सर्व अर्थव्यवस्थेला ग्रासून राहिली होती... कृषी व औद्योगिक क्षेत्रांतील उत्पादितता फार कमी होती. गरजेच्या मानाने उपलब्ध देशीय ( domestic ) बचत फारच तुटपुंजी होती...ग्रामीण अर्थव्यवस्थेची पुनर्उभारणी करणे, औद्योगिक व शास्त्रीय प्रगतीची पायाभरणी करणे आणि शिक्षण व इतर सामाजिक सेवांमध्ये वाढ करणे आवश्यक होते. यासाठी आर्थिक व सामाजिक जीवनांच्या सर्व अंगांना स्पर्श करणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील नियोजनाची आवश्यकता होती —कारण नियोजनाच्या माध्यमातूनच साधनसंपत्ती संघटित करून कामी लावणे, अग्रक्रम आणि लक्ष्ये निश्चित करणे, परिवर्तन व तंत्रसुधारणेला अनुकूल अशा प्रवृत्तींचा प्रसार करणे यासाठीचे प्रयत्न करता येतात. तेव्हा आर्थिक वृद्धीचा उच्च वेग, आर्थिक-सामाजिक जीवनातील संस्थांची पुनर्उभारणी आणि राष्ट्राच्या विकासाच्या कार्यात लोकांची शक्ती उपयोजणे यासाठी योजनाबद्ध विकास हा मार्ग होता."

सुरुवातीच्या पंचवार्षिक योजनांविषयक ग्रंथातील वरील अवतरणामध्ये भारतापुढील समस्या आणि त्या सोडवण्याचे उपाय यांची रूपरेषा मिळते. गतावलोकन केल्यास विकासप्रक्रियेमध्ये काही एक तार्किक सूत्र असल्याचे आढळून येणे शक्य आहे. महायुद्धानंतर लगेच निर्माण होणारी परिस्थिती आणि अन्नधान्याची तीव्र कमतरता लक्षात घेता धान्योत्पादनाकडे सर्वप्रथम लक्ष देणे आवश्यक होते आणि नियोजनाच्या पहिल्या टप्प्यामध्ये हेच केले गेले. हे संकट दूर झाल्यावर, निदान काही काळ तरी, ' दीर्घकालीन ' विकासाच्या दृष्टीने नियोजन करणे शक्य झाले आणि त्यासाठी खाजगी क्षेत्र आणि सार्वजनिक क्षेत्र यांच्या जबाबदाऱ्यांमधील भेद स्पष्ट केला गेला. खाजगी क्षेत्राने तावडतोबीच्या गरजा भागविण्याची, विशेषत: उपभोग्य वस्तूंच्या पुरवठ्याची जबाबदारी घ्यावी आणि सार्वजनिक क्षेत्राने उत्पादनासाठी आधारभूत संरचना, मूलभूत वस्तू आणि वित्तपुरवठा याकडे लक्ष द्यावे असे ठरले.

जेव्हा हुंडणावळीचा संरोध ( constraint ) निर्माण झाला तेव्हा अन्नधान्ये व गुंतवणूक या दोन स्वरूपांत विदेशी साहाय्याची व्यवस्था करण्यात आली. एक दीर्घकालीन स्वयं-निर्भरतेसाठीचे धोरण आखण्यात आले. यासाठी, ज्यायोगे जवळजवळ एका दशकात औद्योगिक उपभोग्य वस्तूंच्या बाबतीत स्वयंपूर्णता निर्माण होईल असा अर्थसाहाय्यित आयात पर्यायनाचा कार्यक्रम आखण्यात आला. जेव्हा धान्यप्रश्नाने पुन्हा डोके वर काढले तेव्हा ' हरितक्रांती'च्या द्वारे धान्योत्पादन वाढवण्याचा निवडक आणि सघन असा कार्यक्रम हाती घेण्यात आला आणि कृषिव्यवस्थेचे आधुनिकीकरण करण्याचे प्रयत्न केले गेले. आणि शेवटच्या टप्प्यामध्ये जेव्हा देशांतर्गत मागणीच्या कमतरतेचे विकासप्रक्रियेवर सावट पडू लागले तेव्हा ( सर्व जगातच गरीब राष्ट्रांच्या विकासासाठी वापरले जाण्याची शिफारस केल्या जाणाऱ्या निर्यात-अभिमुखी विकास-प्रणालीच्या पार्श्वभूमीवर ) अर्थसाहाय्यित निर्यात संवर्धन योजना बांधली गेली.

ही झाली ऐतिहासिक पार्श्वभूमीची रूपरेषा. आज ही पार्श्वभूमी कशात अभिव्यक्त होत आहे? आजच्या अर्थव्यवस्थेच्या वैशिष्ट्यांमधील एक अत्यंत ठळक वैशिष्ट्य म्हणजे सर्वसामान्य कुंठितता किंवा

जिचा उल्लेख कधी कधी 'संरचनात्मक पुच्छगमन ' ( structural retrogression ) असा केला जातो ती परिस्थिती. १९७५–७६ मध्ये प्रथमच देशीय बचत ( नक्त राष्ट्रीय उत्पादनाचा शेकडा भाग या स्वरूपात व्यक्त केलेली ) ही समग्र गुंतवणुकीपेक्षा जास्त भरली आणि त्यायोगे अर्थव्यवस्थेच्या स्वरूपात एक गुणात्मक बदल घडून आला. त्या वर्षी देशीय बचत १५·६ टक्के भरली व समग्र गुंतवणूक १५·३ टक्के भरली. हा फरक १९७५-७६ साली नगण्य असल्याकारणाने त्याकडे जवळजवळ कोणाचेही लक्ष गेले नाही. परंतु ही परिस्थिती तेव्हापासून तशीच टिकून आहे. १९७६–७७ मध्ये ही तफावत वाढली; परंतु १९७७–७८ मध्ये ती कमी झाल्यासारखे वाटले. जरी यासंबंधीची पूर्ण माहिती उपलब्ध नसली तरी १९७८–७९ मध्ये या परिस्थितीत फारसा बदल झाला नसणार असे दिसते. परंतु १९७९–८० सालासाठी केलेल्या एका प्रक्षेपणानुसार देशीय बचत १७·४ टक्के तर समग्र गुंतवणूक १४·८ टक्के भरते. ही तफावत महत्तम आहे. ( संदर्भ : माल्कम. एस्. आदिशेशैय्या, *A Mid-year Review of the Economy* 1979, The Associated Chambers of Commerce and Industry of India ).

या तफावतीच्या आकारापेक्षाही जी अधिक महत्त्वाची गोष्ट आहे ती म्हणजे देशीय बचत गुंतवणुकीपेक्षा जास्त भरण्याची ही घटना लागोपाठ पाच वर्षे घडत आहे साठीच्या मध्यापासून आतापर्यंत जवळजवळ गेल्या दीड दशकभर गुंतवणूक घटत आलेली आहे या गोष्टीसह, या तफावतीचा संयुक्त विचार केल्यास ही समस्या ' आली-गेली ' या प्रकारची नसावी असे सूचित होते.

या संदर्भात एक महत्त्वाची गोष्ट नमूद करावी लागेल आणि ती म्हणजे या वर्षात आढळून आलेली भाववाढ ही केवळ वेगवान आर्थिक विकासामुळे निर्माण झालेली एक आनुषंगिक घटना आहे असे म्हणता येत नाही. नियोजित आर्थिक विकासाच्या सुरुवातीच्या वर्षांमध्ये असे सांगितले जात असे की, एक विशिष्ट प्रमाणापर्यंत होणारी भाववाढ ही विकासप्रक्रियेत अंगभूतच होती; कारण गुंतवणूक हेतु-पुरःसर वाढवण्यात येत होती आणि त्या मानाने देशीय बचत अपुरी पडत होती. अविकसित अर्थ-व्यवस्थांच्या संदर्भात भाववाढीची जी सैद्धांतिक मीमांसा केली जाते तीमध्ये हा युक्तिवाद नेहमी आढळत असे. परंतु गुंतवणूक कमी होत असताना आणि अर्थव्यवस्थेला कुंठिततेची बाधा झालेली असताना मात्र भाववाढीचे काही निराळे स्पष्टीकरण द्यावे लागेल.

दुसरे म्हणजे, अर्थव्यवस्थेची कुंठितता उद्योग-क्षेत्रामध्ये विशेष प्रकर्षाने आढळून येते. जे औद्योगिक उत्पादन, पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या योजनेच्या काळात अनुक्रमे ६%, ७·५% व ८% या वेगाने वाढले होते ते १९६५–७० या काळात प्रतिवर्षी केवळ ३·५% ने व १९७०–७४ या काळात प्रतिवर्षी २·७५% ने वाढले. निर्यात-संवर्धनाच्या कार्यक्रमामुळे १९७६–७७ मध्ये हा वेग वाढला, परंतु १९७७–७८ मध्ये तो परत खाली गेला. १९७८–७९ मध्ये औद्योगिक उत्पादन ८% ने वाढून या क्षेत्राला पुन्हा लक्षणीय चालना मिळाली. ( हा वृद्धिवेग, गेल्या काही वर्षांतील कमाल वृद्धिवेग आहे. )

अनेकांना असे वाटले आणि काहींनी असा युक्तिवादही केला की, औद्योगिक कुंठिततेच्या काल-खंडाचा हा शेवट होय; परंतु एप्रिल ते ऑगस्ट १९७९ या काळातील एकूण औद्योगिक वृद्धीचा वेग शून्य झाला. पोलाद, सिमेंट आणि कोळसा या आधारभूत क्षेत्रातील वाढीचे वेग तर ऋण भरले ! तेव्हा लवकरच आता अर्थव्यवस्थेचे पुनरुज्जीवन होईल किंवा १९७८–७९ मधील वाढ म्हणजे पुनरुज्जीवनाची नांदी होती असे समजण्यात काही अर्थ नाही.

इथे देखील आपल्याला असे दिसते की, सहाव्या योजनेच्या सुरुवातीच्या काळच्या आर्थिक परिस्थितीच्या समीक्षेमध्ये, योजना आयोग अधिक परखड भूमिका घेतो. " ज्या प्रकारचा औद्योगिक

विकास झाला आहे त्यामध्ये प्रभावी मागणीच्या संरचनेचे प्रतिबिंब पडले आहे आणि प्रभावी मागणी ही उत्पन्न-वितरणानुसार ठरत असते. उत्पादन-साधनांचा फार मोठा भाग अशा वस्तूंच्या निर्मितीसाठी खर्ची पडत आहे की ज्यामुळे श्रीमंतांचे राहणीमान टिकून राहण्यात किंवा सुधारण्यात या गोष्टीची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मदत होत आहे. सापेक्षत्वाने लहान असलेल्या या वर्गांच्या मागणीचे स्वरूप, सध्याच्या औद्योगिक संरचनेचा मोठा भाग टिकवून धरण्यास हातभार लावते. याचा अर्थ असा होतो की, यापुढील औद्योगिक वाढ ही बाजार-मागणीच्या मर्यादांनुसार सीमित होत राहील. परिणामतः, सध्याची मागणी-पातळी लक्षात घेता, उपभोग्य व भांडवली वस्तूंचे आणखी आयात-पर्यायन हे औद्योगिक वाढ चालू ठेवण्याच्या दृष्टीने फारसे लाभदायक ठरू शकणार नाही." ( अधोरेखन माझे. )

सहाव्या योजनेच्या काळात ज्यांच्याशी मुकाबला करावा लागेल अशा दोन महत्त्वाच्या समस्यांपैकी एक समस्या म्हणजे, अर्थव्यवस्थेतील मागणीची न्यूनता ही आहे, हे वस्तुतः योजना आयोगाने ओळखले होते आणि एका अर्थाने, असे म्हणता येईल की, सहाव्या योजनेचा मुख्य रोख हा लोकसंख्येच्या अधिक मोठ्या भागाला क्रयशक्ती उपलब्ध करून देऊन, मागणीचे प्रवलन करण्याचा राहील. ही ( मागणीच्या न्यूनतेविषयीची ) गर्भित काळजी योजनेमध्ये कुठेकुठे स्पष्टपणे आणि प्रकर्षाने व्यक्त होते : ' ग्रामीण क्षेत्राची वेगवान वाढ आणि लघुउद्योगांच्या विकासाचा कार्यक्रम यांच्यामुळे क्रयशक्तीचे पुनर्वितरण होईल आणि औद्योगिक वाढीला बसलेली ( न्यून ) मागणीची खीळ ढिली पडेल. ' ...... ' ( औद्योगिक विकासाचे ) हे स्थूल धोरण ज्या गृहीतकावर आधारित आहे ते म्हणजे गुंतवणुकीतील मोठ्या संकल्पित वाढीमुळे, बहुजनांच्या सेवनासाठी योग्य अशा विविध वस्तूंना, अर्धसिद्ध ( intermediate ) मालाला व भांडवली वस्तूंना असलेली मागणी वाढेल. ही गुंतवणुकीतील संकल्पित वाढ पुढील प्रकारच्या रोजगारवर्धक कार्यक्रमांसाठी होईल : कृषि व कृषिसंबंधित कामे, जलसिंचन योजना, रस्ते व ऊर्जा यांसारखे आधारभूत संरचना निर्माण करणारे कार्यक्रम आणि पाणीपुरवठा, आरोग्य, प्राथमिक शिक्षण व घरबांधणी यांसारखे किमान गरजा भागविणारे प्रकल्प. '

ज्या समस्येकडे लगेच लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे योजना आयोगाने निर्देशिले आहे ती महत्त्वाची समस्या म्हणजे बेरोजगारी. बेरोजगारीच्या समस्येची सध्या अशी तीन अंगे आहेत की ज्यांचा विचार व्हावयास हवा. पहिले म्हणजे, योजना आयोगानेच दिलेली पुढील कबुली, की मार्च १९७८ मध्ये एकूण बेरोजगार अंदाजे २०.६ दशलक्ष व्यक्तिवर्षे इतका भरला ( ग्रामीण भागात १६.५ दशलक्ष व नागरी भागात ४.१ दशलक्ष व्यक्तिवर्षे ) ' आणि बेरोजगारविषयक आकडेवारी जेथे उपलब्ध आहे अशा देशांचा विचार केल्यास ही बेरोजगारी सर्व जगात सर्वाधिक आहे. '

बेरोजगारीच्या समस्येच्या ज्या दुसऱ्या तितक्याच महत्त्वाच्या अंगाचा योजनेच्या प्रारूपामध्ये उल्लेख आढळतो ते म्हणजे, खाणकाम आणि यंत्रोद्योगातील ( शेतीखेरीज उत्पादक रोजगार निर्माण करणारी क्षेत्रे ) रोजगाराची वाढ ही कामगार-दलाचे ( labour force ) वाढते प्रमाण कामावर लावण्यात यशस्वी झाली नाही. ' गुंतवणूक आणि उत्पादन या गोष्टी चांगल्या वेगाने वाढल्या, परंतु उत्पादनाची व तंत्रज्ञानाची घडण ( product mix and technology mix ) ही इतकी भांडवलवन असत आली आहे की रोजगारामध्ये त्या प्रमाणात वाढ झाली नाही. उदा. १९६१ ते १९७६ या कालखंडात कारखानदारीच्या क्षेत्रात गुंतवणूक व उत्पादन अनुक्रमे १३९% व १६१% नी वाढली, परंतु रोजगार केवळ ७१% ने वाढला. म्हणजेच, ठोकळ उत्पादनाच्या दर नगामागील रोजगार व भांडवलाच्या दर मात्रेमागील रोजगार अनुक्रमे ३४% व २८% ने कमी झाला. '

वरील दुसऱ्या मुद्यातूनच निर्माण होणारा तिसरा मुद्दा असा की, अर्थव्यवस्थेच्या संघटित क्षेत्रामधील रोजगारवाढ ही जास्तकरून सेवा क्षेत्रात आणि त्यातही शासकीय सेवांच्या ( अनुत्पादक ) क्षेत्रात झाली आहे. एकूण रोजगाराचे ' उत्पादक ' व ' अनुत्पादक ' असे जे दोन भाग पडतात त्यातील अनुत्पादक रोजगाराचे प्रमाण वाढण्याचा, अर्थव्यवस्थेतील भाववाढीच्या समस्येशी संबंध आहे. याचे कारण असे की, विशिष्ट कालखंडात जेव्हा ( रोजगार व ) उत्पादनात वाढ होते व ती अशा प्रमाणात होते की ( विशिष्ट प्रकारच्या ) वस्तूंना निर्माण होणारी मागणी त्यांच्या पुरवठ्याला मागे टाकते तेव्हा याचा अर्थ असा होतो की, अर्थव्यवस्था स्वतःच भाववाढीचे बीज सतत पेरत असते. त्यामुळे भाववाढ ही सतत दबा धरून बसलेली असते आणि मधूनमधून ( संधी येताच ) ती स्फोटक रूप धारण करते.

भाववाढीचा निदान एक भाग तरी अतिरिक्त मागणीमुळे निर्माण होतो हा वरील मुद्दा आणि त्याआधी, अर्थव्यवस्थेतील मागणी-न्यूनतेच्या समस्येचे केलेले विवेचन, या दोन गोष्टी परस्परविरोधी आहेत असे कदाचित वाटेल. परंतु वस्तुतः यामध्ये कोणताही विरोधाभास नाही. उत्पादनव्यवहारातून निर्माण होणारी प्रभावी क्रयशक्ती ही उत्पादनवाढ टिकवून धरण्याइतकी पुरेशी नाही हेही खरे आहे; आणि त्याचबरोबर हेही सत्य आहे की, अर्थव्यवस्थेत निर्माण होणाऱ्या काही विशिष्ट प्रकारच्या वस्तूंना द्रव्याचे पाठबळ असलेली भरपूर मागणी आहे. ही मागणीच अर्थव्यवस्थेतील एकूण उत्पादनाची जडण-घडण ठरवते आणि भाववाढीची परिस्थिती निर्माण झाली की त्या परिस्थितीला खत-पाणीही घालते.

१९७९ मधील बेरोजगारीच्या परिस्थितीचा या पार्श्वभूमीवर विचार केला पाहिजे. सहाव्या योजनेच्या प्रारूपग्रंथाच्या प्रसिद्धीनंतर रोजगार आणि बेरोजगारीविषयक फार थोडी नवी माहिती उपलब्ध झाली आहे. परंतु प्रारूपग्रंथात सूचित केलेल्या अनेक उपायांची अंमलबजावणी योजनेच्या पहिल्या वर्षात ( १९७८–७९ ) सुरू झाली. संसदेच्या नियोजनविषयक सल्लागार समितीला दिलेल्या अहवालात नियोजन आयोगाने असे नमूद केले आहे की, १९७८–७९ मध्ये ' कामाच्या बदल्यात अन्न ' कार्यक्रमाखाली १ दशलक्ष व्यक्तिवर्षे इतका रोजगार निर्माण झाला; राजस्थानमधील अंत्योदय कार्यक्रमाखाली १,६०,००० कुटुंबांना रोजगार व इतर लाभ प्राप्त झाले; महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेखाली ९,११,००० व्यक्तींना रोजगार देण्यात आला; वर्षातील वाढीव जलसिंचन योजनांनी ३,८०,००० व्यक्तिवर्षे इतका रोजगार निर्माण केला; छोट्या शेतकऱ्यांच्या विकास संस्थांकडून ७,७६,००० लोकांना तर ' ऑपरेशन फ्लड ' कार्यक्रमाखाली ९,००,००० लोकांना रोजगारसंधी उपलब्ध झाल्या. अशा पद्धतीने १९७३ मध्ये बेरोजगाराचे प्रमाण जे ८·५% होते ते १९७८ मध्ये ८% झाले असे नियोजन-आयोगाने अहवालात नमूद केले. ( संदर्भ : माल्कम. एस्. आदिशेशैय्या, पूर्वोक्त. )

या पद्धतीने बेरोजगारीत होणारी घट ही अर्थातच स्वागतार्ह आहे. परंतु दोन मुद्दे लक्षात घेणे जरुरीचे आहे. पहिले म्हणजे, नियोजन आयोगाच्याच अंदाजानुसार देशातील कामगार दल १९७८ मधील २६५·३ दशलक्ष या संख्येपासून १९८३ मध्ये २९४·८ दशलक्षांपर्यंत म्हणजे प्रतिवर्षी जवळजवळ ५ दशलक्ष या वेगाने वाढेल, म्हणजेच रोजगारपरिस्थिती आहे त्यापेक्षा अधिक वाईट होऊन न देण्यासाठीच ५ दशलक्षांचा जादा रोजगार दरवर्षी निर्माण करावा लागेल. दुसरे म्हणजे, या प्रकारच्या रोजगारामुळे श्रमिकांची उत्पादिता किती वाढेल, आणि भविष्यकाळात रोजगारसंधीची उपलभ्यता किती वाढेल याचाही विचार करणे आवश्यक आहे. या दोन प्रकारचे लाभ जर नगण्य असतील तर रोजगारात पडलेली भर ही क्रयशक्तीचे पुनर्वितरण करण्याचा, अल्पकालीन स्वरूपाचा एक आर्थिक आणि तितकाच राजकारणी स्वरूपाचा कार्यक्रम आहे असा अर्थ काढावा लागेल.

भूतकालाबद्दल व वर्तमान परिस्थितीसंबंधी वरील विचार मांडल्यानंतर आता भविष्यकाळात काय घडू शकेल याबद्दलही काही अंदाज मांडता येतील. १९७९ मधील भारतीय अर्थव्यवस्थेची आतापर्यंत चर्चिलेली वैशिष्ट्ये — भाववाढ, कुंठितता व बेरोजगार — ही वस्तुत: एकमेकांपासून अलग अशी वैशिष्ट्ये नाहीत. भूतकाळात घडलेल्या आर्थिक वृद्धीतूनच ती आकाराला आली आहेत आणि अत्यंत विषम अशा उत्पादन-साधन-वितरणाच्या चौकटीतील खाजगी संपत्ति-संचयाच्या अप्रतिहत प्रक्रियेचेच ते आनुषंगिक आविष्कार आहेत. या कारणानेच, नजीकच्या भविष्यकाळात या समस्यांवर सोपा उपाय सापडणे शक्य नाही. तथापि, आहे ती 'मूलभूत चौकट' जशीच्या तशीच ठेवून अर्थव्यवस्थेचे पुनरुज्जीवन करण्याचे घायकुतीचे प्रयत्न मात्र चालूच राहतील.

पुढील काही वर्षांसाठी जी धोरणे राबवली जातील ती सहज पुढीलप्रमाणे सांगता येतील : ही धोरणे नजीकच्या भूतकाळात वापरली गेलेली धोरणे असतील आणि ती म्हणजे लघु-उत्पादक व 'असंघटित क्षेत्राला' विशेष महत्त्व देणे, ग्रामीण अर्थव्यवस्थेची पुनर्उभारणी करणे आणि निर्यात संवर्धनाचे प्रयत्न चालू ठेवणे. ही तीन धोरणे का आवश्यक आहेत हे समजणे अवघड नाही. हे तीन असे भिन्न मार्ग आहेत की ज्यांच्यामुळे जादा क्रयशक्ती निर्माण होऊन अवरुद्ध अर्थव्यवस्थेचे पुनरुज्जीवन होईल. या प्रक्रियेतून जादा रोजगारही निर्माण होईल अशी आशाही या धोरणात अनुस्यूत आहे.

( १ ) आपण हेही लक्षात घेतले पाहिजे की, ज्या अर्थव्यवस्थेत खाजगी संचय ही मुख्य प्रेरणा असते तीमध्ये जादा रोजगारनिर्मिती हे अर्थनीतीचे प्रत्यक्ष उद्दिष्ट असू शकत नाही. नियोजन आयोगाने उत्पादनामधील वाढती भांडवल-घनता नमूद केलीच आहे ( यामुळेच रोजगारवाढ ही उत्पादनवाढीइतकी असू शकत नाही ) आणि संचय-प्रक्रियेचाच हा अटळ आविष्कार आहे. असे असल्यानेच अशा अर्थ-व्यवस्थेचा गाडा जर चालू ठेवायचा असेल तर क्रयशक्ती वाढवणे जितके अनिवार्य ठरते तितके बेरोजगार कमी करणे ठरत नाही. परंतु रोजगार वाढवणे ही आता एक राजकीय गरज झालेली असल्याने क्रयशक्ती वाढवण्याच्या प्रयत्नांबरोबरच हेही धोरण जारी ठेवावे लागेल.

लघु-उत्पादकांना महत्त्व देण्याने, क्रयशक्ती निर्माण करणे आणि रोजगारनिर्मिती या दोन्ही गोष्टी साधतात असे दिसते. यामुळेच हे धोरण गंभीरपणे राबवले जाईल आणि या प्रयत्नांच्या खरेपणा-विषयी संशय घेण्याचे काही कारण नाही. फक्त गैरसमज केव्हा निर्माण होतो तर लघु-उद्योजकांना महत्त्व देणे म्हणजे बड्या उद्योजकांच्या पोटावर पाय आणणे असा अर्थ केला जातो तेव्हा. जरी योजनेतील खर्च-तरतुदीमध्ये बड्यांकडून छोट्यांकडे असा ओघ वळवला गेला तरी त्यामुळे बड्यांच्या क्षेत्राला कोणत्याही प्रकारचा धोका पोहोचणार नसतो. मोठ्या उत्पादकांच्या क्षेत्राची कामगिरी ही योजनेमध्ये त्यासाठी किती तरतूद आहे यावर प्रत्यक्षतः अवलंबून नसते. उलट अशी तरतूद किंचित प्रमाणात या क्षेत्राच्या विरुद्ध दिशेने जाण्यामुळे त्यांच्या उत्पादनाला येणारी मागणी वाढणार असेल तर ते बड्या क्षेत्राच्या पथ्यावरच पडते. तेव्हा लघु-उद्योगक्षेत्राला अनुकूल अशा कार्यक्रमांचे मोठ्या-उद्योगक्षेत्रांकडून स्वागतच होईल आणि तेही विविध कारणांसाठी. ज्या प्रमाणात लघुक्षेत्र हे तंत्रदृष्ट्या मोठ्या क्षेत्राला पूरक आहे त्या प्रमाणात लघुक्षेत्राची वाढ, इतकेच नव्हे तर काही उद्योगव्यवसाय लघुक्षेत्रासाठी आरक्षित करून ठेवण्याचे धोरण, या गोष्टी मोठ्या क्षेत्राच्या फायद्याच्याच आहेत; यामुळे होते काय तर पोट-कंत्राटे देण्याच्या तत्त्वाला औपचारिक मान्यता मिळते.

लघु-उत्पादकांबरोबरच्या आपल्या संबंधांचा, मोठे उत्पादक अनेक प्रकारांनी उपयोग करून घेऊ शकतात. स्वतःची चिन्हे ( brand names ) वापरून विपणनात विशेषीकरण करणाऱ्या मोठ्या व्यवसाय-

संस्था अनेकदा प्रत्यक्ष उत्पादनासाठी लघु-उत्पादकांचा उपयोग करतात, या दुव्यामुळे अनेकदा लघु-उत्पादकांना दिल्या जाणाऱ्या सवलतींचा व अर्थसाहाय्याचा अप्रत्यक्षतः लाभ उठवणे मोठ्या उत्पादकांना शक्य होते. लघु-क्षेत्राच्या माध्यमातून वाढलेल्या उत्पादनामुळे, मोठ्या उत्पादकांना संघटित श्रमिकांशी होणारे मुकाबले टाळणे काही प्रमाणात शक्य होते. म्हणजे, ( असंघटित ) श्रम-बाजारात, लघु-उत्पादकांना मोठ्या उत्पादकांचे प्रतिपत्री (proxy) करणे शक्य असते. या सर्व मुद्द्यांतून असे दिसते की, आपण आता निश्चितपणे 'छोट्या व्यक्तीच्या युगात' प्रवेश केला आहे. परंतु त्याच-बरोबर हेही नमूद केले पाहिजे की, अगदी 'लहानातली लहान व्यक्ती' म्हणजे ती की जी स्वतःच्या धंद्यात रु. १ लाख गुंतवू शकते ( तथाकथित 'चिमुकले क्षेत्र' – 'tiny sector' ) आणि या लहान उद्योगांच्या मालकांच्या संख्येपैकी फार मोठा भाग हा अगदी सहज ( उत्पन्न-वितरणाच्या संदर्भात ) सर्वोच्च २% व्यक्तींमध्ये मोडतो !

( २ ) लहान उत्पादकांना प्रोत्साहन देण्याच्या बाबतीत मोठे शेतकरी हे मोठ्या कारखानदारां-इतके उत्साही नसणे शक्य आहे. परंतु याही क्षेत्रात, छोट्यांना दिलेल्या पाठिंब्यातून मोठ्यांना लाभ निर्माण करण्याच्या दृष्टीने आवश्यक अशा तरतुदी निर्माण करणे काही कठीण नाही. 'ग्रामीण परि-वर्तना'चा कार्यक्रम अशा विचारधारेवरच आधारित आहे. ग्रामीण लोकसंख्या नागरी लोकसंख्येच्या चौपटीपेक्षा अधिक असल्याने ती अधिक मोठी व स्थिर अशी संभाव्य मागणी उपलब्ध करते आणि शासनयंत्रणेच्या द्वारा जर या मागणीचे 'आराधन' केले गेले तर त्यात कुणाचे काय जाते ?

( ३ ) निर्यात संवर्धनाचे धोरणही चालूच राहील आणि वरील दोन धोरणांचे लाभ-प्राप्त करून घेण्यात जर विलंब झाला तर निर्यात संवर्धनाला विशेषच महत्त्व येईल.

या तीन धोरणांचा जरी उघडपणे उपयोग केला गेला तरी भाववाढीची प्रक्रिया मधूनमधून डोके वर काढत राहीलच. याचे एक कारण म्हणजे, शासनाची अर्थसंकल्पीय तूट कमी करण्याची असमर्थता हे होय. सैद्धांतिकदृष्ट्या, अर्थसंकल्पीय तूट म्हणजे दुसरे तिसरे काही नसून, आपली राजकीय सत्ता वापरून स्वतःसाठी क्रयशक्ती ( आर्थिक सत्ता ) निर्माण करण्याचा सरकारचा प्रयत्न. आपल्यासारख्या 'मिश्र अर्थव्यवस्थे'त अर्थसंकल्पीय तुटीचा परिणाम अर्थव्यवस्थेत केवळ जादा द्रव्यरूप मागणी निर्माण करण्यापुरता मर्यादित नसतो. खाजगी क्षेत्रातील आर्थिक सत्तेच्या वाटणीवरही या तुटीचा बिभेदकारी ( discriminatory ) परिणाम होत असतो; कारण ज्यांच्याजवळ आधीच भरपूर आर्थिक सत्ता असते त्यांना सरकारच्या आर्थिक व्यवहारांतून स्वतःचे उखळ पांढरे करण्याची संधी मिळते. अव्याहत व वाढती अशी अर्थसंकल्पीय तूट याच कारणाने आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण वाढण्यास कारणीभूत ठरते. यातूनच सरकारी व्यवहार आणि धोरणे ही खाजगी क्षेत्रातील बलिष्ठ गटांच्या हितसंबंधांशी सुसंगत आणि त्या हित-संबंधांपुढे गोंडा घोळणारी अशी बनू लागतात.

अर्थव्यवस्था आणि अर्थव्यवस्थेतील व्यवहारांचे दिग्दर्शन करणारी किंमतयंत्रणा, या गटांच्या दबावाखाली अधिकाधिक येत राहतील. या गटांची संचयासक्ती मधूनमधून अनिवार्य भाववाढ निर्माण करेल. जेव्हा आर्थिक 'वृद्धी'तून साधणारा संचय क्षीण होतो तेव्हा प्रत्यक्ष शोषणामधून संचय साधणे आवश्यक ठरते. किमतीमधील वाढीतून वास्तविक नफावाढ साधता येते—जर वास्तविक वेतनातील वाढ ही किमतीमधील वाढीपेक्षा कमी ठेवता आली तर. भाववाढीकडे पाहण्याचा हा 'प्रयोजनात्म' ( functional ) दृष्टिकोण झाला आणि या दृष्टीने पाहता शासनाची जी अधिक सुव्यक्त धोरणे आहेत

त्यांच्यामध्ये, मधून मधून होणारी भाववाढ ही प्रयोजितच ( programmed ) असते. परिणामतः अर्थनीतीमधून जरी 'लहान व्यक्ती'चा उदो उदो झाला तरी प्रत्यक्षात, लहान आणि कमकुवत व्यक्ती या ( बड्यांना अनुकूल अशा ) अर्थव्यवस्थेच्या मगरमिठीत येत राहणार.

हे स्पष्ट करणे आवश्यक आहे की, वर सूचित केलेला अधिकृत व अनधिकृत धोरणांचा संवेष्टित कार्यक्रम ( package of measures ) हा एक शासनाचा (अपेक्षित) 'राष्ट्रीय' कार्यक्रम असेल; तो कोणत्याही एका विशिष्ट राजकीय पक्षाचा ( अपेक्षित ) कार्यक्रम म्हणून सुचवायचा हेतू नाही. सत्तेच्या आखाड्यातील सर्वच प्रमुख पक्षांची या कार्यक्रमाशी बांधीलकी आहे. अर्थात, राजकारणाचे स्वरूप लक्षात घेता, प्रत्येक पक्ष या कार्यक्रमाचे समर्थन करण्यासाठी आपापल्या वाग्शाच्या विभूतीला खर्ची घालेल आणि कार्यक्रमाचा उद्घोष आपापल्या खास मंत्रवाक्यात करेल. परंतु कार्यक्रमातील मालमसाला तोच राहणार; कारण ज्यांची मुख्य बांधिलकी ही ( संचयप्रधान ) अर्थव्यवस्थेशी आणि तिच्या गतितत्त्वाशी आहे त्यांना प्रस्तुत परिस्थितीत या कार्यक्रमाखेरीज फारसे निराळे पर्यायच उपलब्ध नाहीत.

■ ■

---

## लेखक-परिचय

**शंकर केशव मोडक** : प्रपाठक, अर्थशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ.

**नी. वि. सोवनी** : कार्याध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद.

**सी. टी. कुरियन** : संचालक, मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ डेव्हलपमेंट स्टडीज, मद्रास.

**अविनाश जोशी** : अध्यापक, बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे ४११ ००४.

**स. ह. देशपांडे** : प्रपाठक, शेती अर्थशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ. संपादक 'समाज प्रबोधन पत्रिका'.

**शिवकुमार खोबरे** : अध्यापक, श्री दत्त महाविद्यालय, कुरुंदवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

**श्री. पं. खेर** : अर्थशास्त्राचे अभ्यासक. पत्ता : गांधी चौक, धारवाड.

---

## टिपणे आणि चर्चा

### " महत्तमीकरण आणि गणनसामर्थ्य " चर्चेला उत्तर

म. ह. देशपांडे

" महत्तमीकरण आणि गणनसामर्थ्य " ( **अर्थसंवाद,** खंड २, अंक १, एप्रिल-जून १९७८ ) या माझ्या लेखावर वसंत पळशीकर, आनंद नाडकर्णी ( खंड २, अंक ३, ऑक्टोबर-डिसेंबर १९७८ ), रमेश पानसे ( खंड २, अंक ४, जानेवारी-मार्च १९७९ ), चिं. त्र्यं. येवलेकर, भ. ग. बापट ( खंड ३, अंक १, एप्रिल-जून १९७९ ) यांच्या प्रतिक्रिया प्रसिद्ध झाल्या आहेत. या भाष्यकार-टीकाकारांचे आभार मानून मुख्य मुद्द्यांना उत्तरे देण्याचा प्रयत्न करीत आहे. अर्थशास्त्र हे शास्त्र आहे की जीवनदृष्टी ( ideology ) आहे, पूर्ण ज्ञानाचेच गृहीतकृत्य का, आदिवासींची संस्कृती श्रेष्ठ की बिगर-आदिवासींची, इत्यादी पळशीकर यांनी उपस्थित केलेले प्रश्न सरळ-सरळ विषयाच्या बाहेर पडतात म्हणून ते एरवी महत्त्वाचे असले तरी त्यांचा विचार येथे केला नाही. शिवाय रमेश पानसे यांनी त्यांपैकी काहींना समर्पक उत्तर अगोदर दिलेलेच आहे.

माझे जे मुख्य प्रतिपाद्य आहे त्याच्या स्पष्टीकरणार्थ मी दिलेली काही उदाहरणे पुरेशी प्रत्यायक ( convincing ) नाहीत हा आक्षेप विचारांती मला मान्य करावासा वाटतो.

मुख्य विवेचनाशी संबंध असा सर्वात महत्त्वाचा मुद्दा आनंद नाडकर्णी यांचा आहे. " संख्यात्मक मापनपद्धती काटेकोर म्हणून गणनसमर्थांनाच पेलणारी तर क्रमात्मक पद्धती मोघम म्हणून गणनहीनांच्याही आवाक्यातली अशी समजूत देशपांडे यांनी करून घेतली आहे. परंतु ही समजूत बरोबर नाही, " असे त्यांनी म्हटले आहे. हे स्पष्ट करण्यासाठी उपभोक्त्याच्या वर्तनाविषयीच्या ( consumer behaviour ) सिद्धान्ताचा आधार त्यांनी घेतला आहे व क्रमात्मक उपयोगितेचे गृहीत स्वीकारले तरी पर्यायता दर व किमती यांच्या गुणोत्तराचे साम्य प्राप्त करून घेताना गणनसामर्थ्याची जरुरी असतेच असे दाखविले आहे. संख्यात्मक उपयोगितेचे जुने गृहीतकृत्य त्याज्य ठरवून क्रमात्मक उपयोगितेचे नवे स्वीकारले तरी गणनक्रियेपासून सुटका नाही हे नाडकर्णी यांचे म्हणणे प्रस्थापित उपभोक्ता-वर्तन-सिद्धान्ताच्या संदर्भात खरे आहे. पण मुळात हे उदाहरणच गैरलागू आहे, कारण ते **विनिमया**च्या क्षेत्रातले आहे. 'किमती' आहेत याचाच अर्थ विनिमय अस्तित्वात आहे आणि विनिमय उपस्थित झाला की गणनसामर्थ्य हवे असे तर माझेच म्हणणे आहे. म्हणजे मी जे म्हणतो तेच नाडकर्णी ( अबोधपणे ) सिद्ध करीत आहेत. माझे विधान असिद्ध ठरविण्यासाठी नाडकर्णी यांनी विनिमयबाह्य म्हणजे स्वयंपूर्ण कुटुंबाच्या अर्थ-व्यवहारातील उदाहरण देऊन तेथेही गणनशक्ती अनिवार्य आहे असे दाखवावयास हवे होते. तसे त्यांनी

केलेले नाही. मी असे उदाहरण ( विकस्टीडच्या 'गृहिणी'चे ) देऊन शुद्ध विनिमयरहित जगात उपभोक्ता-समतोल गणन-सामर्थ्याशिवाय कसा सिद्ध होतो हे दाखविले आहे.

मात्र मी घेतलेले उदाहरण **उपभोक्ता** वर्तनाविषयी आहे; स्वयंपूर्ण ( विनिमयरहित ) कुटुंबाच्या **उत्पादकीय** निर्णयात ( Producer decisions ) गणनशक्ती अपरिहार्य आहे की नाही हा प्रश्न उरतोच. उत्पादकीय निर्णयांचे विश्लेषण ज्या अर्थशास्त्रज्ञांनी केलेले आहे त्यांचे विवेचन वाचताना त्यातून नाडकर्णी यांच्याच म्हणण्याला पाठिंबा मिळतो असे मात्र दिसते. ( उदा. Earl O. Heady, *Economics of Agricultural Production and Resource Use*, Prentice-Hall of India, New Delhi, 1964 या ग्रंथातील चौदावे प्रकरण "Firm-household Interreletionships and Efficiency within the Farm" ). पण हेडी यांनी केलेल्या अवडंबराची जरूर नाही असे मला अंधुकपणे वाटते आहे एवढेच सूर्त म्हणतो. कालांतराने या विषयावर मी स्वतंत्र टिपण लिहीन.

जाताजाता एक गैरसमज दूर करण्याची संधी घेतो. विकस्टीड यांचा हवाला मी माझ्या मुख्य विधानासाठी, म्हणजे गणनशक्तीच्या आवश्यकते-अनावश्यकतेच्या प्रश्नासाठी घेतला नव्हता. त्यांनी केलेली अर्थव्यवहारांची विभागणी मला सोयीची वाटली म्हणून तेवढ्यापुरती घेऊन पुढचे प्रतिपादन मी स्वतंत्रपणे केलेले आहे. माझ्या मुख्य विधानाला विकस्टीड यांचा आधार आहे असे मला दर्शवायचे नाही. नाडकर्णी यांचा तसा गैरसमज झालेला दिसतो. एकच, म्हणजे 'काटकसरी'चे तत्त्व दोन्ही प्रकारच्या व्यवहारांत कसे अनुस्यूत असते हे दाखविणे एवढाच विकस्टीड यांचा हेतू आहे हे नाडकर्णी यांचे आकलन अर्थातच यथार्थ आहे.

नाडकर्णींचा दुसरा मुद्दा 'महत्तमीकरणा'चा नेमका अर्थ काय करावा याविषयीचा आहे. नाडकर्णी म्हणतात, "प्रत्येक व्यक्तीमध्ये जर महत्तमीकरणाची प्रवृत्ती असली तर ती तिला **उपलब्ध** असलेली भौतिक साधने, तिचे ज्ञान आणि कौशल्य यांच्या साहाय्याने **शक्य तेवढा** अधिकतम लाभ करून घेण्याचा प्रयत्न करील हे उघडच आहे. येथे कुवतीचा प्रश्न येतोच कुठे?" ( जाड टाईप मुळातला ) ह्या प्रश्नाचे एक उत्तर येवलेकरांनी मार्मिकपणे दिलेले आहे. दुसरे उत्तर असे की, कुवतीचा प्रश्न 'शक्य तेवढा' असे म्हणतानाच येतो. 'शक्य तेवढा अधिकतम' ( –खरे म्हणजे ही शब्दरचना अर्थहीन आहे, पण ते सोडा– ) आणि खराखुरा वस्तुनिष्ठ रीतीने प्राप्य असा अधिकतम ह्या संकल्पना वेगवेगळ्या आहेत. विशेषतः उत्पादनविषयक निर्णयात. उपभोगविषयक निर्णयात अधिकतमाचे निर्णायक असे बाह्य किंवा वस्तुनिष्ठ गमक नसते. म्हणजे अखंड मद्यपान करणारा माणूस आणि अखंड ग्रंथवाचन करणारा माणूस हे दोघेही आपापल्या पसंतीप्रमाणे आपापला अधिकतम साधतात असे म्हणता येते. एवढेच काय, पु. भा. भावे यांच्या गोष्टींतला स्वतःची रक्तवाहिनी हेतुपूर्वक कापून आत्महत्त्या करणारा नायक हाही त्याच्या स्वतःची सुखाची, त्याच्या विशिष्ट परिस्थितीत, परमावधी गाठतो असे म्हणावे लागते. पण विनिमययुक्त जगातील उत्पादनविषयक निर्णयात महत्तम नफा हा बाह्य आणि वस्तुनिष्ठ निकष लावता येतो आणि अर्थशास्त्रीय सिद्धान्तनात तो लावलाही जातो. ( माझ्या लेखाच्या सुरुवातीला मी हे म्हटलेच आहे. अर्थ-शास्त्रीय गृहीतकृत्यातील या द्वैताची चर्चा शिटॉव्हस्की यांच्या एका लेखात आहे त्याचे नाव मी विसरलो. ) उदाहरणार्थ, बाजारातील मजुरीचा दर व सीमान्त उत्पादिता वक्र माहीत असेल तर महत्तम नफ्याचा एकच एक बिंदू निःसंदिग्धपणे निष्पन्न होतो किंवा दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, किती मजूर कामावर लावले म्हणजे नफा अधिकतम होईल या प्रश्नाचे निःसंदिग्ध संख्यात्मक उत्तर मिळते. ही वस्तुनिष्ठ अधिकतमाची स्थिती. पण ज्याला आकडेमोड करता येत नाही असा उत्पादक या स्थितीच्या अलीकडे राहून किंवा

पलीकडे जाऊन मजुरांची संख्या नियुक्त करील व परिणामी वस्तुनिष्ठ अधिकतमापेक्षा कमी नफा मिळवील. तो नफा त्याच्या 'कुवती'तला अधिकतम असेल पण खराखुरा, वस्तुनिष्ठ अधिकतम असणार नाही.

शिवाय, नाडकर्णी काय म्हणतात हा प्रश्न नाही. अर्थशास्त्राच्या पुस्तकांमध्ये 'शक्य तेवढा' लाभ असे म्हटलेले असते का ? की अधिकतमावरच जोर दिला जातो ? नाडकर्णी यांच्या अर्थाने महत्तमी-करण मान्य केले तर सार्वत्रिक सुयुक्त उपयोजनाचा किंवा 'पॅरेटो' समतोलाचा सिद्धान्त निष्पन्नच होणार नाही.

त्याच संदर्भात नाडकर्णी पुढे म्हणतात, "'मडक्यात दाणा तर बिळ उताणा' ह्या परिस्थितीतही भिल्ल **त्याच्या विशिष्ट परिस्थितीत** महत्तमीकरण साधत असतो असेच म्हटले पाहिजे." हे बरोबर आहे, पण हे उदाहरण विरंगुळा-पसंतीचे ( Leisure-preference ) आहे, कुवतीविषयीचे नाही.

आणखी असे की 'ज्ञान' आणि 'कौशल्य' ह्या संज्ञांचा नाडकर्णी पर्यायी म्हणून उपयोग करतात. त्यांचा वेगळा विचार करावयाला हवा असे मी म्हटले आहे. कौशल्याचा, सामर्थ्याचा, विशेषतः गणनसामर्थ्याचा, एक आवश्यक गृहीतकृत्य म्हणून अर्थशास्त्रीय पुस्तके उल्लेख करीत नाहीत हीच तर माझी तक्रार आहे. मला 'कुवती'चा ( Ability ) उल्लेख फक्त फ्रेजर यांच्या *Economic Thought and Language* या पुस्तकात आढळला व त्याचा संदर्भ मी माझ्या मूळ लेखात दिलेला आहे. शिवाय हा उल्लेखही स्पष्टीकरणाशिवाय मोघमपणे आलेला आहे. माझे वाचन मर्यादित असण्याची ( भरपूर ) शक्यता आहे. पण मी उल्लेखिलेल्या अडचणीचा अर्थशास्त्राच्या प्रमुख संहितांमधून परामर्श घेतलेला आहे असे नाडकर्णींनी ( किंवा इतर कुणी ) दाखवून दिले तरच कुवतीचा मुद्दा, नाडकर्णींच्याच शब्दांत सांगायचे तर, 'निकाला'त निघेल.

आदिवासींना 'उद्या'चा विचार नाही हे माझे म्हणणे असिद्ध राहते आणि 'नियोजनशून्यता' आदिवासी-विशिष्ट नाही असे बापट यांचे म्हणणे आहे. पहिल्या आक्षेपाबद्दल एक गोष्ट लक्षात ठेवायची ती अशी की, अनेक आदिवासींची स्वभावरचना या प्रकारची आहे असे अनेक अभ्यासकांनी एवढेच नव्हे तर कार्यकर्त्यांनीही म्हटले आहे. ( उत्तरोक्तांपैकी जयंत पाटील, आबा करमरकर यांचा नामोल्लेख मी केला आहे. पूर्वोक्तांसाठी वसंत नारगोळकर, व्हेरिअर एल्विन, डी. सिमिंग्टन, सावे इत्यादींचे ग्रंथ चाळावेत. ) दुसरे असे की, माझ्या प्रस्तुत परिच्छेदातील एकच उदाहरण न घेता सर्वच घेऊन त्यातून काही रचनाकृती (Pattern) सूचित होते का ते पाहावे; तशी होते असे मला वाटले. गुंटूर मिरचीचे उदाहरण माझ्या भूमिकेला 'छेद' देणारे नसून ते तिच्याशी सुसंगत आहे हे पुन्हा विचार केला तर बापट यांच्या लक्षात येईल. मात्र शेतीपेक्षा रोजंदारीला अधिक पसंती का या प्रश्नाचा विचार करताना 'वाट पाहण्याच्या' **प्रवृत्ती**प्रमाणेच कुवतीकडेही लक्ष दिले पाहिजे हा बापट यांचा मुद्दा विचारात घेण्यासारखा आहे.

आदिवासींना भविष्यकाळ अंधुक दिसतो म्हणून दीर्घकालीन नियोजनाची दृष्टी त्यांच्यामध्ये अभावानेच आढळते असे सूचित करताना मी म्हटले होते, "आपण समाजाच्या भविष्याचा वेध घेऊन... योजना तयार करतो... आपली ही सर्व विचारप्रक्रिया विवेकी आहे..." इत्यादी. येथे 'आपण' असे म्हणत असताना 'आपल्या' म्हणजे बिगर-आदिवासी समाजाची आदिवासी समाजाशी तुलना अभिप्रेत आहे हे संदर्भावरून पूर्णपणे स्पष्ट आहे. पण मला भांडवलशाहीचा समर्थक बनविण्याची बापट यांना घाई झाली आहे. ( तशी इतर संदर्भांत पळशीकर व नाडकर्णी यांनाही झाली आहे हे पुढे येईलच. ) "भांड-वलशाही अर्थव्यवस्थेत असे विवेकी नियोजन होत नाही ही तर खरी व्यथा आहे," असे ते म्हणतात.

बापटांची व्यथा दुर्दैवाने त्यांच्याकडेच राहू देणे प्राप्त आहे; कारण या विषयात जायचे तर निष्कारण विस्तार वाढेल.

पळशीकर, नाडकर्णी आणि बापट हे तिघेही 'शोषणा'च्या व्यापक विषयात शिरले आहेत. पण त्यातून कंठशोषाखेरीज दुसरे काही मला जाणवले नाही. का ते पुढीलप्रमाणे :

पळशीकर यांचे म्हणणे असे की, शोषणाच्या प्रक्रियेत महत्त्व आहे ते जित-जेते संबंधांना; गणनहीनता हे फार तर 'शोषणाचे आणखी एक कारण' असू शकेल. "एरवी गणनसामर्थ्यावर दिला जाणारा भर हा मुख्य समस्येला बगल देऊ शकणारा ठरू शकतो." नाडकर्णींच्या मते शोषण भौतिक साधनांच्या विषम वाटणीतून निर्माण होते. "अशा परिस्थितीत आर्थिक शोषणाचे विश्लेषण करताना गणनहीनतेवर भर देणे म्हणजे मूलभूत प्रश्नास बगल देण्यासारखे आहे." बापट यांचे म्हणणे यासारखेच आहे. "प्रा. देशपांडे यांना शोषण कुठे दिसते तर वजनमापात आणि हिशेबातील फसवणुकीत...बाजार-व्यवस्थेतील किंवा एकूण अर्थव्यवस्थेतील असमान विनिमयामुळे हे (शोषण) घडत असावे, हा असमान विनिमय उत्पादन-साधनातील असमान वाटणीमुळे, मालकी हक्कामुळे निर्माण होत असावा असे त्यांना (म्ह. मला — लेखक) वाटत नाही."

या सर्व टीका अत्यंत स्तिमित करणाऱ्या आहेत. "Set up a straw man and knock him down" असा किंवा साप म्हणून भुई धोपटण्याचा हा प्रकार आहे. हे तीनही किझॉत (Don Quixot) पवनचक्कीवरच हल्ला चढवीत आहेत. कारण शोषण हा माझ्या लेखाचा मुख्यच नव्हे तर दुय्यम विषयही नाही आणि माझी या विषयावर काहीही मते असली तरी या क्रांतिकारक लढ्यात खंदकाच्या कुठल्या बाजूला मी उभा आहे याचा पुरावा माझ्या मूळ लेखात तरी मी दिलेला नाही. त्यामुळे ही टीका सर्वस्वी गैरलागू म्हणून दुर्लक्षित करणे व **अर्थसंवाद**ची जागा व वाचकांचा वेळ वाचविणे मला शक्य होते. पण टीकाकारांपैकी नाडकर्णी व बापट यांनी मी शोषणाच्या समग्र विश्लेषणाला हात घातलेला आहे असा भास उत्पन्न करण्याचा प्रयत्न केलेला असल्यामुळे, पानसे आणि येवलेकर यांनी या बाबतीत माझा पाठपुरावा केलेला असूनही, या विषयात थोड्या तपशिलाने जाणे — म्हणजे हा विषय मी विचारासाठी घेतलाच नाही हे सिद्ध करणे — मला भाग पडते आहे.

खरे म्हणजे गणनहीनता हे शोषणाचे एकमात्र कारण मी समजत नाही. मी शोषणाची उदाहरणे देऊन म्हटले होते, "ह्या सर्व शोषणामागे अनेक घटक आहेत. त्यांत आदिवासींची गणन-हीनता हा सर्वात मोठा घटक आहे असेही प्रस्तुत लेखात सुचवावयाचे नाही. किंबहुना हा अजूनही सशोध्य विषय आहे अशीच लेखकाची धारणा आहे." इतके मी म्हटल्यावर वस्तुत: माझ्यावर हल्ला करण्यासारखे टीकाकारांजवळ काहीही उरलेले नव्हते, पण पुरोगामित्वाची नशा अशी स्वस्थ बसू देणारी नसते. मी गणनहीनता हे शोषणाचे एकमात्र किंवा निदान 'महत्त्वाचे' कारण मानतो असे मत माझ्यावर लादून मला जनता न्यायालयापुढे (People's Court) खेचण्याचा त्यांचा अट्टाहास आहे. नाडकर्णी यांनी आपल्या लेखाच्या शीर्षकातच 'शोषण' आणलेले आहे! ("गणनसामर्थ्याचा अभाव आणि आर्थिक शोषण". चर्चाविषयीभूत माझ्या लेखाचे शीर्षक "महत्तमीकरण आणि गणनसामर्थ्य.") जणू काही माझा मुख्य विषय शोषण हाच आहे! बापट म्हणतात, "वजनमापातील लबाडी व त्यातून होणारे शोषण हे आजच्या अर्थव्यवस्थेतील एकूण शोषणाच्या तुलनेने खरोखरी महत्त्वाचे नाही, मूलभूत तर नाहीच नाही." बापटांच्या विधानातला दुसरा वाक्यखंड वाचताना वाचकांना असे वाटेल की 'मूलभूत' मीच म्हटले आहे! वास्तवात तशी काही गोष्ट नाही. नाडकर्णी व बापटांनी केलेला प्रकार व्यंगसूचनाचा

( innuendo ) आहे. ( अर्थात तो त्यांनी हेतुपूर्वक केला नसून अत्युत्साहाच्या भरात केला आहे, अशी माझी खात्री आहे. ) नाडकर्णी व बापट ह्या दोघांनीही ह्या संदर्भात माझे एक वाक्य उद्धृत करून माझ्या प्रतिगामित्वाचा निर्णायक पुरावा हजर केल्याचा आव आणला आहे. ते वाक्य असे : " ( तरीही ) गणनहीनता व तिचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणाम हा आदिवासींचे जीवन समजावून घेण्याचा एक महत्त्वाचा मार्ग आहे असे त्यास ( म्ह. मला ) वाटते. " येथे 'महत्त्वाचा' हा शब्द आला व माझ्या 'पतना'चा तो पुरावा ठरला. ( चिनी कम्यूनमधील एका शिक्षकाच्या शोकांतिकेची एक गोष्ट नुकतीच वाचली तिची या संदर्भात आठवण येते. हा शिक्षक भाषेचा असून विद्यार्थ्यांना भूतकाळ शिकवीत होता. भूतकाळ सोदाहरण स्पष्ट करण्यासाठी कम्यूनमधील एका घराकडे बोट दाखवून त्याने म्हटले, " हे घर ( पूर्वी ) माझे होते." या वाक्यातून शिक्षकाच्या भांडवलशाही मालकी हक्काच्या जाणिवा नष्ट झालेल्या नाहीत हे ध्यानात आल्यामुळे त्याला शिक्षा झाली. )

या ठिकाणी दोन गोष्टी लक्षात घ्याव्या. एकतर, शोषणामागे अनेक घटक आहेत आणि गणनहीनता हा त्यांतला सर्वात मोठा घटक नव्हे असे माझे मत मी 'आवर्जून' (—हा नाडकर्णींचाच शब्द) सांगितले असताना माझ्या लेखाचा मुख्य रोख काय आहे ठरविण्यासाठी अवांतर वाक्यांची मदत या लेखकांनी का घ्यावी ? एखाद्या वेळी भाषेच्या बाबतीत आपण सातत्याने काटेकोर राहात नाही, स्थूलपणे लिहितो, तसे येथे काही झाले असावे असा विचार करून त्यांनी मला माफी का करू नये ?

पण खरे म्हणजे मी भाषिक गलथानपणाही केलेला नाही. **शोषण** समजावून घेण्याचा महत्त्वाचा मार्ग असे मी म्हटलेले नसून **जीवन** समजावून घेण्याचा महत्त्वाचा मार्ग असे म्हटले आहे आणि आदिवासींचे **जीवन** समजून घेण्याचा तो महत्त्वाचा मार्ग का याचे बहुदिश विवेचन माझ्या लेखात आलेले आहे. माझा मूळ लेख नीट वाचणाऱ्यांच्या ध्यानात येईल की गणनहीनतेचे एकूण **पाच** प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणाम मी सूचित केले आहेत. ( नाडकर्णी यांनी आपल्या टिपणात प्रारंभी माझ्या लेखाचा जो सारांश दिला आहे तो या दृष्टीने अपुरा आहे. ) ते असे :

( १ ) साधनसामग्रीच्या सुयुक्त उपयोजनाची असंभाव्यता.

( २ ) गणनसमर्थांकडून संभाव्य शोषण.

( ३ ) आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत अडसर ( ह्या संदर्भात क्रीत निविष्टी व विक्रीत उद्दिष्टी यांबद्दलचे माझे मूळ लेख पृ. १० स्तंभ १ मधील विवेचन पाहावे ).

( ४ ) गणनहीनतेचाच एक संभाव्य आविष्कार म्हणजे कालमापनाची अशक्यता व तीतून येणारा 'अविवेका'चा, नियोजनरहिततेचा, 'उद्या'च्या विचाराचा अभाव. आर्थिक विकासाशी मूलभूत रीतीने संबद्ध असा 'आकांक्षांच्या पातळी'चा हा विचार आहे. ( पृ. ११, स्तंभ १ व २. येथले माझे विवेचन आनुमानिक ( speculative ) आहे. त्यावर चर्चा झाल्यास ती मला स्वागतार्ह वाटेल. )

( ५ ) अमूर्त-विचारशक्तीचा अभाव, वैचारिक अपरिपक्वता ( हाही भाग काहीसा आनुमानिक आहे. )

इतके सगळे मनात असल्यामुळे 'जीवन' समजून घेण्याचा 'महत्त्वाचा मार्ग' असे मला म्हणावेसे वाटले.

यातला क्र. ३ चा विकासाचा मुद्दा माझ्या मूळ लेखात पुरेसा स्पष्ट झाला की नाही अशी मला शंका येते, म्हणून त्याचा खुलासा करीत आहे. पारंपरिक शैलीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य असे की, तिच्यातली

बहुंश उत्पादनसाधने घरगुती ( home-produced ) असतात : आदल्या वर्षीच्या पिकातून राखून ठेवलेले बी, घरचेच खत, घरचीच जनावरे, घरचीच श्रमशक्ती इत्यादी. शिवाय उत्पादनही मुख्यत: घरगुती उपभोगासाठीच असते. ह्या सगळयाचा अर्थ शेती 'स्वयंपूर्ण' असते, तिचे 'व्यापारीकरण' झालेले नसते. नवी, उदा. अधिकोत्पादी जातींची शेती करायची तर बी, रासायनिक खते, पीकसंरक्षणाची द्रव्ये ह्या सर्व गोष्टी विकत घ्यायला हव्या आणि ही क्रयशक्ती प्राप्त व्हायची तर मालाचा काही हिस्सा विकायलाही हवा. येथे शेतकरी स्वयंपूर्णतेच्या क्षेत्रातून बाहेर पडून विनिमयाच्या, बाजारपेठेच्या, बाजारभावांच्या क्षेत्रात जातो. हा व्यवहार यशस्वीपणे करायचा तर बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, त्रैराशिक हे सगळे करणे आले. सर्व खर्चवेच वजा जाता पुरेसा निव्वळ नफा मिळणार असेल तरच शेतकरी हे करील आणि पुरेसा नफा मिळेल की नाही हे त्याला अशा आकडेमोडीशिवाय कळणार नाही. म्हणजेच गणनसामर्थ्य असल्याशिवाय शेतकरी नव्या तंत्राचा स्वीकार करणार नाही, विकास होणार नाही.

नव्या तंत्राचा स्वीकार करण्यात काय अडचणी येतात, तंत्रस्वीकारवर्तनावर परिणाम करणारे घटक कोणते, याविषयी पुष्कळ वाङ्मय उपलब्ध आहे. पण अशा वाङ्मयात ह्या अडसराचा उल्लेख कुणी केल्याचे माझ्या ध्यानात आले नाही. जमीनहक्कविषयक स्थिती ( tenurial status ), धारणाचे आकारमान, आर्थिक स्थिती, शिक्षण, वय हे सगळे उल्लेखिले जाते, पण गणनसामर्थ्याचा उल्लेख होत नाही. कृषिविस्तार ( agricultural extension ) विषयक वाङ्मयात विस्तारतंत्रे ( extension techniques ) दिलेली असतात. त्यात सभा, चित्रपट, रेडिओ, दूरदर्शन, छापील पत्रके, चित्रे, नाटके, तमाशे, गाणी या सर्वांचा समावेश होतो पण गणनशक्ती अस्पृष्ट राहते. विकासातील एका महत्त्वाच्या अडसराला अशा रीतीने स्पर्शच होत नसल्यामुळे 'शेतकरी परंपराप्रिय आहे', असा निष्कर्ष अनेकदा अकारण काढला जाण्याचा संभव दुर्लक्षून चालणार नाही.

पुन्हा मुद्द्याकडे परत येऊ. नाडकर्णी यांनी माझी आणखी तीन वाक्ये उद्धृत करून माझ्यावरचा आरोप आणखी बळकट करण्याचा यत्न केला आहे. ती वाक्ये, माझ्या त्यांवरील भाष्यांसह, पुढीलप्रमाणे : ( १ ) "उपलब्ध साधनसामग्रीचे सुयुक्त वाटप काय किंवा आर्थिक विकास काय–दोन्ही अवस्थांत महत्तमीकरणाची इच्छा पायाभूत आहे, पण तिला गणनकौशल्याची जोड असल्याशिवाय सुयुक्त वाटपाप्रमाणेच आर्थिक विकास **अशक्य** आहे." ( जाड ठसा नाडकर्णींचा ). पहिली गोष्ट हे वाक्य शोषणाबद्दल नसून विकासाबद्दल, सुयुक्त वाटपाबद्दल आहे. शिवाय या दोन गोष्टी गणनसामर्थ्याशिवाय अशक्य आहेत हे नाडकर्णी यांनी असिद्ध ठरविलेले नाही. उलट ह्या बाबतीत ते माझ्याशी सहमत आहेत, हे त्यांच्या पुढील विधानावरून लक्षात येते : "...प्रत्येक कुटुंब आपल्या गरजेपुरतेच उत्पादन करते त्या वेळी गणनसामर्थ्याचा अभाव फारसा हानिकारक नसतो आणि विनिमयव्यवहार वाढून अर्थव्यवस्था अधिक व्यामिश्र बनू लागली की त्याबरोबरच महत्तमीकरणासाठी गणनसामर्थ्य आवश्यक ठरते, हा देशपांडे यांचा मुद्दा सहज मान्य होण्यासारखा आहे." हे सहज मान्य होण्यासारखे असेल तर विकासाचा मुद्दाही नाडकर्णींना तितक्याच सहजपणे मान्य व्हावा. ( २ ) "भारताच्या संदर्भात अर्थशास्त्राने गणनसामर्थ्याचा विचार करणे का अगत्याचे आहे हे ह्यावरून ध्यानात येईल व विकासाच्या मार्गात असलेल्या अडसरांची अधिक चांगली समजूत पटेल असे वाटते." ( ३ ) "अनेक अविकसित देशांमधून गणनहीनता फार मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात असली पाहिजे, आणि तिचे त्या त्या अर्थव्यवस्थांवर दुष्परिणाम होत असले पाहिजेत."—आता, या दोन्ही वाक्यांत शोषणाविषयी काही नाही. क्र. १ च्या वाक्यावरूनच ती निष्पन्न होतात व ती 'विकासा' विषयी आहेत. शिवाय आर्थिक विकास न होण्याचे गणनहीनता हे एकमेव कारण आहे असे मी कुठेही म्हटलेले नाही.

एकूण या सर्व वादविवादात तिन्ही टीकाकारांची सामाजिक जाणीव अत्यंत उग्र व धारदार आहे यापलीकडे काही सिद्ध झालेले नाही.

सर्व मामला असा उघड असताना माझ्यावर आगंतुक टीकेची राळ उडविण्यात यावी हा प्रकार मला तरी अगम्य वाटतो. पण माझ्या एका ज्येष्ठ अर्थशास्त्रज्ञ मित्रांनी मला लिहिलेल्या एका खाजगी पत्रात या कोड्याचा उलगडा करण्याचा यत्न केलेला आहे, तोच बरोबर असावा. त्यांनी लिहिले होते, " सध्याच्या बुद्धिमंतांच्या जगातील कालमहिमाच असा आहे की, चंद्राचा भरती-ओहटीवर काय परिणाम होतो हे सांगतानासुद्धा तुम्ही वर्गयुद्ध आणले पाहिजे. " हा कालमहिमाच असेल तर ' कालाय तस्मै नमः ' एवढेच म्हणून गप्प बसणेच काय ते माझ्या हाती आहे.

■ ■

[ हा वाद बराच लांबला आहे. यात उलटसुलट म्हणण्यासारखे अद्यापही बरेच उरले आहे. परंतु आमच्या एका ज्येष्ठ अर्थशास्त्रज्ञ मित्राने आम्हास दिलेल्या खाजगी ( मात्र पत्रद्वारे नव्हे ! ) सल्ल्यास मान देऊन आम्ही ही चर्चा आटोपती घेतो.

प्रमुख संपादक ]

---

## मराठी अर्थशास्त्र परिषदेची प्रकाशने

**नी. वि. सोवनी** : अर्थसिद्धान्त – आणखी चिकित्सक निबंध ( १९७७ ). पृष्ठे २२६. किंमत २० रुपये. (एकमेव विक्रेते : द कोल्हापूर रायटर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटी, लि., ४०-४९-इ, शाहुपुरी, ६ वी गल्ली, कोल्हापूर १. )

**मो. वि. भाटवडेकर** : शिक्षणाचे अर्थशास्त्र ( १९७८ ). पृष्ठे १५७. किंमत २० रुपये. ( वितरणव्यवस्था : व्हीनस प्रकाशन, तपश्चर्या, ३८१ क शनिवार पेठ, पुणे ४११० ३० ).

---

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## तृतीय वार्षिक अधिवेशन वृत्तान्त

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे तिसरे वार्षिक अधिवेशन मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यमाने औरंगाबाद येथे दिनांक २६ ते २८ ऑक्टोबर १९७९ या दिवशी डॉ. श्री. आ. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. अधिवेशनाचा उद्घाटन समारंभ विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील सभागृहात दि. २६ ऑक्टोबरला सकाळी १०--३० वाजता सुरू झाला. अधिवेशनाचे उद्घाटन शिक्षण मंत्री प्रा. सदानंद वर्दे यांच्या हस्ते झाले. समारंभाच्या प्रारंभी स्वागत समितीचे अध्यक्ष व मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ब. रा. भोसले यांनी प्रतिनिधींचे व उपस्थितांचे स्वागत केले. शिक्षणमंत्री प्रा. सदानंद वर्दे यांनी आपल्या उद्घाटनाच्या भाषणात मराठी अर्थशास्त्र परिषदेसारख्या प्रादेशिक भाषांतून समाजविज्ञान शास्त्रांना प्रोत्साहन देणाऱ्या संघटनांचे महत्त्व विशद करून अर्थशास्त्रासारखा गतिमान विषयही शिक्षणाच्या सर्व स्तरांवर मराठीतून शिकविणे शक्य आहे व जरुरीचे आहे असे प्रतिपादन केले. राजभाषा वर्षाच्या संदर्भात त्यांनी परिषदेच्या सर्व उपक्रमांचे विशेष महत्त्व असल्याचे सांगून उत्तरोत्तर गरिबांच्या आर्थिक दैन्यावस्थेच्या समस्यांचे निराकारण करण्याच्या दृष्टीनेही परिषद भरीव कार्य करील अशी आशा व्यक्त केली. अध्यक्षीय भाषणात डॉ. श्री. आ. देशपांडे यांनी भारतातील वाढत्या बेकारीचा व दारिद्र्याचा आढावा घेऊन भारतातील आर्थिक नियोजनाच्या यशापयशाचे विश्लेषण केले. 'भारतीय लोकांची गरिबी दूर करून राहणीचा दर्जा सुधारावयाचा असेल तर शेती आणि ग्रामीण जनतेचा विकास झाल्याशिवाय तरणोपाय नाही, हे सर्वच मानतात आणि तरीही भारतात शेतकी नियोजन खऱ्या अर्थाने हाती घेण्यात आले नाही ही वस्तुस्थिती आहे' असे सांगून डॉ. देशपांडे म्हणाले की, 'शेती व ग्रामविकास हा भारताच्या आर्थिक विकासाचा कणा आहे हे खरे. परंतु ग्रामीण विकासाचा प्रश्न हा केवळ आर्थिक नसून त्या समाजाच्या पुनरुत्थानाचा आहे. पिढ्यानुपिढ्या दारिद्र्यात आणि अज्ञानात जगणाऱ्या रूढिप्रिय समाजाचे सुशिक्षित, आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी आणि समाधानी अशा आधुनिक समाजात परिवर्तन करणे ही सामान्य गोष्ट नाही.' ते पुढे म्हणाले की, 'विकास कार्यक्रमांचा लाभ अगदी खालच्या स्तरापर्यंत पोहचण्यासाठी या कार्यक्रमांचा भर छोटे व सीमान्त शेतकरी, कारागीर, अनुसूचित जाती आणि आदिवासी यांच्याच विकासावर प्रामुख्याने ठेवावा लागेल.'

अध्यक्षीय भाषणानंतर स्वागत समितीने अधिवेशनाप्रीत्यर्थ काढलेल्या खास स्मरणिकेचे प्रकाशन प्रा. वर्दे यांनी केले. समारंभाच्या अखेरीस अधिवेशनाचे स्थानिक कार्यवाह डॉ. वि. वि. बोरकर यांनी उपस्थितांचे आभार मानले आणि उद्घाटन समारंभ समाप्त झाल्याचे जाहीर केले.

## चर्चासत्रे

अधिवेशनात एकूण चार चर्चासत्रे आयोजिली होती. पहिले सत्र दिनांक २६ ऑक्टोबर रोजी दुपारी २ ते ६ या काळात 'अर्थशास्त्रातील खंड सिद्धान्तन' या विषयावर झाले. या सत्रात प्रा. नी. वि. सोवनी, डॉ. रवीन्द्र रा. दोशी, प्रा. बी. के. ढाकणे, प्रा. (सौ.) कुमुदिनी देशपांडे आणि प्रा. सु. रा. ओझरकर यांनी आपले निबंध सादर केले. चर्चेला प्रारंभ प्रा. नी. वि. सोवनी यांनी केला. या चर्चासत्रात डॉ. जावंधिया, प्रा. गोडबोले, डॉ. आनंद नाडकर्णी, प्रा. सर्जेराव ठोंबरे इत्यादींनी भाग घेतला.

अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी सकाळच्या चर्चासत्रात 'महाराष्ट्रातील प्रादेशिक विकास व नियोजन' हा विषय चर्चेसाठी होता. या विषयावरील चर्चासत्रात प्रा. रमेश पानसे, डॉ. व्यं. सु. पाटणकर, सौ. अंजली कुळकर्णी, प्रा. जीवन कंगले, प्रा. (सौ.) सरल जुगादे, प्रा. अ. रा. पडोशी, प्रा. बी. के. ढाकणे, श्री. भा. वा. आष्टूरकर, सर्वश्री पोटेकर, वाघमारे व देवळे, सर्वश्री भारंबे व खांदेवाले, श्री. अ. व. देवगिरीकर, प्रा. माणिक शामकुंवर, प्रा. एस. एन्. माने यांनी आपले निबंध सादर केले. चर्चेला प्रारंभ प्रा. रमेश पानसे यांनी केला. या चर्चासत्रात डॉ. वसंत पटवर्धन, डॉ. मो. वा. पटवर्धन, श्री. गोविंदभाई श्रॉफ, सौ. कुमुदिनी देशपांडे, डॉ. जावंधिया, प्रा. पी. टी. पाटील, प्रा. सर्वोत्तम कुळकर्णी, डॉ. रवीन्द्र दोशी, डॉ. आनंद नाडकर्णी, प्रा. (सौ.) कुळकर्णी, डॉ. हडप, श्री. भुजंगराव कुळकर्णी, डॉ. शं. के. मोडक, डॉ. चांदसकर इत्यादींनी भाग घेतला.

तिसरे चर्चासत्र शनिवार दिनांक २७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता सुरू झाले. चर्चेचा विषय 'महाराष्ट्रातील शासकीय उद्योग आणि उपक्रम यांचे व्यवस्थापन व प्रश्न' हा होता. या चर्चासत्रात डॉ. वसंत श्री. पटवर्धन व डॉ. शं. के. मोडक यांनी आपले निबंध सादर केले. चर्चेला प्रारंभ डॉ. पटवर्धन यांनी केला. या चर्चेत प्रा. थोरात, प्रा. ठोंबरे, प्रा. सोनाळे, श्री. भुजंगराव कुळकर्णी, प्रा. सर्वोत्तम कुळकर्णी, प्रा. रमेश पानसे इत्यादींनी भाग घेतला.

चौथे आणि अखेरचे चर्चासत्र 'अर्थशास्त्रीय मराठी परिभाषा' या विषयावर रविवार दि. २८ ऑक्टोबर रोजी सकाळी ८-३० वाजता सुरू झाले. सत्राची सुरुवात महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाचे उपसंचालक डॉ. न. ब. पाटील यांनी अर्थशास्त्रीय मराठी परिभाषा कोशाच्या निर्मितीसंबंधी विस्तृत माहिती देऊन केली. एकार्थता, स्पष्टार्थ, एकरूपता, सघनता, अल्पाक्षरता, सातत्य, संगती, शब्दसौष्ठव, अर्थव्यक्ती ही शास्त्रीय परिभाषेची नवलक्षणे विशद करून श्री. पाटील म्हणाले की, व्यवहारातील अर्थशास्त्रीय भाषा आणि शैक्षणिक क्षेत्रातील अर्थशास्त्रीय परिभाषा या दोन पातळ्यांवर भाषेचे स्वरूप निराळे राहणे अपरिहार्य आहे. तथापि वाणिज्य व कला शाखेतील अर्थशास्त्रावरील ग्रंथातील परिभाषेत समानता असणे आवश्यक आहे. नव्याने निर्माण होणाऱ्या परिभाषेत अपरिचित शब्द येणे अटळ आहे, त्यांचा सराव होऊ देणे हे महत्त्वाचे. शिवाय शब्दनिर्मितीची प्रक्रिया ही नव्वद टक्के नवीन नसते हे विसरता कामा नये. भाषा संचालनालयाने अर्थशास्त्रीय मराठी परिभाषा कोशाची चक्रमुद्रित प्रत काढली आहे, त्यावर सविस्तर विचारविनिमय करून योग्य त्या सुधारणा करण्यास वाव आहे.

या सत्रातील चर्चेत प्रा. रमेश पानसे, प्रा. प्रमोद ठोंबरे, डॉ. वि. वि. बोरकर, प्रा. (सौ.) वंदना सोमाळकर, प्रा. शामकुंवर, प्रा. ढाकणे, प्रा. (सौ.) जुगादे, प्रा. सोनाळे, प्रा. पेडगावकर, प्रा. माने, प्रा. मनोहरे, प्रा. नी. वि. सोवनी इत्यादींनी भाग घेतला. वक्त्यांनी चर्चेत पुढीलप्रमाणे काही महत्त्वाचे मुद्दे मांडले : परिभाषा समृद्ध होण्यासाठी प्रतिशब्द शोधून काढण्याचे काम सतत व्हावयास पाहिजे. भाषा

व शब्द कसे वापरायचे याचा उलगडा झाला की अर्थशास्त्र मराठीत आणणे फारसे कठीण नाही. काही शब्दांच्या बाबतीत त्यांची अर्थनिश्चिती त्यांच्या व्याख्येतून होत असते हे दृष्टीआड करता कामा नये. तसेच नव्या शब्दांमुळे मूळच्या अर्थवाही शब्दांकडे दुर्लक्ष होऊ नये. परिभाषा निर्माण करताना शब्दांत भाषेचा इतिहास दडलेला असतो हे विसरू नये. सामान्यांच्या भाषेतही समर्पक व अर्थवाही शब्द आहेत. त्यांचा कुशलतेने वापर केला पाहिजे. तथापि सोप्या भाषेतून नेहमीच शास्त्रीय विषय मांडता येईल हे म्हणणे बरोबर नाही. त्यासाठी पारिभाषिक शब्द काटेकोरपणे वापरणे अनिवार्य आहे.

**वार्षिक साधारण सभा**

औरंगाबाद येथील अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी सकाळी ११-३० वाजता परिषदेची वार्षिक साधारण सभा झाली डॉ. श्री. आ. देशपांडे सभेच्या अध्यक्षस्थानी होते. सभेत पुढील कामकाज पार पडले :

( १ ) परिषदेचे संस्थापक व आजीव सभासद प्रा. ग. प्र. पिंपरकर व डॉ. स. द. पुणेकर, संस्थापक सभासद प्राचार्य द. रा. सामंत तसेच भारतातील एक ज्येष्ठ व नामवंत अर्थशास्त्रज्ञ प्रा. सी. एन्. वकील यांच्या दुःखद निधनाबद्दल अध्यक्षांनी शोकप्रस्ताव मांडले व सभेने त्यांच्या स्मृतीस अभिवादन करून श्रद्धांजली वाहिली.

( २ ) दिनांक २८ ऑक्टोबर १९७८ रोजी नागपूर येथे झालेल्या वार्षिक साधारण सभेच्या कार्यवृत्तांतास मंजुरी देण्यात आली. तसेच कार्यवाह–खजिनदार यांनी सादर केलेल्या अहवालास, १९७८–७९ या वर्षीच्या हिशेबास आणि १९८०–८१ या वर्षासाठी सुधारित अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात आली.

( ३ ) प्रा. रमेश पानसे व प्रा. प्रमोद ठोंबरे यांनी मांडलेल्या घटनादुरुस्तीच्या प्रस्तावास संमती दिली.

सभेत संमत झालेले घटनादुरुस्तीचे प्रस्ताव :

घटनेतील कलम १० यातील उपकलम ( ५ ) पुढीलप्रमाणे दुरुस्त करावे :

५ ) सूचक व अनुमोदकांच्या स्वाक्षऱ्यांसहित उमेदवारीसाठीचा अर्ज परिषदेच्या कार्यवाहाकडे वार्षिक साधारण सभेस आरंभ होण्यापूर्वी किमान एक तास अगोदर पोहचला पाहिजे. उमेदवारांच्या अर्जांची संख्या एकूण जागांपेक्षा कमी असल्यास उर्वरित रिकाम्या जागांसाठी उमेदवारांची निवड वार्षिक साधारण सभेतच नावे सुचवून करता येईल. सर्व उमेदवारांचे सूचक व अनुमोदक हे परिषदेचे सभासद असले पाहिजेत.

घटनेतील कलम –६ ‘ कार्यकारी मंडळाचे कार्य ’ या कलमात पुढील विधान व दोन नवी पोट-कलमे अंतर्भूत करावी :

विधान : कार्यकारी मंडळाला पत्रव्यवहाराने निर्णय घेता येतील.

१. नियतकालिकाच्या संपादक मंडळाची नियुक्ती करणे, त्याची मुदत ठरविणे, त्याची पुनर्रचना करणे वा ते विसर्जित करणे.

२. परिषदेच्या कार्यासाठी सेवकवर्ग नियुक्त करणे, त्यांचे वेतन व सेवाशर्ती ठरविणे आणि त्यांना सेवामुक्त करणे.

( ४ ) १९८०–८१ या वर्षासाठी सर्वश्री भोरकर आणि जोशी यांची लेखापाल म्हणून नेमणूक करण्यात आली.

( ५ ) वार्षिक सभेने १९८०–८१ या वर्षासाठी परिषदेचे अध्यक्ष म्हणून डॉ. वि. वि. बोरकर यांची एकमताने निवड केली व श्रीमती ना. दा. ठाकरसी विद्यापीठ, मुंबई, तसेच श्री शिवाजी विद्याप्रसारक मंडळ, धुळे यांच्यातर्फे आलेली निमंत्रणे स्वीकारून त्यापैकी एक १९८० मध्ये होणाऱ्या चौथ्या अधिवेशनासाठी कार्यकारी मंडळाने निश्चित करावे असे ठरविले.

१९८० मध्ये भरावयाच्या चौथ्या अधिवेशनातील चर्चासत्रांसाठी पुढील विषय निश्चित करण्यात आले :

( १ ) अर्थशास्त्रातील समतोलाची संकल्पना.
( २ ) महाराष्ट्रातील शेतीमालाच्या विनियमित बाजारपेठा.
( ३ ) महाराष्ट्रातील करव्यवस्था.

चौथा विषय तत्कालीन आर्थिक परिस्थितीशी संबंधित असा असेल व तो अध्यक्ष यथाकाल जाहीर करतील.

( ६ ) सभेने १९८०–८३ या वर्षासाठी प्रा. दे. अ. दाभोलकर, श्री. गोविंद तळवलकर व प्राचार्य प्रभुराम जोशी यांची परिषदेचे विश्वस्त म्हणून एकमताने निवड केली.

( ७ ) सभेने १९८०–८३ या वर्षासाठी डॉ. रवीन्द्र सबनीस यांची परिषदेचे कार्यवाह-खजिनदार म्हणून एकमताने निवड केली.

## नवे कार्यकारी मंडळ

वार्षिक साधारण सभेने १९७९–८० या वर्षासाठी कार्यकारी मंडळावर पुढील सभासदांची बिनविरोध निवड केली : डॉ. आनंद नाडकर्णी, डॉ. रवीन्द्र दोशी, प्रा. रमेश पानसे, डॉ. गि. सो. कल्याणकर, डॉ. शं. के. मोडक, प्रा. शि. ना. माने, डॉ. व्यं. सु. पाटणकर.

## कार्यकारी मंडळाची सभा

अधिवेशनकालात परिषदेच्या कार्यकारी मंडळाची सभा दिनांक २६ व २७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६–३० वाजता झाली. अध्यक्षस्थानी डॉ. श्री. आ. देशपांडे होते. कार्यकारी मंडळाने खालील महत्त्वाचे निर्णय घेतले :

( १ ) परिषदेच्या निक्षायनिधी कार्यकारी मंडळाच्या संमतीने कोणत्याही राष्ट्रीकृत बँकेत / राज्य सहकारी बँकेत / अनुसूचित बँकेत / सांविधिक वित्तीय संस्थेत रुपये एक हजार वा त्याच्या पटीत विमासंरक्षित मर्यादेपर्यंत मुदतीच्या ठेवीत गुंतवावा.

( २ ) १९८०–८१ या वर्षापासून परिषदेचे व अर्थसंवादाचे हिशेब स्वतंत्र ठेवावेत व दरवर्षी संपादकांनी ' अर्थसंवाद ' संबंधित अहवाल सादर करावा. संपादनकार्यासाठी संपादकांना व ' अर्थसंवाद ' मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या लेखनाबद्दल लेखकांना मानधन देण्यात यावे. ' अर्थसंवाद 'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीपोटी मिळणारे उत्पन्न हे पूर्णतया परिषदेला मिळणारे उत्पन्न समजले जावे.

( ३ ) कार्यकारी मंडळाची आणखी एक बैठक नव्या वर्षाच्या प्रारंभी, शक्यतोवर दरवर्षीच्या एप्रिल महिन्यात, बोलाविण्यात यावी.

( ४ ) श्री. ना. दा. ठाकरसी विद्यापीठ, मुंबई आणि छत्रपती शिवाजी विद्याप्रसारक मंडळ, धुळे यांजकडून पुढील अधिवेशनासाठी आलेली निमंत्रणे स्वीकारावीत व अध्यक्ष, कार्याध्यक्ष आणि कार्यवाह–खजिनदार यांनी संबंधितांशी विचारविनिमय करून त्यातील एक स्थान निश्चित करावे.

**रवीन्द्र सबनीस**
कार्यवाह – खजिनदार

पत्रव्यवहार

श्री दत्त महाविद्यालय
मु. पो. कुरुंदवाड (४१६१०६)
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

स. न.

आपल्या अर्थसंवादाच्या जुलै-सप्टेंबर १९७९ च्या अंकातील "अर्थ शब्दाची वाट पाहे" हा प्रा. नी. वि. सोवनी यांचा लेख वाचला. अर्थशास्त्रातील विविध संज्ञांसाठी परिभाषा तयार करताना अर्थाची निश्चितता असली पाहिजे. शिवाय कोणत्याही एका स्वतंत्र संज्ञेची एक परिभाषा प्रमाण मानल्यानंतर त्या संज्ञेशी संलग्न शब्दांची परिभाषा जेव्हा तयार केली जाते तेव्हा पहिल्या संज्ञेची परिभाषा कायम राखली पाहिजे असे मला वाटते.

अर्थसंवाद (खं. ३, अं. २), पान ९७ वर Inflation या संज्ञेची प्रा. नी. वि. सोवनी यांनी चर्चा केली आहे. Inflation (स्वतंत्र संज्ञा) या शब्दाला पारिभाषिक शब्द 'चलन अतिवृद्धी' हा जर प्रमाण मानण्यात आला तर Cost Inflation (संलग्न संज्ञा) या शब्दाची परिभाषा तयार करीत असताना 'परिव्यय अतिवृद्धी' हा शब्दप्रयोग सुबोध वाटत नाही. कारण cost चा अर्थ 'परिव्यय' व Inflation चा अर्थ अतिवृद्धी असा होतो. इथे Cost Inflation या संलग्न संज्ञेसाठी 'परिव्यय चलन अतिवृद्धी' हा शब्दप्रयोग सयुक्तिक वाटतो. यातील 'चलन' हा शब्द का गाळण्यात आला? समजा तो गाळून 'परिव्यय अतिवृद्धी' असा जर अर्थ मान्य केला तर परिव्यय अतिवृद्धी याचे मराठीतून इंग्रजी भाषांतर होत असताना गल्लत होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. दुसरे असे की, Cost inflation यातील Cost शब्द पुसून टाकला तर inflation चा अर्थ 'अतिवृद्धी' असा होईल व तो युक्त नाही.

त्यामुळे मला असे वाटते की, एकदा एका संज्ञेला पारिभाषिक शब्द निश्चित केल्यानंतर त्या संज्ञेशी संलग्न अशा शब्दांसाठी परिभाषा तयार करीत असताना मूळच्या संज्ञेच्या पारिभाषिक शब्दांत काटछाट होऊ नये. तसेच Cost push inflation या संज्ञेस परिव्ययजन्य अतिवृद्धी हा शब्दप्रयोग दिला आहे, त्याऐवजी परिव्यय चलन अतिवृद्धी हा शब्द अधिक अर्थपूर्ण नाही काय? येणेप्रमाणे पान ९७ वरील सर्व शब्दांना 'चलन' शब्दासह अर्थरूप देण्यास आले तर अर्थनिश्चिती जास्त तंतोतंत होईल असे वाटते.

आपला
**शिवकुमार खोबरे**

स. न. वि. वि.

जुलै-सप्टेंबर १९७९ च्या अर्थसंवादाच्या अंकात inflation आणि त्याच्या जातकुळीची परिभाषा प्रा. सोवनी यांनी दिलेली आहे. यात पहिला inflation हा शब्द वगळल्यास इतर सगळ्या शब्दांतून inflation ला अतिवृद्धी हा शब्द लावला गेला आहे, हे योग्य आहे. तसेच पुढे stagflation ला रुद्धिवृद्धि युती असा जो शब्द त्यांनी दिला आहे तो चपखल आहे.

पण inflation च्या चलन अतिवृद्धी या शब्दातील चलन (curreny) या शब्दाची जोडणी मला दिशाभूल करणारी वाटते. यात चलनामुळे येणारी भाववृद्धी व चलनाची अतिवृद्धी हा जो अर्थ निघतो तो एकांगी वाटतो. सतत, अखंडपणे आणि गतीने होत जाणारी किमतीतील वाढ अशी inflation ची व्याख्या आहे. त्यास "भाववृद्धी" असा शब्द असावा असे मी एक वेळ म्हणेन. पण मागचा चलन वगळून नुसता अतिवृद्धी हा शब्द वापरला तर त्याऐवजी भाववृद्धी हा शब्द योजावा असा माझा आग्रह राहणार नाही. तेव्हा;

inflation अतिवृद्धी

Currenncy inflation चलन अतिवृद्धी

असे असावे असे मला वाटते.

धारवाड<br>
२८-१-८०

आ.<br>
**सी. पं. खेर**

संपादक, 'अर्थसंवाद' यांस स. न.

'अर्थसंवाद'च्या ऑक्टो.–डिसेंबर १९७९ च्या अंकात 'मागासलेले लोक व अविकसित प्रदेश' हे श्रीमती कुमुदिनी देशपांडे यांचे टिपण वाचनात आले. या टिपणातील मुद्द्यांवर सैद्धांतिक चर्चा कदाचित होऊ शकेल. मला या ठिकाणी मुख्यत: या टिपणातून डोकावणाऱ्या एका वृत्तीचा निषेध करायचा आहे.

नियोजन माणसासाठी असते तसेच प्रदेशाचा 'विकास' ही गोष्टच मानवसापेक्ष असते हे कुणीही मान्य करीलच. परंतु म्हणून स्वत:चे जीवनमान सुधारण्याची इच्छा व स्वावलंबनाची प्रवृत्ती या दोन गोष्टी नसल्या की माणूस निश्चितच 'मागासलेला' असतो असे म्हणणे कितपत योग्य आहे ? 'मागासलेपणा' ही गोष्ट इतक्या सोपेपणाने शब्दबंद करता येण्याजोगी गोष्ट आहे की काय ? प्रचंड वस्तुनिष्ठ घटकांच्या दबावाखाली भरडून-चिरडून जाणाऱ्या व्यक्तींमध्ये सुधारण्याची इच्छा व स्वावलंबनाची वृत्ती नसते व केवळ यामुळेच तो मागासलेला असतो असे सुचवणे हे कशाचे द्योतक आहे ? या अत्यंत जटिल समस्येकडे पाहण्याच्या दृष्टिकोणातील मागासलेपणाचे, बेभानपणाचे की अहंमन्यतेचे ?

"स्वत:ची पुरणपोळी कमी करून 'वंचित' माणसास ... काहीतरी दिलेच पाहिजे ...", "घेणाऱ्यास घेण्याची खंत वाटली तर देणाऱ्यासही द्यावेसे वाटते", "आपली मदत अस्थानी होत नसली तरी अविवेकाने होत असल्यामुळे ..." या शब्दयोजनेवरून लेखिकेची 'Holier than thou' वृत्ती वास मारत स्पष्ट होते. लेखिकेने राजकारण खेळणाऱ्यांच्या नेहमीच्या प्रथेप्रमाणे थप्पड मारत मारत "बुद्धिजीवी वर्गाने आपला निषेध नोंदविला पाहिजे", असे नेहमीप्रमाणेच म्हटले आहे. या बुद्धिजीवी वर्गातील कितींनी आपल्या पायाखाली काय जळते आहे याचा विचार केला आहे ? दुष्काळी कामांवर

'भरपूर' मजुरी मिळते असे, महिन्याकाठी एक हजारापेक्षा कित्येक शेकड्यांनी जास्त उत्पन्न मिळवणाऱ्या बुद्धिजीवींनी म्हटल्यावर, कृतिशील निषेध कोणी नोंदवायला पाहिजे ते निराळे सांगायला नको.

अभिजनांमधील ( elite ) एकाने दुसऱ्याच्या लिखाणाचे वगैरे परीक्षण करताना थोडीशीही बेपर्वाई व अंहमन्यता दाखवली तर फिटंफीट तरी होते; परंतु अभिजनांनी निदान बहुजनांबद्दल लिहिताना तरी अधिक समतोल, कमी शेरेबजा व थोडेसे बौद्धिक लीनतेने लिहावे / बोलावे ही अपेक्षा 'सर्व' दृष्टींनी कल्याणकारक ठरावी असे वाटते.

आपला
**अविनाश जोशी**

ता. क.

सैद्धांतिक यथार्थतेच्या दृष्टीने प्रस्तुत टिपणातील अतिसुलभीकरण लक्षात येण्यासाठी पुढील संदर्भ उपयुक्त ठरावेत :

( १ ) An Introduction to Development Economics, ( pp. 15–16 )—Walter Elkan.

( २ ) The Myth of the Lazy Native—Syed Hussein Alatas, quoted by the same author in his article ' Towards an Asian Social Science Tradition ' in New Quest, Sept.–Oct. 1979.

( ३ ) Rich Countries, Poor Countries—Pappu S. Rama Rao, the same New Quest issue.

■ ■

---

'अर्थसंवाद'च्या ऑक्टोबर–डिसेंबर १९७९ च्या अंकात मुचकुंद यांचे पत्र प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्यात उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांस उत्तर देणारे पत्र प्रा. मो. स. साबे आणि प्रा. चंद्रकांत केळकर यांनी आमच्याकडे पाठविले आहे. ते वेळेवर न आल्याने या अंकात प्रसिद्ध करणे शक्य झाले नाही. आम्ही ते पुढील अंकात प्रसिद्ध करू.

संपादक

---

'अर्थसंवाद'च्या जुलै-सप्टेंबर १९७९ आणि ऑक्टोबर-डिसेंबर १९७९ या दोन अंकाच्या चवथ्या मलपृष्ठावर रजिस्ट्रेशन क्रमांक चुकून R. N 31918/717 असा पडला आहे, तो R. N. 31918/77 असा हवा. चुकीबद्दल दिलगीर आहोत.

संपादक

'अर्थसंवाद' या त्रैमासिक नियतकालिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन

## फॉर्म ४ : नियम ८ अनुसार

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रकाशन स्थळ | — | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा सेंटर फॉर द स्टडी ऑफ सोशल चेंज, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर, मुंबई ४०० ०१४ |
| २. | नियतकाल | — | त्रैमासिक |
| ३. | मुद्रकाचे नाव | — | रवींद्र स. सबनीस |
| | राष्ट्रीयत्व | — | भारतीय |
| | पत्ता | — | ए-१४, आंबेकर नगर, परळ, मुंबई ४०० ०१२ |
| ४. | मुद्रणस्थळ | — | महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, ९१५/१, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४ |
| ५. | प्रकाशकाचे नाव | — | वरीलप्रमाणे |
| ६. | संपादकाचे नाव | — | आनंद शांताराम नाडकर्णी |
| | राष्ट्रीयत्व | — | भारतीय |
| | पत्ता | — | ए-३, प्रबोधन को ऑप. हौसिंग सोसायटी, एरंडवणे, पुणे ४११ ००४ |
| ७. | मालकाचे नाव | — | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा सेंटर फॉर द स्टडी ऑफ सोशल चेंज, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर, मुंबई ४०० ०१४ |

मी रवींद्र स. सबनीस असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा आहे.

रवींद्र स. सबनीस
प्रकाशक मुद्रक

# अर्थसंवाद साहित्य – सूची

## खंड तिसरा


**( एप्रिल १९७९ ते मार्च १९८० )**


| लेख व टिपणे | पृष्ठ |
| --- | --- |
| अर्थ शब्दाची वाट पाहे | ४६ |
| अर्थ शब्दाची वाट पाहे | ९७ |
| उत्पादन शक्यता वक्र | ९१ |
| उत्पादन शक्यता वक्र ( भाग दुसरा ) | १६८ |
| एकाधिकार कापूस खरेदी योजना ( किफायतशीर किंमतीची दुर्लक्षित समस्या) | ४३ |
| एकाधिकार कापूस खरेदी योजना : आर्थिक परिवर्तनाचा एक प्रयोग | १०३ |
| एकाधिकार कापूस-खरेदी : ( घटकपरिव्यय विरुद्ध हमी किंमत ) | १७६ |
| कै. प्रा. द. रा. सामंत यांना आदरांजली | ११३ |
| कै. डॉ. स. द. पुणेकर यांना आदरांजली | ५२, ५४ |
| गोवधबंदी | १९ |
| ग्रामीण विकासाच्या समस्या | ११५ |
| घटकवृद्धीमुळे होणाऱ्या विकासासंबंधी रिबूझिन्स्कि यांचे प्रमेय | १७० |
| पाश्चात्य, मिश्र भांडवलशाही, प्रगत अर्थ व्यवस्थांच्या संदर्भातील ' रोजगार ', ' बेरोजगार ' व ' पूर्ण रोजगार ' संकल्पना | ८६ |
| परिभाषा-निर्मितीची प्रक्रिया | २७ |
| ब्रिटिश-पूर्व भारतीय शहरे भांडवल-निर्मितीस पोषक होती काय ? | १६१ |
| भाटक ( खंड ) सिद्धान्त | १९८ |
| भारताचा भावी विकास : एक समग्र दृष्टिकोन | २१९ |
| महत्तमीकरण आणि गणनसामर्थ्य | ३८ |
| " महत्तमीकरण आणि गणनसामर्थ्य " चर्चेला उत्तर | २३१ |
| महत्तमीकरण व गणनसामर्थ्याचा अभाव | ३५ |
| महाराष्ट्र राज्यातील शासकीय उद्योग आणि उपक्रम यांचे प्रश्न व व्यवस्थापन | १८९ |
| महाराष्ट्र शासकीय उद्योग व उपक्रम : व्यवस्थापन व प्रश्न | १२८ |
| महाराष्ट्रातील आर्थिक नियोजन ( जिल्हा नियोजन ) | १५३ |
| मागासलेले लोक व अविकसित प्रदेश | १७४ |
| सातवा वित्त आयोग : उत्तरार्ध | ५७ |
| सातवा वित्त आयोग : पूर्वार्ध | १ |

| ग्रंथ परिक्षणे | पृष्ठ |
| --- | --- |
| मूल्यसिद्धान्त | ५० |
| शिक्षणाचे अर्थशास्त्र | १०६ |
| Coperative Economy-Problems and Potentialities | ११० |

| लेखक | |
| --- | --- |
| कुरिअन, सी. टी. | २१९ |
| गोरे, एम्. एस्. | ५२ |
| जोशी, अविनाश | ८६, २१९ |
| ढेकणे, भा. रा. | १०३ ११३ |
| दिवेकर, वा. द. | १६१ |
| देवधर, श्री. बा. | ५४ |
| देशपांडे, कुमुदिनी | १७४ |
| देशपांडे, श्रीधर आत्माराम | ११५ |
| देशपांडे, स. ह. | २३१ |
| नाडकर्णी, आनंद | १,५७ |
| पटवर्धन, प. वि. | १९ |
| पटवर्धन, व. श्री. | ११०, १२८ |
| पानसे, रमेश | २७, १०६, १५३ |
| बापट, भ. स. | ३८, ५०, ९१, १६८, १७० |
| माने, एस्. एन्. | ४३, १७६ |
| मोडक, शंकर केशव | १८९ |
| येवलेकर, चि. त्र्यं. | ३५ |
| राज, के. एन्. | १९ |
| सोवनी, नी. वि. | ४६, ९७, १९८ |

# रोजगाराची वाढती संधी




औद्योगिकदृष्ट्या मागासलेल्या भागाच्या विकासावर भर देऊन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने महाराष्ट्रात सर्वत्र विखुरलेल्या आपल्या औद्योगिक क्षेत्रांत उद्योगधंद्यासाठी आवश्यक त्या मूलभूत गरजा पुरविल्या आहेत. याद्वारे महामंडळाने रोजगारासाठी अधिकाधिक संधी उपलब्ध करून दिलेली आहे.

महामंडळाच्या ५४ औद्योगिक क्षेत्रात जवळजवळ २,५०० उपक्रम कार्यप्रवण असून त्यात १.२५ लाखांहून अधिक कर्मचारी काम करीत आहेत. भावी काळासाठी आखलेल्या अधिक व्यापक विस्ताराच्या योजना लक्षात घेता लवकरच आणखी अनेकजणांना रोजगाराची संधी प्राप्त होणार आहे.

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली रस्ता, अंधेरी (पूर्व)
मुंबई ४०० ०९३, फोन: ५७२४६१

ओरिएण्ट हाऊस, पाचवा मजला
मंगळूर स्ट्रीट, बॅलार्ड इस्टेट
मुंबई ४०० ०३८, फोन: २६६५४८.



Registration No. R. N. 31918/77

डॉ. रवीन्द्र स. सबनीस यांनी 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या संस्थेकरिता हे त्रैमासिक महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, ९१५/१, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४, येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा 'सेंटर फॉर द स्टडी ऑफ सोशल चेंज', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर, मुंबई ४०० ०१४ ई.थे प्रसिद्ध केले.